# माणूस

शनिवार । ७ फेब्रुवारी १९७६ । एक रुपया



मागे पडणाऱ्या त्या गावातील
तीनशे पंचाहत्तर घरांना भिंती होत्या....
दरवाजे होते....खिडक्या होत्या....
उंबरठे होते; फक्त छपरेच तेवढी नव्हती.
ती केव्हाच बुडून गेली होती !....

## अकरा कोटी गॅलन पाण्यामध्ये...

पृष्ठ : बारा

## साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : पस्तिसावा** (३६)

**७ फेब्रुवारी १९७६**

**मूल्य : एक रुपया**



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤


# सप्रेम नमस्कार

¤ २४ जानेवारी १९७६ च्या 'माणूस' साप्ताहिकात माननीय अशोक प्रभाकर डांगे यांनी 'रजनीगंधा', अंकुर आणि निशांत या तीन चित्रपटांचे परीक्षण लिहिले. त्यापैकी 'रजनीगंधा' संबंधाने केलेली माझी ही प्रामाणिक उठाठेव.

श्री. डांगेंच्या मताप्रमाणे 'नवीन' तटस्थ असतो. (दीपाला) पराभूत करण्याची त्याची ऊर्मी, प्रेम नावाची वस्तू लपवून ठेवण्याची धडपड 'ही नवीन'ची व्यक्तिमत्त्व उभी करणारी वाक्यं बरोबर वाटत नाहीत.

माझ्या मताप्रमाणे 'नवीन' मुळीच तटस्थ नसतो. त्याचा मनावर अतिशय संयम असतो. पूर्वीइतकंच त्याचं अजूनही 'दीपा'वर प्रेम असतं. फक्त तो संजयसारखा प्रत्येक गोष्ट बोलून दाखवणारा नसतो. 'नवीन'च्या प्रत्येक हालचालीत एक 'धीरगंभीरपणा' नक्कीच असतो; परंतु त्यातून डांगेंच्या म्हणण्याप्रमाणे त्याचा अहंकार बोचत नाही. 'आपली पातळी राखून जगणारा नवीन तिचा (दीपाचा) मोठेपणा, तिची व्यक्तिमत्त्वाची घडण जाणण्याइतका मोठा कधीच होत नाही. कारण नवीनचा अहंकारही तितकाच मोठा आहे.' हे वाक्य मनाला बिलकुल पटत नाही.

दीपाचा मोठेपणा कळायला तिच्यामध्ये एवढं असतं काय? ती खूप शिकली हा तिचा मोठेपणा की ती नवीनला विसरून संजयच्या गळ्यात पडली हा तिचा मोठेपणा? तिच्या व्यक्तिमत्त्वाला 'असामान्य' विशेषण लावावं, एवढं त्या व्यक्तिमत्त्वात असतं तरी काय? की जे व्यक्तिमत्त्व नवीन समजू शकत नाही.

असो! डांगेंनी 'नवीन'ची भूमिकाच चुकीची उभी केली आहे. 'तो अहंकारी असतो आणि दीपाच्या पराभवात तो धन्यता मानतो' हेच मुळी पराकोटीचे असत्य विधान आहे.

कारण हे जर खरं असतं तर हुशार आणि समंजस, मोठ्या व्यक्तिमत्त्वाची वगैरे वगैरे विशेषणं असलेल्या दीपाच्या हे केव्हाच लक्षात आलं असतं आणि तिला तो 'हवा-हवासा' वाटला नसता किंवा 'नवीन' लाही ती 'हवीहवीशी' वाटली नसती; परंतु असं नाहीय.

नवीन दुर्दैवी असतो इतकंच आणि सामान्य 'दीपा' जो संजय 'प्रेम बोलून दाखवतो' त्याचा स्वीकार करते. जर नवीन-नेही प्रेम 'बोलून' दाखवलं असतं तर दीपाने कदाचित संजयला विसरून त्याचा स्वीकार केलाही असता.

**–कु. सुरेखा देवळे,** (मुंबई)

¤ सतरा जानेवारीच्या अंकातील 'अँटिगनी' या नाटकावरील एका वाचकाची प्रतिक्रिया वाचली. मुंबईतही हे नाटक अँटिगनीचे की क्रिऑनचे यावर भिन्न प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. मी 'अँटिगनी'चा मुंबईतला पहिला प्रयोग पाहिला आणि दिवाळी अंकातील नाट्यभाषांतर आवर्जून वाचले. मूळ कथानक जरी काही शतकांपूर्वीचे असले तरी अनुईने त्यावर लिहिलेले नाटक बेचाळीस सालातले आहे. आज मराठी रंगभूमीवर कथावस्तू सादर करण्याचे जे आधुनिक तंत्र दिसून येते ते तिकडे त्याच दरम्यान सुरू झाले असावे हे लक्षात घेतले म्हणजे याही नाट्य-वस्तूच्या मुळाशी ते असावे हे लक्षात येते. (म्हणजे सद्गुण आणि दुर्गुण किंवा पाप-पुण्य असा जुनाट सांकेतिक संघर्ष न दाखवता जीवनाचे वास्तव-दर्शन घडवणे) अर्थातच त्यामुळे हे नाटक कुणाचे म्हणून नाटक-काराला अभिप्रेत होते हा मुद्दा निकालात निघतो. त्यामुळे नाटकावरील प्रतिक्रिया वैयक्तिक विचारधारणेवर होतात.

प्रस्तुत नाटकातला संघर्ष दोन भिन्न विचारधारांचा म्हणजेच त्या त्या विचारांशी संबंधित दोन व्यक्तींचा आहे. बाकीची पात्रे नगण्य आहेत. कारण कथावस्तू नाट्यवस्तू म्हणून उभी करण्यासाठी अपरिहार्यपणे ती आलेली आहेत. आता या दोन विचारधारा

म्हणजे क्रिऑनची प्रौढ बुद्धिनिष्ठता आणि अँटिगनीचा तरुण भावनाशील, आदर्शवाद. आदर्शवाद, ध्येयवाद हे प्रखर बुद्धिवादावर उभे असतील तरच सत्याचा वेध घेऊ शकतात. अन्यथा ते एकांगी आणि कालबाह्य ठरून हास्यास्पद होतात. कारण आदर्शाच्या कल्पना आणि ध्येये ही कालानुसार आणि परिस्थितीनुसार बदलत असतात.

इथे अँटिगनी भावविवश होते ती दोन 'भावां'मुळे. एक : ज्याच्या आत्म्याला सद्‌गती मिळावी अशी तिची इच्छा असते तो प्रत्यक्ष भाऊ आणि दोन : तथाकथित अन्यायाविरुद्ध झगडा देण्याची ऊर्मी. म्हणजेच तिचा लढा शुद्ध भावनिक पायावर उभा राहातो. त्यामुळे बुद्धिनिष्ठ क्रिऑन अँटिगनीला निरुत्तर करून तिचा 'टेम्पो' थोडा उतरवू शकतो, उतरवतो; पण हार मानायला तयार नसलेली अँटिगनी सुखाच्या कल्पनांवरून पुन्हा वाद घालते, फसव्या शब्दांचा डोंगर उभा करते आणि पुन्हा त्या 'टेम्पो'च्या आहारी जाते.

आता क्रिऑनसारखा कलासक्त माणूस जेव्हा बुद्धिनिष्ठ होतो तेव्हा त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका असण्याचे काहीच कारण नाही. (इथे कविमनाच्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी तरुणांना दिलेल्या 'बुद्धिनिष्ठ व्हा' या संदेशाची आठवण येते.) उलट अशा लोकांची बुद्धिनिष्ठता अधिक निकोप आणि निरोगी असते. त्यात दांभिकपणाचा लवलेशही नसतो. त्यामुळेच शेवटी क्रिऑन सगळ्या आप्तांच्या वियोगाचे हलाहल पचवून स्थितप्रज्ञवृत्तीने कामाला लागतो. (गीतेतला स्थितप्रज्ञतेचा महान संदेशही 'यशाचा आनंद किंवा अपयशाचे दुःख या भावनांच्या आहारी न जाता बुद्धिनिष्ठ राहून कार्य करीत राहा' हेच सांगतो.) कारण भावनाशीलता ही कितीही आकर्षक असली तरी अल्पायुषी असते आणि विधायक कार्याला मारक ठरते. त्यामुळे अँटिगनीचे आत्मसमर्पण हा भावनावेगात केलेला आत्मघात ठरतो.

—रमेश भालेकर, (मुंबई)

## जोगतिणींचं जग !

□ श्री. महादेव मोरे यांनी माझ्या पत्राला दिलेले उत्तर २४ जानेवारीच्या अंकात वाचले. श्री. महादेव मोरे ज्या अभिनिवेशाने लिहितात त्यावरून ते सांगतात तेच फक्त सत्य असे मानावे लागेल. आज सगळीकडे मी सांगेन तेच बरोबर व बाकीचे सांगतात ते फक्त चूकच नव्हे तर असत्य, खोटे असे मांडण्याची चढाओढ चाललेली आहे. मोरेसाहेब, आपणही त्यात सामील झाला, धन्य वाटले ! पण अजूनही अशा प्रश्नावर मतभेद दाखवण्याची मुभा आहे हे मी माझे भाग्य समजतो; पण ज्या आवेशाने श्री. महादेव मोरे लिहीत आहेत त्या आवेशात ते एका गोष्टीचे सोइस्कर विस्मरण करतात की, माझे बौद्धिक रिकामेपण दाखवत असतानाच त्यांनी माझ्या पत्रातील अनेक गोष्टी मान्य केलेल्या आहेत आणि एक गोष्ट सर्वमान्य आहे की, कोणतीच चळवळ किंवा व्यक्ती ही कितीही मोठी असली तरी परिपूर्ण नसते, त्याच्या हातून गफलती होतच असतात. त्यामुळे आपल्यासारखे परिपूर्ण ज्ञान (!) असलेले लोक ज्या वेळी लिहितात त्या वेळी सुद्धा आपणास देवदासींच्यासाठी कायदा पूर्वीच अस्तित्वात होता अशासारख्या गोष्टी माहीत नसतात, म्हणून आपले सर्वच लिखाण अयशस्वी ठरले नसते.

आता त्यांच्या पत्राबाबत खुलासा. ज्या देवदासीपरिषदेत ते सहभागी झाले नाहीत त्या परिषदेच्या अयशस्वीपणाबद्दल ते कसे काय ग्वाही देऊ शकतात ? रेणुकादेवीला सोडलेल्या मुलींना जरी 'जोगतीण' म्हणत असले तरी आम्हाला फक्त त्याचाच विचार करावयाचा नव्हता तर देवाच्या नावावर सोडलेल्या सर्वच स्त्रियांचा विचार करावयाचा होता. मोरेसाहेब, आपल्या अगाध ज्ञानावर विश्वास ठेवूनही आपणास नम्रपणे सुचवायचे आहे की, १९३४ च्या देवदासी-कायद्याची जी सरकारी पुस्तिका प्रसिद्ध झाली आहे त्यात गोव्यातील सर्व देवदेवतांना सोडलेल्या भाविणी, खंडोबाच्या मुरळ्या, मल्लम्माच्या जोगत्या या सर्वांचा समावेश देवदासी या संज्ञेत केला गेला आहे. म्हणूनच आम्ही गडहिंग्लजच्या परिषदेला 'देवदासी भगिनी परिषद' हे नाव दिले होते. 'जोगतीण' हा शब्द काय सुचवतो हे मोरेंनीच सांगावे. 'महार', 'मांग' यांना त्याप्रमाणे त्यांच्या जातीप्रमाणे न संबोधता दलित म्हणणे सुसंस्कृतपणाचे आहे त्याप्रमाणे जोगतिणींना देवदासी-भगिनी म्हणणे.

मोरेसाहेब, आज डॉ. बाबा आढाव व माझ्या घरी मीटिंगसाठी समाजवादी पक्षाचे जमलेले सर्वच कार्यकर्ते तुरुंगात आहेत. त्यामुळे आज त्यांची साक्ष काढणे अशक्य आहे; पण एका गोष्टीचे मात्र तुम्हाला आश्वासन देतो की, ज्या वेळेस संधी मिळेल त्या वेळी त्यांची साक्ष अवश्य काढू व माझे खोटे असेल तर मी जाहीर माफी मागण्यास तयार आहे. तितका प्रामाणिकपणा माझ्याकडे जरूर आहे. सर्वांना पत्रे घातली आहेत.

आपल्या लेखात व पत्रात नेहमी महादेव मोरे निपाणीचीच उदाहरणे देतात. त्यावरून त्यांचे विश्व किती मोठे आहे हे त्यांनीच जाणून घ्यावे. 'गडहिंग्लजजवळच संकेश्वर व निपाणी ही शहरे आहेत. त्यातील किती लोकांना देवदासीपरिषदेसंबंधी माहिती आहे ?' असे ज्या वेळी मोरेसाहेब विचारतात त्या वेळी त्यांना हे माहीत नसते की संकेश्वर, कणगले या गावांतून देवदासी-भगिनी चालत परिषदेसाठी आल्या होत्या.

त्याचप्रमाणे झुलव्यासंबंधी डॉ. अरुण लिमये यांनी विजापूर, अथणी, पुणे वगैरे भागांतील अनेक देवदासींना भेटून मुलाखती घेतल्या होत्या व देवदासीपरिषदेत देवदासी-भगिनींनी जे अनुभव सांगितले होते त्यावरून 'झुलवा लावून' (माझी चूक मान्य.) घेतलेल्या किती सुदैवी स्त्रिया असतात हा सवाल मी विचारला होता. निपाणीतील वखारीतील स्त्रियांबद्दल मोरेसाहेब, आपण सांगण्याची गरज नाही. मी त्यांच्या युनियनचा सचिव आहे. तेव्हा मोरेसाहेब, आपले विश्व निपाणीपुरतेच मर्यादित असल्यामुळे आपली स्थिती विहिरीतील बेडकाप्रमाणे झाली आहे.

अशा सामाजिक प्रश्नासंबंधी ज्या वेळी चळवळीसाठी उभे रहावे लागते त्या वेळी संघर्षाबरोबरच कायद्याचा आधार आवश्यक असतो. त्यामुळे प्रचलित कायदा, प्रबोधन व संघर्ष याद्वारेच अशा प्रश्नासाठी चळवळ

उभी करावी लागते. कोणतीही चळवळ प्रथम लहान व उपेक्षितच असते. मोरेसाहेब, आपण अनेक चळवळी केल्या आहेत असे म्हणता आणि इतके ज्ञानही आपणास नसावे त्यावरून आपले बौद्धिक भरीवपणच जाणवते ना ?

मोरेसाहेब, आपल्या लिखाणाबद्दल मला प्रेमच आहे म्हणून ज्या ज्या वेळी निपाणीत दुर्गाताई भागवत, नारायण सुर्वे यांसारखी मंडळी येत असतात तेव्हा आस्थेने मी आपली ओळख करून देऊन आपले कौतुक करीत असतो. त्यामुळे आपण पूर्वीपासून लिहिना याची जाणीव मला करून देण्याची गरज नाही; पण ' आज ' या शब्दाला काही अर्थ नाही काय ? माझ्यासारख्या भूगोलाच्या प्राध्यापकाने एवढ्या मोठ्या लेखकास समजून देण्याची गरज आहे असे मला वाटत नाही.

समाजवादी पक्षाबद्दल ( ज्याला प्रकांड-पंडित श्री. महादेव मोरे प्रजासमाजवादी पक्ष म्हणतात ) एवढा राग का आहे कोणास ठाऊक ! कदाचित डॉ. बाबा आढाव मराठा जातीयवादावर कडाडून हल्ला करीत असल्यामुळे असेल; पण ज्या श्री. राम फडतरे यांच्याबरोबर महादेव मोरे यांनी चळवळी केल्या असे ते म्हणतात, ते समाजवादी पक्षाचेच आहेत ना ? समाजवादी पक्षाने काय केले हे मी मोरेंना सांगत बसत नाही. फक्त एवढीच जाणीव करून देतो की सद्यःस्थितीत समाजवादी पक्ष व समाजवादीपक्षांतर्गत ' साधना ' सारखी पत्रे जी कामगिरी बजावत आहेत त्यापुढे नतमस्तक व्हावे अशी परिस्थिती आहे. त्याला मोरेंच्यासारखी मंडळी खुशाल चुकीचा किंवा अव्यवहार्य मार्ग म्हणू देत.

मोहन धारियासारख्या मंडळींना गल्ली-बोळातून समाजवादाबद्दल व्याख्याने देत फिरणारे नेते म्हणणाऱ्यांच्याकडून यापेक्षा जास्त सुसंस्कृतपणाची अपेक्षा बाळगण्यात काय अर्थ आहे ? या चळवळीसंबंधी आपण जी आस्था दाखवलीत त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. शेवटी क्रॉमवेलचे एक घोषवाक्य देऊन मी माझ्यापुरता हा वाद संपला असे मानतो.

क्रॉमवेल म्हणतो, ' आपण चुकण्याची शक्यता आहे हे ध्यानात ठेवा ! '

**सुभाष जोशी, निपाणी**

□ सा. ' माणूस 'मध्ये जोगतिणींच्या जीवनावरील लेख वाचून मुंबईच्या एका वाचकाकडून एक बोलकी प्रतिक्रिया आलीय. महिना ४५० पर्यंत मिळविणारे हे गृहस्थ ४२ वर्षांचे आहेत. २८ ते ३६ वयाची एखादी वेश्या जर खरोखरीच गृहिणीजीवन जगू इच्छित असेल तर तिचा स्वीकार करावयास सदरहू गृहस्थ तयार आहेत. ' श्री. मोरे यांच्या लेखाला उत्तर म्हणून ज्यांनी (प्रा. जोशींनी) लिहिले ते माझ्यासाठी असा प्रयत्न करू शकतील का ? ' असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. त्यासंबंधाने थोडेसे—

एखाद्या वेश्येचा गृहिणी म्हणून स्वीकार करणाऱ्याचं मन खरोखरीच आभाळाएवढं. माणसांतील ही देवमाणसं. फत्तराच्या मूर्तीवर डोके ठेवण्यापेक्षा अशा देवमाणसांच्या पायांवर डोके ठेवावे, अशा योग्यतेची ही माणसं...पण वरील गृहस्थ प्रा. जोशींच्या व त्यांच्या चळवळीसंबंधाने जो भाबडा प्रश्न विचारतात, तिच्यासंबंधाने वस्तुस्थिती काय आहे ? तर डॉ. बाबा आढावांना तुरुंगात घातल्यावर सारी चळवळ थंड झालीय. प्रा. जोशींसारखे प्रजासमाजवादी कार्यकर्ते आपापसात भांडणे व वाद घालणे ह्यातच जास्त शक्ती खर्च करतात; त्यामुळे केवळ नेते व कार्यकर्ते ह्यांचाच तो पक्ष मानावा लागतो. डॉ. आढाव तुरुंगात असले म्हणून काय झाले, ह्या प्रा. जोशींसारख्या कार्यकर्त्यांनी हे आंदोलन का चालू ठेवू नये ? म्हणून माझ्यासारख्यांना वाटते की, हा पांढरपेशांचा केवळ एक राजकीय स्टंटच होता ! खरोखरीच ह्या लोकांना ह्या प्रश्नाची एवढी तळमळ असती तर सध्या यल्लम्माची यात्रा सुरू आहे, (ही यात्रा माघ पौर्णिमेपर्यंत चालणार आहे.) ह्याच वेळी ही मंडळी अशी गप्प बसली नसती ! म्हणून वेश्यांचा गृहिणी म्हणून स्वीकार करण्यास जे तयार असतील त्यांचेसाठी प्रा. जोशी व त्यांचे नेते सध्या तरी काहीही करू शकत नाहीत. मी त्यांना खूपच जवळून ओळखत असल्यामुळे इतके ठाम विधान करू शकतो. शिवाय अशीही बरीच उदाहरणे मला आढळून आलेली आहेत की, वेश्यांच्या बरोबरचा प्रपंच फारच थोड्यांना सुखावह झालेला आहे. एक वेश्या म्हणून ज्या चाकोरीतून स्त्रीचे आयुष्य गेलेले असते त्याला गृहिणी झाल्यावर एकदम मुरड पडते. पान-दारू आदि वेश्याजीवनातील काही सवयी तर सुटता सुटत नाहीत. परिणामतः भांडणे, मारझोड सुरू होते आणि गृहिणी झालेली वारयोषिता परत पूर्वीचाच आपला धंदा बरा म्हणून निघून जाते किंवा विपरीत अनुभवाने आत्महत्या तरी करते. सारांश, असे प्रपंच फारच थोडे सुखी झालेले आहेत. हा एक वेगळाच लेखाचा विषय असल्याने तूर्त एवढंच. तरीही, कुणाला खरोखर अशा स्त्रियांचा उद्धार करावयाचा असेल तर पंढरपूरसारख्या ठिकाणच्या सुधारगृहांतील एखाद्या स्त्रीचा स्वीकार करणे चांगले.

**—महादेव मोरे**

हा वाद आता थांबवला आहे—सं.




अमेरिकेतील प्रसिद्ध स्त्री-कार्यकर्त्या, तसेच भारतात पुणे येथे राहून महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीवर प्रबंध लिहून कॅलिफोर्निया विद्यापीठाची डॉक्टरेट मिळविलेल्या कु. गेल ऑमव्हेट या काही दिवसांपूर्वी लातूरला गेल्या होत्या. तेथे त्यांची काही व्याख्याने झाली. ही व्याख्याने व प्रत्यक्ष मुलाखत या आधारे लातूरचे श्री. वि. पां. दबडगावकर यांनी तयार केलेला लेख.....

# कोणी तरी रानडुकराच्या विरोधात उभे राहण्याची हिंमत करायलाच हवी....जॉन लिटल

गेल्या दहा वर्षांत अमेरिकेत अनेक काळ्या वर्णाच्या स्त्रिया प्रसिद्ध झाल्या आहेत. अल्बामामधील माँटगोमेरी येथे राहणारी कु. रोसा पार्कस. ही एक मोलकरीण. हिने माँटगोमेरी येथे बसप्रवासाचा बहिष्कार व नागरी हक्कांची चळवळ सुरू केली. बसमध्ये उभे राहून प्रवास करण्यास हिने नकार दिला. (त्या वेळी काळ्या वर्णाच्या स्त्री-पुरुषांना बसच्या मागच्या बाजूस उभे रहावे लागे व बसण्यासाठी बैठका फक्त गौरवर्णीयांसाठी समोरच्या बाजूस असत.) डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांच्या पत्नी कोरेटा किंग यांनी आपल्या पतीचे उर्वरित कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिकन काँग्रेसच्या सदस्या शर्ले खिशरेम या एकमेव काळ्या वर्णाच्या स्त्रीने अमेरिकन अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. (तिच्या मतानुसार काळ्या वर्णाच्या पुरुषापेक्षाही स्त्रीस राजकारणात भाग घेणे अत्यंत कठीण आहे.) त्याचप्रमाणे तत्त्वज्ञानाची एक अत्यंत हुशार विद्यार्थिनी असलेली एंजला डेव्हिस हिने 'ब्लॅक पँथर' चळवळीत भाग घेतला व दंगेखोर कृष्णवर्णीय कैद्याबरोबर तुरुंगवासही पत्करला. शेवटी ती मास्कोवादी कम्युनिस्ट पक्षात सामील झाली.

परंतु गेल्या दहा वर्षांत सर्वांत प्रसिद्ध झालेली कृष्णवर्णीय स्त्री ही राजकीय नेता, सुशिक्षित संघटक किंवा एखाद्या सुप्रसिद्ध व्यक्तीशी संबंधित, यापैकी कोणीही नाही. तिचे नाव जॉन लिटल आहे. ती २० वर्षांची, अत्यंत कमी शिकलेली. अमेरिकेच्या दक्षिण भागातील एका गरीब कुटुंबातील मुलगी. या मुलीवर घरफोडीच्या आरोपाखाली न्यायालयात खटला चालू होता व नुकतेच तिला एका खुनाच्या आरोपातून निर्दोष ठरविले गेले आहे.

अमेरिकेतील कृष्णवर्णीय स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचाच घटक असलेली जॉन लिटल ही कृष्णवर्णीय स्त्री. हिने स्वतःचा एका बलात्कारापासून बचाव केला व दुष्ट कृत्यास व जुलुमालादेखील विरोध केला जाऊ शकतो हे दाखवून दिले आणि ज्यांनी तिला पाठिंबा दिला त्यांनी दाखवून दिले की एकजुटीने फक्त विरोधच शक्य होत नाही तर विजय देखील मिळू शकतो.

ऑगस्ट १९७४ मध्ये जॉन ही एका उत्तर कॅरोलिनामधील प्रांतीय जेलमध्ये घरफोडीच्या आरोपाखाली न्यायालयीन चौकशीसाठी तुरुंगवास भोगत होती या खटल्यात तिच्या भावावरही आरोपपत्र होते; पण त्याने सर्व आरोप जॉनवर लादणारे निवेदन लिहून देऊन स्वतःची सुटका करून घेतली. अनेक काळ्या वर्णाच्या गरीब मुलींप्रमाणे कैदेमध्ये तिलाही आत्यंतिक छळास व गौरवर्णीय जेलरच्या लैंगिक भुकेच्या आक्रमणास तोंड द्यावे लागले. याच प्रयत्नात जेलर तिला वारंवार लैंगिक भूक भागविण्यासाठी सांगत होता. एका रात्री या जेलरने तिच्या तुरुंगाच्या खोलीत प्रवेश केला व तिच्या नकारानंतरही तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला.

अत्यंत असहाय व त्वेषाच्या स्थितीत जॉनने हाती एखादे शस्त्र मिळविण्याची धडपड केली. बर्फ कोरण्याचे शस्त्र तिच्या हाती पडले. तिने त्याचा वार जेलरवर करून त्याला ठार मारले व नंतर ती तेथून पळून गेली. पुरावा स्पष्ट होता, की त्या जेलरने लैंगिक सुखासाठी जॉनच्या खोलीत प्रवेश केला होता; पण जेलच्या अधिकाऱ्यांनी तिच्यावर खुनाचा खटला चालवण्याचे ठरवले व तिला शोधण्यासाठी पोलीस, कुत्रे व रायफली यांचे पथक पाठवले, ज्यांना दिसताक्षणी गोळ्या घालण्याचा हुकूम देण्यात आला होता. जॉन आपल्या मित्रांच्या सहाय्याने लपून राहिली होती व या काळात तिने एक वकील मिळवण्याचा प्रयत्न केला आणि नंतर ती स्वतः होऊन पोलिसांच्या स्वाधीन झाली. त्यानंतर न्यायालयात तिच्यावर खुनाच्या आरोपाखाली खटला सुरू झाला; पण जॉन आता अगदीच एकटी, अपरिचित किंवा असहाय्य स्त्री राहिली नव्हती. तिच्या खटल्याची माहिती सर्वत्र पसरू लागली व लोकांनी तिच्या बचावासाठी निदर्शने करण्यास सुरुवात केली. स्त्रीसंघटना, कृष्णवर्णीयांच्या संघटना या सर्वांनी मिळून तिला पाठिंबा दिला. जॉनची कृती व तिच्यावरील खटला यावर सर्व अमेरिकेचे लक्ष केंद्रित झाले. याचे कारण काय? तर हा खटला अमेरिकेतील स्त्रियांसमोर, तेथील स्त्रियांना ज्या अनेक वाईट समस्यांना तोंड द्यावे लागते, त्याचप्रमाणे कृष्णवर्णीय व अल्पसंख्याकांना ज्या अत्याचाराचा सामना करावा लागतो व गरीब कैद्यास जो छळ सोसावा लागतो त्याचे प्रतीक बनला होता.

भारतातील दलित, आदिवासी, शेतमजूर स्त्रिया, गरीब स्त्रिया, विशेषतः अल्पसंख्यांकांच्या स्त्रियांसमोरदेखील वरीलप्रमाणे प्रसंग मोठ्या प्रमाणात उद्भवतात; पण अमेरिकेत विद्यार्थिनी व मध्यमवर्गीय स्त्रियांनादेखील अशा छळणुकीचा त्रास सहन करावा लागतो. यथाशक्ती अशा प्रसंगाचे निर्दालन करण्यासाठी त्यांच्याकडून सामूहिक व संघटनात्मक आवाज उठविला जातो.

अमेरिकेसारख्या धनसंपन्न समाजात अत्यंत

जलद गतीने वाढणारा गुन्हा म्हणजे बलात्कार होय. स्त्रियांना तर असे वाटायला लागले आहे, की न्यायालयात किंवा पोलिसाद्वारे न्याय मिळणे शक्यच नाही. बहुतेक बलात्काराच्या खटल्यात आरोपीला निर्दोष सोडले जाते. स्त्रीनेच फूस लावण्याचा प्रयत्न केल्यामुळे गुन्हा घडला असे आरोपीतर्फे निवेदनात सांगितले जाते.

कृष्णवर्णीय स्त्रियांची तर स्थिती यापेक्षाही वाईट आहे. कृष्णवर्णीयांना असे वाटते, की शहरातील पोलिस हे परकीय सैन्याप्रमाणे आहेत आणि न्यायालयात न्याय मिळू शकणार नाही.

अमेरिकेतील तुरुंगाची स्थिती ही अत्यंत वाईट आहे व सातत्याने तेथे जेलरकडून छळाचा प्रयत्न होतो. कृष्णवर्णीय, स्पॅनिश भाषा बोलणारे अल्पसंख्यांक, गौरवर्णीय यांच्यामध्ये दंगे व्हावेत म्हणून चिथावणी देण्याचा प्रयत्नही पोलिसांकडून होतो. दंगेखोर कैद्यांची अमानुष हत्या यानंतर केली जाते. जॉर्ज जॅकसन व इतरांची कॅलोफोर्निया तुरुंगामध्ये काही वर्षांपूर्वी अशीच हत्या करण्यात आली. अलीकडच्या काळात कैद्यांनी आपल्या संघटना बांधण्यास सुरुवात केली आहे. कैद्यांच्या संघटना आता बनल्या आहेत. न्यूयॉर्क राज्यातील अटिकामधील दंग्यात काही दंगेखोर कैदी होते. त्यांना मुक्त करावे म्हणून हजारो कृष्णवर्णीय व गौरवर्णीय कैद्यांनी मिळून तुरुंगाचा ताबा घेतला; पण नेल्सन रॉकफेलरनी पाठवलेल्या पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार करून त्यांचा प्रयत्न हाणून पाडला. अटिकामधील कैद्यांची न्यायालयीन चौकशी अजून चालू आहे. या तुरुंगातील एका कृष्णवर्णीय कैद्याचे दंग्याच्या काळातील आवाहन अजूनही स्मरणात आहे.

सर्व जगातील सर्व पददलितांना सांगा की आम्हाला उत्तर मिळाले आहे.

'उत्तर आहे एकजूट'

एक स्त्री, एक कैदी व एक कृष्णवर्णीय यापैकी जॉन सर्व भूमिकात होती. तिचा स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न दडपशाहीच्या विरोधाचा प्रतीक बनला होता आणि म्हणून तिला पाठिंबा देण्यासाठी सर्व देशभर निदर्शने झाली. वकिलांनी स्वयंस्फूर्तीने आपली मोफत सेवा देण्याची तयारी दर्शविली. तिच्या जामिनासाठी व आवश्यकतेसाठी निधि उभारण्यात आला व हजारो लोक तिच्यावर ज्या शहरातील न्यायालयात खटला चालू होता तेथे भेट देऊ लागले. त्यांनी न्यायाधीश व ज्यूरी यांना दाखवून दिले की अमेरिकन लोक तिच्यावरील खटल्यासंबंधी जागरूक आहेत व त्यांचा तिला पाठिंबा आहे.

जॉन लिटलवर स्वतःस आलेल्या अनुभवाचा फार परिणाम झाला होता. फक्त तिला मिळालेल्या वागणुकीनेच नव्हे तर तिने तुरुंगातील गरीब कैद्यांची जी शोचनीय अवस्था पाहिली होती तिचा तिच्या मनावर खोलवर परिणाम झाला होता. ती म्हणते मी तुरुंगात एका अपरिपक्व अवस्थेत गेले. मी हळवी व सरळ होते. मी जेव्हा बाहेर पडले तेव्हा एक लुटारू बनून बाहेर पडले. मी अन्याय करणाऱ्यावर उलट हल्ला करण्यास केव्हाही तयार होते. कारण मला ते स्वतःसाठीच सर्व करीत आहेत असे दिसून आले.

शेवटी ऑगस्ट १९७५ मध्ये जॉन लिटलला खुनाच्या आरोपात निर्दोष व निष्पाप ठरविण्यात आले. हे सिद्ध करण्यात आले की तिची क्रिया स्वतःच्या बचावासाठी होती; पण हा खटला तिचे मतपरिवर्तन करू शकला नाही. गरिबांना न्यायालयात न्याय मिळणे अशक्य आहे असेच ती समजते. तिला वाटते की फक्त एकतेमुळे, लोकांच्या संघटनात्मक एकजुटीने लढण्याच्या पवित्र्यामुळे, सामूहिक बुलंद आवाजामुळेच ती मुक्त होऊ शकली

एका पत्रकाराने तिला विचारले, 'तुम्हाला निर्दोष सोडल्यानंतर न्यायालयाबाबत काही वेगळे वाटते का?' तिने उत्तर दिले 'नाही, मला लोकांच्या शक्तीनेच मुक्त केले आहे.'

आणि म्हणून जॉनने राजकीय कार्यकर्ती बनण्याचा निश्चय केला आणि संघटना बांधण्यासाठी व सर्वांच्या हक्काच्या रक्षणासाठी संघटनात्मक एकजूट उभी करण्यासाठी तिने स्वतःचे आयुष्य देण्याचा निर्णय घेतला. तिच्यासमोर कोणत्या गटात सामील व्हावे हा प्रश्न होता. तिने एंजला डेव्हिस्‌ची भेट घेतली, जी कृष्णवर्णीय स्त्रियांच्या संघटनेतील प्रसिद्ध संघटक होती. तरी जॉनला मास्कोवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वेळकाढूपणाची व पक्षाभिमानी राजकारणाची किळस आली होती. ती एका पत्रकारपरिषदेत म्हणाली, शेवटपर्यंत एंजला माझ्या खटल्यात आली नाही. नंतर तिने मला कम्युनिस्ट पक्षात ओढण्याचा प्रयत्न केला.

सध्या मजबूत पायावर आधारित अशा कम्युनिस्ट संघटना कृष्णवर्णीयात व मजुरात अमेरिकेमध्ये आढळून येत नाहीत. जरी बऱ्याचशा संघटना अलीकडे दिसत असल्या तरी त्या विशेष समर्थ नाहीत. म्हणून जॉनने ब्लॅक पँथरसमवेत काम करण्याचे ठरविले. पँथरचे किती तरी लढाऊ नेते (फ्रेड हॅम्प्टन, जॉर्ज जॅकसन) यांची हत्या झाली. त्या वेळी बरेच जण वेळकाढू निघाले तर बऱ्याच जणांनी चळवळ सोडली. (एंड्रीज क्लेव्हर प्रमाणे) पँथर्सना देशव्यापी असलेला पाठिंबाही कमी झाला; पण त्यांनी पुनर्बांधणी केली व अनेक प्रांतात पुन्हा पाया रचला. ऑकलंडमध्ये त्यांचे ब्लॅक पँथर नावाचे वृत्तपत्र सध्याही डेव्हिड ड्युबॉईस यांच्या संपादनाखाली प्रकाशित होते. डेव्हिड हे प्रसिद्ध निग्रो नेते डब्ल्यू ई. बी. ड्युबॉईस यांचे सुपुत्र आहेत.

एक पँथर या नात्याने जॉनची उत्तर कॅरोलिनामध्येच सामाजिक व राजकीय कार्य करण्याची इच्छा आहे. तिला विचारण्यात आले की दक्षिणेत परतणे तिला सुरक्षित वाटते का किंवा दक्षिणेत काम करणे तिला पसंत पडेल का? कारण तेथे गौरवर्णीय प्रतिगामी व कृष्णवर्णीयांची स्थिती फार गरिबीची व हलाखीची आहे. तिने सांगितले की 'नाही. एखाद्याने मला ठार मारले तर पोलीस त्यास पदक बहाल करतील.'

एका पत्रकाराने नंतर तिला विचारले 'उत्तर कॅरोलिनामध्येच का काम करू इच्छिता?' तिने बाणेदार उत्तर दिले, 'कोणी तरी रानडुकराच्या विरोधात उभे राहण्याची हिम्मत करायलाच हवी.'

□ □

प्राप्त परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे व सामाजिक-आर्थिक दुष्टप्रवृत्ती नाहीशा करणे ही दोन उद्दिष्टे साध्य व्हावीत या दृष्टीने वीस कलमी कार्यक्रमातील सुरुवातीच्या अकरा कलमांची योजना झालेली आहे. या कलमांसंबंधी विचार गेल्या दोन अंकांत आला. या अंकी या लेखमालेतील तिसरा व शेवटचा लेख.

या लेखांकात आलेल्या काही कलमांचा उद्देश उत्पादनवाढ आणि मूलभूत आर्थिक ढाचा बळकट करणे हा आहे.

# वीस कलमी कार्यक्रम

लेखांक तिसरा : प्रा. रा. म. बिवलकर

## १२. सजल क्षेत्रवाढ

वीस कलमी कार्यक्रमाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आर्थिक चोंद्या दूर करणे आणि मूलभूत आर्थिक ढाचा समर्थ करणे हे आहे. त्या दृष्टीने या कृषिप्रधान पण अन्नधान्य-टंचाईने ग्रासलेल्या देशात, शेतमालाचे उत्पादन वाढावे, या दृष्टीने अधिक प्रदेश सजल शेतीखाली आणण्याचे प्रयत्न पाच वार्षिक योजनाद्वारा सतत चालू आहेत तरीही या देशाचे दुर्दिन संपत नाहीत हे पाहून या कार्याला गती देण्याच्या दृष्टीने पंतप्रधानांच्या वीस सूत्री कार्यक्रमात त्याला अग्रक्रम दिला गेला. त्यातून ५० लाख हेक्टर जमिनीला पाणी मिळणार आहे आणि भूस्तराखालील पाण्याचा शोध लावून त्याचा उपयोग करण्यासाठी राष्ट्रीय स्वरूपाचा कार्यक्रम हाती घेतला जाणार आहे.

या देशातील नांगरटीखालच्या एकूण क्षेत्रापैकी फक्त २२.२ टक्के जमीन पाण्याखाली आहे. बाकी सान्या क्षेत्राला लहरी पावसावर अवलंबून राहावे लागते आणि एका पिकावर समाधान मानावे लागते. एवढा मोठा देश शतकानुशतके पावसाच्या लहरीवर जगावा ही गोष्ट भूषणावह खचित नाही. त्यामुळे ओलवाहू जमिनीचे क्षेत्र वाढवणे राष्ट्रीय कार्यक्रमात महत्त्वाचे. १९७२ साली 'जलसिंचनसमितीने' (Irrigation Commission) या देशातील भूपृष्ठावरील व भूस्तराखालील एकूण पाण्याची पाहाणी करून, या देशात ८७००० कोटी घनमीटर एवढे पाणी वापरण्यायोग्य आहे व त्यातील आज (मार्च ७४) फक्त ३३७०० कोटी घनफूट पाण्याचा वापर भारत करीत आहे; बाकी सारे पाणी फुकट जाते, असा हिशेब मांडला. १९५०-५१ साली १७२५० कोटी घनमीटर पाणी वापरले जात होते. तो आकडा ७४ साली ३३७०० कोटी घनमीटरावर गेला ही जलसिंचनक्षेत्र वाढविणाऱ्या योजनांची मंदगती संतापजनक आहे. त्यालाही अनेक कारणे आहेत हे खरे; पण त्याचे विवेचन इथे नको. कूर्मगतीने जाणाऱ्या योजनाबद्ध कार्यक्रमाला गती देण्याचे कार्य वीस कलमी कार्यक्रमातील या सूत्राने केले, ५० लक्ष हेक्टर जादा जमीन पाण्याखाली आली आणि ती नगदी पिकांऐवजी अन्नधान्यनिर्मितीसाठी वापरली गेली तर या देशातील अन्नधान्य-उत्पादन लक्षात येण्याएवढे वाढेल यात शंका नाही. शंका फक्त एवढीच. पाचवी पाच वार्षिक योजना जाहीर होऊन कार्यवाहीत आली नसली तरी वार्षिक योजनांनी आखलेला कार्यक्रम पुढे रेटला जात आहे. वरील ५० लाख हेक्टर त्या योजनेपैकीच की त्याशिवाय जादा ? त्याकरता निराळा भांडवलपुरवठा केला जाणार आहे का ? २० कलमी कार्यक्रमात त्याचा उल्लेख नाही. राज्यांनी योजना आखल्या आहेत. पैशाकरता ती केंद्राकडे डोळे लावून बसली आहेत!

पंतप्रधानांच्या ११ नोव्हेंबरच्या आकाशवाणीवरील भाषणात पाटबंधारे योजनांसाठी १०० कोटी रुपये उपलब्ध केल्याचा व यंदा ३० लक्ष हेक्टर जादा जमीन पाण्याखाली येत असल्याचा उल्लेख होता; तरी पण हा खर्च योजनाबाह्य की योजनांतर्गत याचा स्पष्ट उल्लेख त्यांनी केलेला नाही. गतिदायी कार्यक्रमात या गोष्टी स्पष्ट होणे आवश्यक असते!

## १३. वीजनिर्मितीत वाढ

औद्योगीकरणाबरोबर या देशाची विजेसारख्या शक्तिसाधनाची भूक वाढत आहे. शिवाय विकासकार्यक्रमातील खेडोपाडी वीज पुरविण्याच्या धोरणामुळे विजेची मागणी सारखी वाढत आहे. आजवर धरण-प्रकल्प व त्याखाली जलविद्युत्केंद्रे उभारणे यावर भर देऊन आणि औष्णिक आणि आण्विक पद्धतीने वीज निर्मिणारे प्रकल्प उभे करूनही, पावसाने फसविले की देशात वीजपुरवठ्याबाबत 'आणीबाणी' निर्माण होते असा अनुभव आहे. १९७४-७५ साली पावसाळ्यापूर्वी १७ टक्के विजेचा तुटवडा पडला. औद्योगिक उत्पादन वाढावे अशी निकड असता विजेअभावी त्याची गती मंदावली. देशाच्या आर्थिक सुस्थितीच्या दृष्टीने हे वारंवार घडता नये. त्यामुळे शक्तिउत्पादनाचे प्रकल्प योजनांतर्गत असूनही या कार्यक्रमांनाही गती देण्याचे वीस कलमी आर्थिक कार्यक्रमाने ठरविले. १९७५-७६ साली एकूण वीजनिर्मितिक्षमता २० टक्क्यांनी वाढावी असा जोष या कार्यक्रमात ओतला जात आहे. या वर्षी गतवर्षीच्या १·७ दशलक्ष किलोवॅटएवढ्या वाढीऐवजी २·६ दशलक्ष किलोवॅटएवढी वीजनिर्मितिक्षमतेत वाढ केली जाणार आहे. त्यामुळे १९७५-७६ सालात एकूण क्षमता २२.७२ द. लक्ष किलोवॅटएवढी होईल. त्याकरता

विविध राज्यांच्या वीजनिर्मितिप्रकल्पांना जसा सक्रिय पाठिंबा दिला जाईल तद्वतच सिंगारेजी, भोर्बा, फरावका आणि नेवेली येथे केंद्रातर्फे सुपर-थर्मलस्टेशन्स् उभारण्याचे ठरले आहे. या औष्णिक वीजनिर्मितिकेंद्रांची प्रत्येकी उत्पादनक्षमता १२०० ते २००० मेगावॅट एवढी राहणार आहे.

महाराष्ट्र राज्याला ८०० मेगावॅट विजेचा तुटवडा आहे. पावसाने फसवले तर या राज्याची आणखीच अगतिक परिस्थिती होते. त्यामुळे केंद्रीय मान्यतेसाठी या राज्याच्या अनेक योजना ठेवल्या गेल्या आहेत. चंद्रपूर (१३०० मे. वॅ.) खापरखेडा-विस्तार (१२० मे.वॅ.) परळी विस्तार (१२० मे. वॅ.) उमरेड (४०० मे. वॅ.) न्हावाशिवा (२००० मे. वॅ.) आणि तुर्भे (टाटा) विस्तार (५०० मे. वॅ.) अशा एकूण ४४४० मे. वॅ क्षमतेच्या योजना केंद्रदप्तरी मंजुरीची वाट पाहात आहेत. राज्याच्या औद्योगिक प्रगतीचा विचार करता वीस कलमी सूत्रांतर्गत कार्यक्रमात महाराष्ट्राला अग्रक्रम मिळायला हवा. कारण या वर्षाअखेर कोराडी (२४० मे. वॅ.), कोयना तिसरा टप्पा (२४० मे. वॅ.) आणि वैतरणा (६० मे. वॅ.) अशी एकूण ५४० मे. वॅ. जादा वीज निर्माण होऊनही राज्याची वाढती तूट भरून येणार नाही.

पण हे सर्व प्रकल्प पैसा मागणारे आणि विलंबाने कार्यान्वित होणारे. धडक कार्यक्रम म्हणून त्यातल्या काहींना अग्रक्रम देऊन केंद्राने वीजनिर्मितीचा इष्टांक जून ७६ पूर्वी गाठायला हवा.

## १४ : भांडवलगुंतवणपद्धतीत उदार धोरण

उद्योगांना परवाने देण्याचे धोरण या देशाच्या विकासाला कसे घातक ठरले या गोष्टीचा उल्लेख वर आलाच आहे. त्या धोरणाबाबत चौकशी व पहाणी करून अहवाल सादर करणाऱ्या सुविमल दत्त समितीने सरकारी धोरणावर चांगलेच ताशेरे ओढल्याचाही वर उल्लेख आहे. उद्योगपरवान्यांच्या धोरणामुळे सुदृढ भांडवल गुंतवणुकीत अडचणी उभ्या केल्या. परवानेपद्धतीवर मात करून देशहित बाजूला सारून स्वत: गबर झाले ते मोठे उद्योगपती. परवान्यांमुळे छोटे उद्योजक गारठून गेले. छोटे गुंतवणदार गप्प बसले. भांडवलाचा मुक्त ओघ जो अर्थव्यवस्थेत यायला हवा होता तो अडखळून पडला. परवानेपद्धतीमुळे लाचलुचपत वाढली, विलंब वाढले, परवान्यांचे 'प्रीएम्पशन' वाढले. ही सारी परिस्थिती देशाच्या आर्थिक आरोग्याला घातक होती. त्यामुळे या कलमाखाली परवान्यांबाबत उदार धोरण स्वीकारायचे सरकारने ठरवले आहे. परवान्यांची पद्धत सुलभ करावी. ज्या उद्योगांना सरकारी मदत अगर परकीय आयातीची जरुरी नाही त्यांची गुंतवणमर्यादा वाढवून द्यावी असेही ठरविले आहे. हे धोरण व्यवहारी आहे असे कुणीही म्हणेल. ते अवलंबिण्यात झालेला विलंब आता त्याची अंमलबजावणी झटपट करून केंद्रसरकारने भरून काढावा. निर्बंधांनी आणि परवान्यांनी आर्थिक जीवन सुदृढ होत नाही.

## १५ : हातमागक्षेत्राचा विकास

हामागाचा धंदा हा या देशातील प्राचीन उद्योग म्हणावा एवढा जुना आहे. या धंद्यावर उपजीविका करणाऱ्यांची संख्या ८० लाख ते १ कोटी एवढी भरेल. शेतीशिवाय एवढ्या मोठ्या संख्येने रोजगार पुरविणारा दुसरा धंदा भारतात नाही. देशभर ३० लाख हातमाग चालतात. हातमागधंद्याचा विशेष हा की यातले ५० टक्क्यांपेक्षा अधिक माग सहकारी क्षेत्रात आहेत; पण हातमाग-विणकरांची आर्थिक स्थिती चांगली नाही. त्यामुळे या धंद्याला यावी तशी ऊर्जितावस्था येत नाही. माणसाच्या मूलभूत गरजांपैकी सामान्यांच्या वस्त्राची गरज भागविणाऱ्या व लाखो लोकांना रोजगारी पुरवणाऱ्या धंद्याला अजूनपर्यंत द्यावे तितके उत्तेजन दिले गेले नाही ही सत्य स्थिती आहे. सरकारने आपल्या नव्या आर्थिक धोरणानुसार या गोष्टीची दखल घेतली आहे. या धंद्याच्या वाढीकरता वेगळ्या हातमाग विकास आयुक्ताची नेमणूक केली जात आहे. धंद्याला रास्त भावाने योग्य तो कच्चा माल मिळेल अशी काळजी सरकार घेणार आहे. काही विशिष्ट प्रकारचे कापड गिरण्यांनी उत्पादन न करता हातमागाकरता राखून ठेवण्याच्या धोरणात सुधारणा केल्या जात आहेत. हातमागाच्या उत्पादनात नवनवीन पद्धती आणणे, वैविध्ये आणणे, धंद्याला हवी ती यंत्रसामग्री पुरवणे, विणकरांकरता घरे बांधणे अशा अनेक योजना त्वरित कार्यान्वित व्हायच्या आहेत.

हातमागक्षेत्रविकासयोजनेत १. १९७८-७९ सालापर्यंत एकंदर हातमागसंख्येपैकी ६० टक्के हातमाग सहकारी क्षेत्रात आणणे. २. सहकारक्षेत्राबाहेर सलग भौगोलिक क्षेत्रात प्रत्येकी ५ ते १० हजार माग उभारणे. ३. देशात ठिकठिकाणी निर्यातीच्या दृष्टीने उत्पादनकेंद्रे उभारणे. ४. अखिल भारतीय हातमागमहामंडळाला लवकरच 'स्टॅच्युटरी बोर्ड' म्हणून मान्यता देणे.

## १६ : 'जनता' कापड

देशात तयार होणाऱ्या सुती कापडापैकी काही भाग सामान्य-गरीब जनतेसाठी नियंत्रित दराने उपलब्ध करावा, या नियंत्रित किंमती गरिबांच्या खिशाला झेपतील अशा असाव्या, या कापडाचा दर्जाही बरा असावा अशा नियंत्रित दराने कापड विकण्याच्या सरकारी योजनेमागे अपेक्षा होत्या. गेल्या काही वर्षांत त्या पूर्ण झालेल्या नाहीत. कापडगिरण्यांनी जरूर तेवढे कापड नियंत्रित दरयोजनेला पुरवले नाही. दिवसेंदिवस या कापडाचा दर्जा फारच खालावला. गिरणीमालक हव्या त्या सबबी सांगून, हव्या त्या मार्गाने संबंधितांची तोंडे बंद करीत. नव्या आर्थिक कार्यक्रमात नियंत्रित कापड-पुरवठ्याचा प्रश्नही धसाला लागला आहे. गिरणीमालकांनी प्रमाणित उत्पादन नियंत्रित कमी दराने विकण्याकरता उपलब्ध केले पाहिजे. त्याची गुणवत्ता ठरल्याप्रमाणे राखली पाहिजे असे आदेश सुटले आहेत. याबाबत एक नवे धोरण सरकार ठरवीत आहे. धोतरे, साड्या, कापड असा माल मोठ्या प्रमाणावर रास्त नियंत्रित किंमतींना उपलब्ध झाला तर कामगार, कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि ग्रामीण जनता सरकारला दुवा देईल. गेल्या २।४ वर्षांत कापडाचे भाव एकसारखे वाढत आहेत त्यांना जरा आळा बसेल.

## १७ : व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग

औद्योगिक शांतता आणि सहकार असला तरच देश समृद्ध होणार. नाही तर देशात हजारो उद्योग असूनही मालक-कामगारसंघर्ष कायम

पृष्ठ २४ वर

# सानेगुरुजींच्या परिसरात

## अण्णासाहेब छापेकरांचा सत्कार

सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. ल. नी. ऊर्फ अण्णासाहेब छापेकर यांचा चाळीसगाव येथे नुकताच श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भव्य सत्कार झाला. चाळीसगाव ही अण्णासाहेब छापेकर यांची कर्मभूमी. १९४२ पासून ५४ सालपर्यंत येथील आनंदीबाई बंकट या नामांकित संस्थेचे ते मुख्याध्यापक होते. किंबहुना ते मुख्याध्यापक होते म्हणून ही संस्था विशेष नामांकित झाली. खानदेशच्या इतर संस्थांशीही त्यांचे जिव्हाळ्याचेच संबंध असल्याने सेवानिवृत्तीनंतर त्यांचा ठिकठिकाणी सत्कार व्हावा अशी त्यांच्या चहात्यांची स्वाभाविक इच्छा होती. सतत सहा वर्षे पिच्छा केल्यावर अण्णासाहेब तयार झाले व चाळीसगावच्या सत्कारास धुळे-जळगाव जिल्ह्यांतील अनेक माजी विद्यार्थी, जे आज मोठमोठ्या पदांवर विराजमान आहेत, जातीने हजर राहिले. अनेकांनी शुभेच्छा-संदेश पाठविले. सिंगापूर येथे अधिकारी असलेले श्री. अंबादास नानीराम शिंपी या माजी विद्यार्थ्याने एकट्याने अण्णासाहेबांच्या सत्कारनिधीस पाच हजार रु. दिले. इतर १२ हजार रु. जमले. सत्कार-समारंभास दत्तो वामन पोतदार, प्रा. दाभोळकर, श्री. अकोलकर, श्री. ग. श्री. खैर, सहस्रबुद्धे आदींनी संदेश पाठविले.

वक्त्यांमध्ये बहुतेक माजी विद्यार्थी होते. त्यांची भाषणे रंगतदार झाली. श्री. प्र. भा. देशपांडे हे अण्णासाहेबांचे सहकारी. त्यांनी आपल्या व्याख्यानात अण्णासाहेबांच्या लोकशाही प्रेमाबद्दल व कार्यपद्धतीसंबंधी माहिती दिली. नवनवे प्रयोग करावेत ही अण्णासाहेबांची इच्छा असे. या प्रयोगांमुळे किती विद्यार्थ्यांचा फायदा होईल ? असे त्यांच्या सहकाऱ्यांना वाटे व मतभेद होत.

अण्णासाहेब सहकाऱ्यांना विचारीत, किती टक्के मुलांना या योजनेचा फायदा होईल असे तुम्हाला वाटते ? सहकारी म्हणत अहो, दहा टक्के विद्यार्थ्यांना या प्रयोगाचा लाभ होईल असे वाटते- अण्णासाहेब लगेच उत्तर देत मी तर पाच टक्के विद्यार्थ्यांचाच लाभ होईल असे गृहीत धरले होते. चला, आता हा प्रयोग करून पाहू. छापेकर आदर्श मुख्याध्यापक असले तरी शिक्षक म्हणूनही ते आदर्श राहिले. ' Head Mastar is a product of very good assistants ' असे म्हणून त्यांनी आपल्यापेक्षाही आपले सहकारी जास्त चांगले होते असे सांगितले. सद्यःस्थिती (अर्थात शैक्षणिक) संबंधी विवेचन करताना शिक्षणक्षेत्रात शासक, शिक्षक, पालक, परीक्षक व विद्यार्थी या घटकांनी एकत्र येऊन सुसंवाद साधला तर सध्याचा शैक्षणिक गोंधळ कमी होईल असे त्यांनी प्रतिपादन केले. शाळेतील प्रत्यक्ष शिक्षण (formal education) घरातील अप्रत्यक्ष शिक्षण (informal education) यात जेवढे अंतर कमी तेवढी लोकशाही यशस्वी होते व हे अंतर भारतात फार असल्याने लोकशाहीच्या यशस्वितेमध्ये अडथळे येतात. अनौपचारिक गृहशिक्षणावर शैक्षणिक प्रगती अवलंबून असते; पण हे शिक्षण कमी कसाचे असल्याने विस्तार होऊनही शैक्षणिक गुणवत्ता वाढत नाही.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ' मूड 'मध्ये होते. शिंपी, शुक्ल, वाणी, कुलकर्णी, शांताबाई हसबनीस व विशेष म्हणजे नगराध्यक्ष अनिलदादा देशमुख यांच्या प्रभावी भाषणाने शास्त्रीबुवा खूष दिसले. भारतीय लोकशाहीचा छापेकरांच्या व्याख्यानातील उल्लेखाचा धागा पकडून तर्कतीर्थांनी सांगितले, ' आपली लोकशाही बाल्यावस्थेत आहे, ती अंथरुणावर पडली आहे, पांघरूण घेऊन पडली आहे, तिने आत्महत्या करायची नसेल तर उच्चतम मूल्यांचा साक्षात्कार झाला पाहिजे. असा साक्षात्कार झाला तरच लोकशाही यशस्वी होईल. हे मूलभूत कार्य शिक्षकच करू शकतो. प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत केल्याखेरीज शैक्षणिक कस वाढणार नाही. बालवयातील संस्कार जीवनभर रहातात. शिक्षक संस्काराद्वारे नवी पिढी कशी घडवू शकतो हे अण्णासाहेब छापेकर यांच्या उदाहरणाने शिकता येईल असेही त्यांनी सांगितले. पू. सानेगुरूजींची कर्मभूमी खानदेशच असल्याने व अण्णांचा त्यांचा संबंध असल्याने बहुतेक सर्वच वक्त्यांच्या भाषणात गुरुजींचा उल्लेख होत होता. सुमारे चार तास चाललेल्या या सत्कारकार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे तो कुठेही कंटाळवाणा झाला नाही. अनौपचारिक व हृद्य वातावरणात तो पार पडला. ◘

## एन्. एस्. एस्. वाचनालय

चाळीसगाव कॉलेजचा विधायक उपक्रम :

चाळीसगाव कॉलेजमधील एन. एस. एस. (राष्ट्रीय सेवा योजना) विभागातर्फे विविध विधायक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. स्वच्छता आणि सुंदरता जीवनात यावी यासाठी अनेक कार्यक्रम सतत चालू असतात. चाळीसगाव येथील अंध शाळेला आर्थिक मदत मिळवून देण्यात तेथील विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके ' वाचून ' दाखवून त्यांचा अभ्यासक्रम पुरा करण्यात एन. एस. एस. विभागाने मोलाची कामगिरी बजावली आहे.

राष्ट्रीय सेवायोजनेद्वारा नुकताच एक अभिनव उपक्रम सुरू झाला. पूज्य सानेगुरुजींची खानदेश ही कर्मभूमी. अनेकांचा त्यांच्याशी संबंध आला. अनेकांची जीवने गुरुजींनी भारून टाकली. या उज्ज्वल पर्वाचे पुनरुज्जीवन करावे व ग्रामीण जनतेशी सांधा जुळवावा म्हणून सानेगुरुजींची सर्व पुस्तके तसेच त्यांच्यासंबंधीची पुस्तके एन. एस. एस. तर्फे खरेदी करण्यात आली असून चार संच तयार करण्यात आले आहेत. एकेक संच ग्रामीण भागातील शाळेस द्यायचा व त्यांचे वाचन झाले म्हणजे तो दुसऱ्या शाळेला द्यायचा असा हा साखळी उपक्रम आहे. संच देण्यासाठी छोटासा कार्यक्रमही होतो. ' बलसागर भारत होवो, खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे ' ह्या गीतांचे सामुदायिक वाचन होते. प्रा. तुंगार, प्रा. खैरनार, व प्रा. गादिया यांची गुरुजींच्या जीवनावर व साहित्यावर व्याख्याने व एखाद्या ग्रामीण विकासयोजनेची माहिती या प्रसंगी देण्यात येते. तलवाडे, रांजणगाव आदि खेड्यांमध्ये या योजनेला फारच उत्तम प्रतिसाद मिळाला.

—देवदत्त तुंगार

प्रगतिपथावरील राष्ट्र

# वीज उत्पादनांत अनेक पटींनी वाढ

1974 मध्ये आपली वीज उत्पादन क्षमता 19 दशलक्ष कि.वॉ. झाली. 1947 मध्ये एकूण वीज उत्पादन क्षमता 1.3 दशलक्ष कि.वॉ. होती.

आज 1.5 लाख खेड्यांना वीज मिळत आहे. शेतांतील 2.44 दशलक्ष पंप-सेट्स्नाहि वीज मिळूं लागली आहे. चालू वर्षीं, या वीज उत्पादन क्षमतेंत आणखीहि 2.6 दशलक्ष कि.वॉ. ची भर पडेल !

## वज्रनिर्धार आणि कठोर परिश्रम हेच आपल्याला तारतील



davp 75/449

# कम्युनिस्ट

## इटली व फ्रान्सची नवी वाट

वा. दा. रानडे

इटली व फ्रान्समधील कम्युनिस्ट पक्षांनी जी नवी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळे कम्युनिस्टजगतात खळबळ उडाली आहे. कारण कामगारवर्गाशी सर्वाधिकारशाही या कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीच्या मुख्य तत्त्वाचाच त्यांनी त्याग केला आहे आणि ज्या भांडवलदारी लोकशाहीचा कम्युनिस्ट नेहमी निषेध करीत आले त्या लोकशाहीची बहुतेक सर्व मूल्ये त्यांनी मान्य केली आहेत. कम्युनिस्ट-देशात कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर पक्षांना स्थान नसते; पण अनेक राजकीय पक्षांचे अस्तित्व मान्य करण्याची या दोन्ही पक्षांची तयारी आहे. विरोधी पक्षांना आपल्या राजकीय भूमिकेचा व कार्यक्रमाचा प्रचार करण्याची पूर्ण मोकळीक असली पाहिजे हे त्यांनी मान्य केले आहे. पार्लमेंटात निरनिराळ्या राजकीय पक्षांना एकत्र येऊन आपले बहुमत प्रस्थापित करता येईल. नेहमी एकाच पक्षाचे किंवा आघाडीचे बहुमत न राहता लोकशाही पद्धतीने त्यात बदल होऊन आजचे अल्प मतवाले पक्ष उद्या बहुमतात येऊ शकतील आणि बहुमतवाले पक्ष बहुमत गमावू शकतील ही शक्यता त्यांनी मान्य केली आहे. राज्याचा कारभार लोकशाही पद्धतीने चालला पाहिजे आणि न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य अबाधित असले पाहिजे या तत्त्वांनाही त्यांनी मान्यता दिली आहे. गेल्या नोव्हेंबरात इटलीच्या कम्युनिस्ट पक्षाचे नेते सिनॉर एन्रिको बर्लिंगर आणि फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाचे नेते जॉर्जेस मार्शा यांची रोममध्ये दोन दिवस बोलणी झाल्यानंतर एक संयुक्त निवेदन प्रसिद्ध झाले त्यात ही भूमिका मांडली आहे.

इटली व फ्रान्सचे कम्युनिस्ट पक्ष पश्चिम युरोपातील दोन मोठे पक्ष आहेत. कम्युनिस्ट चळवळीत तर हे मोठे पक्ष आहेत; पण त्यांच्या देशातही या पक्षांना महत्त्वाचे स्थान आहे व त्यांचे बळ वाढत आहे.

निवडणुकीत इटलीच्या कम्युनिस्ट पक्षाला कसा वाढता पाठिंबा मिळत आहे याची कल्पना १९४६ पासून निवडणुकीतील मतदानाच्या आकडयांवरून येईल. या पक्षाने १९४६ साली फक्त १९ टक्के मते मिळविली होती, ती १९७२ मध्ये २७·२ टक्के आणि १९७५ मधील स्थानिक निवडणुकांत ३३·४ टक्क्यांपर्यंत वाढली. १९७५ च्या निवडणुकांत कम्युनिस्टांना ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षापेक्षा फक्त दोन टक्के मते कमी मिळाली. आपल्या नव्या धोरणाने कम्युनिस्ट आगामी निवडणुकीत हे अंतर सहज भरून काढतील. त्यांना निर्णायक बहुमत मिळाले नाही तरी सत्तेत भागीदारी मिळविण्याइतक्या जागा आपण निश्चित मिळवू असा विश्वास त्यांना वाटतो.'

फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाची भूमिका इटलीच्या पक्षासारखीच आहे. कामगारवर्गाच्या सर्वाधिकारशाहीचे तत्त्व आपण का सोडले, यासंबंधी टेलिव्हिजनवर एका मुलाखतीत फ्रेंच कम्युनिस्टनेते मार्शा म्हणाले, 'आज आपण १८४८, १८७१ किंवा १९१७ च्या काळात नाही. परिस्थितीनुसार आपणास बदलले पाहिजे. सर्वाधिकारशाही आजच्या काळाशी सुसंगत नाही. 'प्रोलेटेरियन' या शब्दाला शास्त्रीय अर्थ असला तरी आजच्या काळात तो योग्य वाटत नाही. आम्हाला केवळ शारीरिक श्रमाची कामे करणाऱ्या कामगारांनाच आपल्या बाजूला वळवायचे नाही तर सर्व पगारदारवर्ग पक्षात आणावयाचा आहे!' खुली वृत्तपत्रे, विरोधी पक्षांना पूर्ण प्रचारस्वातंत्र्य, खुल्या निवडणुका, परदेशी प्रवासाचे स्वातंत्र्य, मतभेद व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य यांचा पुरस्कार फ्रेंच कम्युनिस्ट पक्ष करीत आहे. पक्षाची बाविसावी काँग्रेस या महिन्यात भरणार असून त्यात या नव्या भूमिकेवर शिक्कामोर्तब केले जाईल. पक्षातील 'क्रांतिकारी गटा'चा या नव्या भूमिकेस विरोध आहे; पण हा गट अल्पमतात आहे. पोलिटब्युरोच्या बहुतेक सर्व सभासदांनी या नव्या भूमिकेचा पुरस्कार केला आहे व सर्वसाधारण सभासदांच्या गळी आपण ही भूमिका उतरवू अशी त्यांना खात्री वाटते.

या नव्या भूमिकेचा उगम शोधावयाचा झाला तर आपणास १९६८ पर्यंत मागे जावे लागेल. चेकोस्लोव्हाकियातील ड्युबचेक याचा कम्युनिझमला लोकशाहीची जोड देण्याचा प्रयोग रशिया व वॉर्सा करार राष्ट्रांनी लष्करी हस्तक्षेप करून मोडून काढला. त्याचा निषेध फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाने केला होता. दोन वर्षांपूर्वी ब्रुसेल्स येथे भांडवलदारी राष्ट्रातील कम्युनिस्ट पक्षाची परिषद झाली. त्यात या नव्या भूमिकेची आखणी झाली. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये फ्रान्स व इटलीच्या कम्युनिस्ट नेत्यांनी काढलेल्या संयुक्त निवेदनाने त्याला अधिक बळकटी आणली. 'स्वातंत्र्याची सनद' या नावाने हे संयुक्त निवेदन ओळखले जाते. त्यात खुल्या निवडणुकांपासून पूजास्वातंत्र्यापर्यंत सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याचा समावेश आहे. या भूमिकेमुळे आगामी निवडणुकीत आपण चांगले यश मिळवू असे फ्रेंच कम्युनिस्ट नेत्यांना वाटते. निवडणुकांत समाजवाद्यांबरोबर त्यांची संयुक्त आघाडी राहणार आहे.

फ्रेंच व इटालियन कम्युनिस्टांसारखीच स्पॅनिश कम्युनिस्ट पक्षाची भूमिका आहे. इटालियन कम्युनिस्टांच्या भूमिकेस स्पॅनिश कम्युनिस्टांनी नेहमी पाठिंबा दिलेला आहे. पोर्तुगालच्या कम्युनिस्ट पक्षावर मात्र अजून रशियाचा प्रभाव आहे; पण फ्रेंच, इटालियन व स्पॅनिश पक्षात सहकार्य वाढले तर पश्चिम युरोपातील कम्युनिस्ट पक्षांचा एक नवा प्रवाह कम्युनिस्ट चळवळीत त्यामुळे निर्माण होईल आणि पोर्तुगीज कम्युनिस्टांच्या एका गटास आपण आपल्या बाजूस वळवू असे त्यांना वाटते.

फ्रेंच व इटालियन कम्युनिस्टांच्या या नव्या भूमिकेतून अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. पहिला प्रश्न ही भूमिका कम्युनिझमच्या मूळ वैचारिक अधिष्ठानाशी सुसंगत आहे का? याबाबत हे लक्षात घेतले पाहिजे की लोकशाहीचा मार्ग मार्क्सने वर्ज्य मानलेला नव्हता. ब्रिटनसारख्या देशात लोकशाही मार्गाने समाजवादी क्रांती घडवून आणता येईल असे विचार मार्क्सने व्यक्त केलेले आहेत. तेव्हा ही भूमिका तत्त्वतः चुकीची म्हणता येणार नाही; पण ही भूमिका यशस्वी होण्यासाठी दोन प्रकारच्या धोक्यांना यशस्वीपणे तोंड देता आले पाहिजे. पहिला धोका क्रांतीची, संघर्षाची धार बोथट होऊन पक्ष सुधारणावादाच्या आहारी जाण्याचा संभव असतो. निवडणुकांच्या राजकारणात पक्ष गुरफटला जातो आणि जनतेच्या क्रांति-

पृष्ठ २३ वर

'बर्वे, तुम्ही देता का असे दहा कार्यकर्ते आणून ? तेवढंच आमचं काम हलकं होईल'.... त्याने विचारले. बर्वे निरुत्तर झाले.

# अकरा कोटी गॅलन पाणी

## चासनाला–दुर्घटनेचा चक्षुर्वै वृत्तान्त । अनिल बर्वे

### उत्तरार्ध

'भारतात कोळसाखाणी असल्याचा उपलब्ध लेखी पुरावा १७७४च्याही आधीचाच आहे. अठराव्या शतकातच राणीगंज-भागात कोळसाखाणी खणायला सुरुवात झाली होती. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला कोळसाखाणउद्योगाला बहर आला. ग्रँड ट्रंक रेल्वे सुरू झाली आणि झारिया कोलफील्डमध्ये खाणींना जोर आला...'

इन्स्टिटयूट ऑफ मायनिंगमध्ये बसल्याबसल्या मोहन कुमार-मंगलम् यांचे 'कोल इंडस्ट्री इन इंडिया' हे पुस्तक चाळत होतो. मोहन कुमारमंगलम् यांनी खाणउद्योगाच्या राष्ट्रीयीकरणासाठी सर्वाधिक नेट लावला होता. या विषयावरील त्यांचा अधिकारही मोठा आणि जगन्मान्य. या पुस्तकाचा थोडा शोकांत इतिहास म्हणजे कोळसाउद्योगाची सर्वंकष कल्पना यावी आणि खाणीच्या राष्ट्रीयी-करणाचे महत्त्व लोकांना पटावे, म्हणून कुमारमंगलम् यांनी हे पुस्तक लिहायला घेतले आणि आठवडाभरातच म्हणजे २८ मे ७३ ला ते पुरे करून, डिपार्टमेंट ऑफ माइन्सचे सेक्रेटरी के. एस. आर. चारींकडे पाठवले. त्यांना लिहिलेल्या पत्रात कुमारमंगलम् यांनी लिहिले होते, 'स्क्रिप्ट वाचून काही सूचना, दुरुस्त्यांची आवश्यकता आहे का ते पहावे, पोलंडला जाण्यापूर्वी हे पुस्तक प्रेसला पाठवायचे आहे!'

आणि ३१ मे ७३ ला अचानक मोहन कुमारमंगलम् यांचे निधन झाले. त्यांचे शेवटचे काम म्हणजे हे पुस्तक!

या पुस्तकात खाजगी मालकीमुळे उत्पन्न झालेल्या संकटांचे, धोक्यांचे सविस्तर विवेचन केले आहे. जर राष्ट्रीयीकरण केले नसते तर वीस वर्षांनी भारतात कोकिंग कोल शिल्लकच राहिला नसता, असेही अनेक आकडेवारी, उदाहरणे यांसह स्पष्ट केले आहे. आपल्या-कडे उपलब्ध असलेल्या एकंदर साठ्यापैकी फक्त ४% साठा कोकिंग कोलचा आहे आणि कोकिंग कोलशिवाय धातूद्योग चालू शकणार नाहीत हे लक्षात घेता या विषयाचे गांभीर्य लक्षात येईल.

खाणकामगारांची परिस्थिती पूर्वी कशी होती याचे विदारक दर्शनही या पुस्तकात घडते. एका ब्रिटिश मायनिंग कंपनीच्या डाय-रेक्टरने १९३७ मध्ये डायरेक्टरबोर्डासमोर डिनरच्या वेळी दिलेल्या भाषणाचा एक उतारा आहे. तो उतारा सांगतो...

'नियमित आणि कायम रोजगाराचा प्रश्नच नव्हता. कामाची परिस्थितीही अमानुष होती. मजुराला जोपर्यंत काम करणे शक्य व्हायचे तोपर्यंत तो काम करायचा. नंतर निघून जायचा. पी. एफ., ग्रॅच्युटी वगैरेचा प्रश्नच नव्हता. अपघात झाला की मरायचं. जन्माला येणारा केव्हा तरी मरणारच असतो; मग तक्रार, चीड कशाची?'

खाणीवर काम करायला खेडूत मजूर येत. आपापल्या कुटुंबा-सहित येत आणि बायकामुलांसह ते कुटुंब आठवड्यातून दोनदा खाणीत कामाला उतरे. एकदा खाणीत उतरल्यावर चोवीस तासानेच वर येई. खायची भाकरी घेऊनच खाणीत जात. अनेकदा मजुरांच्या बायका खाणीत त्या अंधारातच बाळंत होत. मग त्या मुलाचा जन्म, नोंदणी खाणव्यवस्थापकाची जबाबदारी ठरे. पगाराचा एक पैसाही उद्यासाठी शिल्लक रहात नसे. मग रोजच कामगारांना येणे भाग पडे. कामगार त्या असह्य वातावरणात काम करून थकून–झिजून रोगग्रस्त होत. काम करणे अशक्य झाले की, स्वतःहून निघून जात. खाणव्यवस्थापक 'खटल्याला' बसे. कामगारांचा न्यायनिवाडा स्वतःच करे. पूजा, उत्सवाचे वेळी कंपनी उदारमनाने कामगारांना धोतरजोडी, मजूरबायांना साडीचोळी फुकट वाटीत असे. अन्न-दात्याला सलाम करत करत ती 'देणगी' कामगार घेत. एवढ्या कठीण परिस्थितीतही 'बाजारच्या दिवशी' चोवीस तासांच्या ड्युटीपेक्षाही मजूर 'ओव्हर टाइम' करत. तेवढेच बाजाराला चार पैसे सुटत.'

स्वातंत्र्यपूर्वकाळातील खाणकामगाराची परिस्थिती अशी होती. त्यांना कामगार म्हणणे अशक्य होते. मजूर म्हणणेही वास्तव नव्हते. ते चक्क 'खाणगुलाम' होते.

स्वातंत्र्योत्तरकाळात कायदे आले. संघटना आल्या. खाणकाम-गारांची परिस्थिती जरा सुधारली. सुधारली म्हणजे मुंबई–पुण्याच्या टेल्को–व्होल्टासच्या कामगारांसारखी झाली नाही; पण अगदी गुलाम होते त्यापेक्षा बरी झाली.

तरी पण आपल्या पित्त्या युनियनच चालू देणे, विरोधी युनियन स्थापन करायचा प्रयत्न झाला तर कामगारांना, कार्यकर्त्यांना ठोकणे, प्रसंगी जिवानिशी मारणे असा खेळ मालकलोक करीतच असत. खाणविभागात त्यांचेच राज्य असे. जसे तमाशाचित्रपटांतील गावात पाटलाचे असते. मालकांकडे पगारी खाणकामगारांप्रमाणेच पगारी लाठीधारी गुंडांची फौज असे. पुन्हा पैसा आणि प्रतिष्ठेच्या जोरावर मालकांचे सरकारदरबारी प्रस्थ मोठेच होते. अशाही परिस्थितीत कामगारांनी असंख्य लढे दिले. पगार, बोनसच्या कागदी मागण्या कागदांवर मान्य करून घेतल्या. कागदावरच्या या मागण्या मालकांनी अरेरावी आणि कामगारांची लढाऊ जिद्द यांत जो वरचढ ठरे त्यावर प्रत्यक्षात येत अथवा न येत.

धनबादहून इंटकचे 'खाणमजूर' नावाचे साप्ताहिक प्रसिद्ध होत होते. या साप्ताहिकात मालकांनी पगार, बोनस यांत काय बनवाबनवी केली, प्रॉव्हिडंटफंडाचे लाखो रुपये कसे वर्षानुवर्षे दाबून ठेवले याचे पानापानांवर दाखले दिले आहेत. कंत्राटदारी सिस्टीममध्ये कामगारांची काय हालत होते हेही लेखावर लेख प्रसिद्ध करून सांगितले आहे. राष्ट्रीयीकरण करावे, कंत्राटदारी सिस्टीम रद्द व्हावी, सुरक्षा नियम कडक करावेत, म्हणून दर अंकात लेख आहेत. संपाची धमकी आहे.

इंटकच्या 'खाणमजूर' अंकाचा दाखला अशासाठी की, आयटक, सीटूचा दाखला दिला तर पुण्या-मुंबईच्या पांढरपेशा 'हा कम्युनिस्टांचा कांगावा' समजेल. स्वतःच्या टेरिलिनच्या शर्टाकडे आणि सुटलेल्या पोटाकडे बघत, 'इतकी वाईट परिस्थिती कामगारांची कधी असेल काय?' असे म्हणेल.

¤

मायनिंग इन्स्टिटयूटमधून उठलो. 'डायरेक्टोरेट ऑफ माइन्स सेफ्टी'च्या ऑफिसच्या दिशेने चालू लागलो. लांबलांबवर परसलेले ब्रिटिशकाळातले बंगले, गर्द झाडी. धनबाद मागासलेले असून देखणे वाटते. मुंबईतल्या माणसाला शांत रस्त्यावरून झाडांच्या सावलीत चालण्याच्या होणाऱ्या आनंदाची फक्त खाणीतल्या कामगाराला स्वच्छ हवेच्या होणाऱ्या आनंदाशीच तुलना करता येईल.

डी. जी. एम. चे ऑफिस आले; पण ऑफिसात एकही वरिष्ठ अधिकारी हजर नव्हता. कोणी चासनालाला गेला होता तर कोणी नुकताच दिल्लीला रवाना झाला होता. ऑफिसातल्या एका कनिष्ठ अधिकाऱ्याची भेट झाली. त्याला येण्याचे प्रयोजन सांगितले. तसे त्याने डी. जी. एम. ऑफिसकडून प्रसिद्ध होणारे 'अॅन्युअल रिपोर्ट' पुढ्यात टाकले. रिपोर्ट अतिशय महत्त्वाचे होते. त्या त्या वर्षीचे खाणअपघात का, कसे घडले; खाण-उत्पादन; कामगार-मालक-तंटे, सुरक्षानियमांची माहिती आणि इतर अशाच विषयांचे रिपोर्टिंग होते; पण जी. डी. एम. च्या ऑफिसात स्पेअर कॉपी एकही नव्हती. धनबादच्या कोणत्याही दुकानात ते उपलब्ध नव्हते. दिल्लीहून मागवण्यात अर्थ नव्हता. रिपोर्ट वाचून त्याच्या नोटस् काढत बसणे वेळेअभावी शक्यच नव्हते. मग त्या कनिष्ठ अधिकाऱ्याबरोबर गप्पा मारत बसलो.

'राष्ट्रीयीकरणानंतरही असा अपघात व्हावा म्हणजे नवलच; नाही.?' मी म्हणालो.

'कसलं आलंय राष्ट्रीयीकरण? नफ्याचा मालक बदलला म्हणून काही राष्ट्रीयीकरण होत नाही. खऱ्या अर्थाने राष्ट्रीयीकरण झाले असते तर आमच्या ऑफिसची आवश्यकता राहिली असती का? मालकांनी खनिजसंपत्तीची नासाडी करू नये, सुरक्षिततेच्या उपाययोजना संपूर्ण बजावाव्यात, म्हणून आमचे ऑफिस! राष्ट्रीयीकरणानंतर याची गरज काय? पण तुम्हा कम्युनिस्टांना अभिप्रेत असलेले समाजवादाच्या दिशेचे हे राष्ट्रीयीकरण नव्हे. खाजगी मालकांनी जी वाट लावली होती त्यातून एकंदर उद्योगावरच दुष्परिणाम होऊ नये म्हणून केलेले हे राष्ट्रीयीकरण! समाजवादी नव्हे तर भांडवलशाही अर्थव्यवस्था तगावी म्हणून केलेले हे राष्ट्रीयीकरण!

'सरकार राष्ट्रीयीकरणही काय तऱ्हेवाईकपणे करते? आधी पंधरावीस वर्षे बोंबाबोंब, त्यातून प्रत्यक्ष राष्ट्रीयीकरणाआधी सहा महिन्यांची नोटीस. मग आधीच नफेखोरवृत्तीचा मालक थोड्या अवधीत लुटता येईल तेवढे लुटल्याशिवाय थोडेच रहाणार? मग असे अपघात व्हायचेच!'

'म्हणजे?'–त्याचे बोलणे न उमगून मी म्हणालो.

'असे पहा, खाणीतून कोळसा काढल्यावर पोकळ जागेत वाळू भरावी लागते. नाही तर जमीन खचणे, आगी लागणे इत्यादींचा धोका असतो. सरकार वाळू भरायच्या खर्चापोटी ८०% सबसिडी देते. मालकलोक शंभर टन वाळू भरून पाचशे टन वाळू भरल्याचे दाखवून सबसिडी लाटायचे. डी. जी. एम. ने दिलेल्या परवानगीपेक्षा अधिक कोळसा उकरायचे. डी. जी. एम. ला दिलेले नकाशे अचूक कधीच नसायचे.'

'मग तुमचं ऑफिस काय करायचं?' मी विचारले.

'आमच्या ऑफिसात सारेच समधर्मांचे अवतार आहेत की काय?' तो म्हणाला.

त्याचे म्हणणे खरे होते. सारेच काही समधर्मांचे अवतार नसतात. नोकरशहा आणि खाणमालकही. ज्या बंद जुन्या खाणीचे नकाशे दिले आहेत ते नकाशे खोटे अथवा चुकीचेही असू शकतील. त्या जुन्या नकाशाप्रमाणे चासनालात ऐंशी फुटांचे अंतर ठेवून नवी खाण खणण्यात आली.

प्रत्यक्षात ते अंतर ऐंशी फुटांपेक्षा कमीही असू शकेल. कदाचित त्यामुळेही सदर दुर्घटना घडली असेल!

¤

काळपट पडलेला लाल बावटा फडफडत होता. धनबादच्या पाण्याच्या टाकीसमोर एका ठेंगण्या जुन्या इमारतीत कम्युनिस्ट पक्षाचे ऑफिस आहे. खाणकामगारांत आयटकचे वजन जास्त. ऑफिसवर गेलो तेव्हा कॉम्रेड ललित बर्मन कत्रासला जाण्याच्या गडबडीत होते. तेवढ्या गडबडीत पंधरा-वीस मिनिटांत त्यांच्याशी आणि दोन-चार कार्यकर्त्यांशी जेवढे बोलता आले तेवढेच.

'सरकारने राष्ट्रीयीकरण केले तरी अजून ठेकेदारी पद्धत चालू आहेच!'

'खाण राष्ट्रीयीकृत; पण मॅनेजमेन्ट अजून 'इस्को' चीच! ही काय राष्ट्रीयीकरणाची रीत झाली?'

'इंग्लंडमध्ये ट्रेड युनियन्सना खाणीमध्ये जाऊन सुरक्षिततेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी झाली आहे की नाही हे तपासून

पहाण्याचा हक्क आहे. आपल्याकडेही तो मिळाला पाहिजे!'

—पंधरा मिनिटांत निष्पन्न झाले तीन मुद्दे. वीस मिनिटांनंतर गजबजलेले ऑफिस एकदम ओस पडले. कॉम्रेड बर्मन आणि त्यांचे कार्यकर्ते इकडे तिकडे निघून गेले. चासनाला अपघाताने जी गडबड सरकारी अधिकाऱ्यांत उडाली तीच कम्युनिस्ट पक्षाच्या ऑफिसात उडाली होती.

आलाय पत्रकार तर ठणकावून बोलून पुढारीपण गाजवून घ्या, प्रसिद्धी मिळवून घ्या, कामाचा देखावा खुलवून करू या, अशी वृत्ती दिसली नाही.

¤

अपेक्षेपेक्षा लवकर बस मिळाली आणि टॅक्सी-प्रवासाच्या दिव्यातून वाचलो. चासनालाला निघायला हवं होतं. दुर्घटनाग्रस्तांचे पुनर्वसन कसे चालले आहे, कामगार काय म्हणतात, ऐकायला पाहिजे होतं.

वाटेत रोप-वेवरून ऐंशी टक्के सबसिडी मालकांच्या घशात ओतणारे टब, पोकळ खाणीत वाळू भरायला चालले होते.

चासनाला आले. कालिमातेच्या मंदिरासमोरच चीफ एक्झिक्युटिव्हचे ऑफिस. प्रवेशद्वारावर पाणी उकळून पिण्याच्या, महामारीचे इंजेक्शन घेण्याच्या सूचना. त्या ' पॉश ' बिल्डिंगमधल्या दोन खोल्यांतून आपद्ग्रस्तांच्या मदतीचे काम चाललेले.

मृत कामगाराच्या बायकोला मिळालेला पैसा ताबडतोब बचतबँकेत भरायला लावला जात होता. शेजारच्याच खोलीत पोस्टाची बचत बँक उघडलेली होती. हजार रुपये मॅनेजमेन्टतर्फे, पाचशे रुपये राज्यसरकारतर्फे, अडीचशे रुपये सोशल वेलफेअरतर्फे ताबडतोब वाटले जात होते.

वाटलेले पैसे ताबडतोब बचतबँकेत भरायला लावण्यामागे सरकारची काही ' चाल ' तर नसावी या शंकेने ' बचतबँकेत सक्तीने पैसे भरायला का लावताय ?' म्हणून मी प्रश्न विचारला.

' सावकारांनी पैसे काढून घेऊ नयेत म्हणून !' — अधिकाऱ्याने पेपरातून दहांदा आलेले साचेबंद उत्तर ठोकून दिले.

' मिस्टर, इथे दोन हजार सी. आय. डी. उभे आहेत. कोणा सावकाराची माय न्यायलीय पैसे काढून घ्यायची ! का तुमचे सी. आर. पी. चे जवानच खाबू आहेत ? ' मी विचारले.

अरेरावीत आणि चढ्या सुरात विचारलेला संपूर्ण दौऱ्यातला माझा हा एकच प्रश्न.

समोरचा अधिकारी क्षणभर माझ्याकडे बघतच बसला. मग शांतपणे त्याने हातातले काम ठेवून दिले आणि खांद्यावर हात टाकून मला कॅंटिनमध्ये नेले आणि चहा घेता घेता म्हणाला,

' बर्वे, इतके पत्रकार येऊन गेले; पण हा प्रश्न फक्त तुम्हीच विचारलात. आता तुम्हाला म्हणून सांगतो. प्रसिद्ध करायचे की नाही ते तुम्हीच ठरवा.

— त्याचं काय आहे, आम्हाला साऱ्या गोष्टी जाहीरपणे बोलता येत नाहीत. हातातले काम टाकून इथे तुम्हाला आणले ते याचसाठी. उगाच आम्ही खरं नी स्पष्ट बोलायचं, त्यांतून लोकांच्या भावना भडकायच्या असं व्हायला नको. प्रश्न सावकारांचा नाहीय. सावकारांचा प्रॉब्लेम आहेच; पण इतक्या पोलिसबंदोबस्तात सावकाराची पैसे काढून घेण्याची काय शामत आहे ? खरा प्रश्न आहे तो कामगारांच्या कुटुंबांचाच.

बहुसंख्य कामगार अडाणी, खेडेगावचे. त्यांची कुटुंबव्यवस्था तशीच. बायकांना हक्क, अधिकार काही नाही. मेले ते बहुसंख्य कामगार तिशीचे. त्यांच्या बायका त्यांच्याहून लहान. त्यांना कोण विचारतो ? घरातले दीर, सासरे मेव्हणे पैसे काढून घेतात. स्वतःचा स्वार्थ बघतात. या बायाही अडाणी, गरीब. त्यांना स्वतःचं हित-अनहित समजत नाही. कुटुंबातल्या लोकांनी लुबाडलं तरी त्या तक्रार करीत नाहीत. त्यांना जन्म काढावयाचा असतो.

पहिल्याच दिवशी आम्ही पैसे वाटले आणि मोती गोराई नावाच्या परसबनियाँ गावच्या विधवेकडून तिच्या दिरांनी पैसे काढून घेतले. स्वतःचा सख्खा भाऊ मेलेला, भडव्यांनी बरेच पैसे खरेदीत घालवले

## कोळसा-कामगारांचे तेजस्वी शिरस्त्राण !

लॅंपकॅप हे कोळसा-कामगारांचे शिरस्त्राण अधिक मशाल. सैनिकाच्या हेल्मेटसारखीच ही असते. कपाळाचे वर लाइट असतो. बॅटरीची कपॅसिटी ४०५ व्होल्ट असते. भरपूर दुधाळ उजेड पडतो. कामगार जिकडे मान फिरवील तिकडे प्रकाश पडतो. या लॅंपकॅपची बॅटरी कमरेवर पट्टयात अडकवलेली असते. ही Old Dham बॅटरी रिचार्जेबल तर असतेच पुन्हा शॉर्टसर्किट झाले तर सेफ्टी फ्यूज उडून जातो. बाहेर ठिणग्या पडत नाहीत. या लॅंपकॅपचा बल्ब हार्डग्लासचा असतो. वरून कोळसा वगैरे पडला तरी बल्ब फुटत नाही. पूर्वी हे बल्ब हॉलंडमधून आयात होत. आता देशातच तयार होतात. या लॅंपकॅपमुळे कामगारांना संरक्षण लाभते. वरचा काही भाग कोसळला तरी डोके फुटत नाही; पण,

आश्चर्य वाटेल पण खरे आहे–पूर्वी खाजगी खाणीतून लॅंपकॅप असेच असे नाही !

## मृत्यूचे राडार–' पक्षी ! '

खाणीत मिथेनसारख्या प्राणघातक वायूचा धोका नेहमीच असतो. या धोक्यापासून डेव्हीच्या संरक्षक दिव्याने कामगारांना मुक्त केले. खाणीत मिथेन गॅस पसरू लागला की, डेव्हीचा दिवा निळसर पडतो नि कामगारांना धोका कळतो.

पण प्रत्येकाजवळ डेव्हीचा लॅंप असतोच असे नाही. पूर्वी खाजगी खाणीतून तरी पुरेसे डेव्हीचे संरक्षक दिवे नसायचे. तेव्हा मग कामगारांनी युक्ती काढली. ' लव्हबर्ड 'सारख्या छोटचा पाखरांचे पिंजरे घेऊन ते खाणीत जाऊ लागले. या पाखरांचा जीव अगदी लहान असतो. माणसाला जाणवणारही नाही इतक्या लहान प्रमाणात जरी मिथेन पसरला तरी ही पाखरे लगेच बेशुद्ध पडतात आणि कामगारांना मृत्यूच्या दूतांच्या चोरपावलांची चाहूलही लागते. कोळसाकामगारांच्या दृष्टीने त्यांचा चिडियाखाना म्हणजे मृत्यूचा राडार...

¤

खरेदी स्वतःसाठी. बाईने तक्रार केली नाही; पण आम्हाला बातमी समजली. आमचा माणूस पोलिसइन्स्पेक्टरला घेऊन गेला. दिराला ठाण्यात आणले. पैसे कुठायेत विचारले. त्याने खाका वर केल्या. इन्स्पेक्टरने सरळ पोलिसी हिसका दाखविला. दोन-चार थोबाडात भडकावताच पैसे काढून दिले. तीन-चारशे रुपये खर्चून टाकले होते. बाकी पैसे आम्ही बाईच्या नावावर जमा केले.

—तर खरा प्रॉब्लेम हा असा आहे बर्वे. नुसते पैसे वाटून या बायांचे पुनर्वसन होत असते तर इथं आमचा एवढा मोठा ताफा कशाला ठाण मांडून बसला असता ? एका दिवसात चेक वाटून आम्ही चालते झालो असतो."

तो खरंच कळकळीने बोलत होता. आपली नोकरशाही देखील माणसांचा इतका खोल विचार करू शकते हे पाहून मी थक्क झालो. माझा आवाज आपोआप खाली आला नी मी त्याला पुढला प्रश्न विचारला, ' मग या बायांनी रोजचा खर्च कसा चालवायचा ?'

—' आमचं काम पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत रेशन, औषधोपचाराची सोय केलीच आहे. आवश्यक सामानाचे वाटप आलेल्या मदतीतून चालू आहे. हातखर्चाची सोयही करीतच आहोत. '

' तुम्ही आणखीन यापुढे काय करणार आहात ? ' मी विचारले.

' आमचं खरं काम तर आता सुरू झालंय. पैसे वाटून झाल्यावर जमा करायचे काम तर अगदी कारकुनी. खरं काम तर आता ! कालपासून दुर्घटनाग्रस्त कुटुंबांचे सर्व्हे घेण्याचे काम चालू झाले आहे. हे सर्व्हेचे काम क्लास वन नाही तर क्लास टू ऑफिसर्सवर सोपविले आहे. '

' ऑफिसर्सच कशाला ? '—मी

' ऑफिसर्सने सर्व्हे केला म्हणजे जास्त जबाबदार असणार. पुन्हा ऑफिसर्स साधारण प्रौढ असतात. कौटुंबिक अडीअडचणींची त्यांना कल्पना असते. पोरसवदा कारकुनाला ते जमणार नाही. प्रत्येक कुटुंबाची पहाणी करायची आहे. कुटुंब एकत्र आहे का स्वतंत्र ? मुलं केवढी आहेत ? काम कोणी करू शकते का ? बाई अडाणी का शिकलेली ? तिला काही काम देता येईल का ? कुटुंबात वर्चस्व कुणाचे ? काम कठीण आणि वेळाचं आहे. बाईला विश्वासात घेऊन बोलतं केले पाहिजे. '

' पण हे काम शासकीय पातळीवर कसं जमणार ? त्या त्या मोहल्ल्यातील वजनदार सामाजिक कार्यकर्तेच पाहिजेत अशा कामासाठी. '— मी म्हणालो.

' बर्वे, तुम्ही देता का असे दहा कार्यकर्ते आणून ? तेवढंच आमचं काम हलकं होईल. ' —त्याने विचारले.

मी निरुत्तर झालो. सत्तेचे, पैशाचे पुढारी पासरीभर मिळतील. असे सचोटीचे कार्यकर्ते कुठून मिळणार ? आणि हा दोष काही सरकारचा नाही. आपल्या राजकीय पक्षांच्या कार्यपद्धतीचा आहे. आता सरकारी पातळीवरच जास्तीत जास्त जे काय होईल ते.

आम्ही उठलो. तो काम टाकून आला होता. त्याचा जास्त वेळ घेणं म्हणजे मदतकार्यात अडथळा आणणंच होतं. जाता जाता तो म्हणाला,

' बर्वे, जबाबदार पत्रकाराचे खरे कर्तव्य आम्ही आमच्या या पुढच्या कामात काही चुका करतो का, कामात उणीवा आहेत का, हे पहाणे. स्वतः काही कुटुंबात जाऊन पहाणी करणं; पण सर्वजण मदतीचे आकडे घेऊन चालते होतात. '

खरं होतं त्याचं म्हणणं; पण मी मुंबईचा पत्रकार काय करणार होतो ? मी जास्त काळ चासनालात राहू शकत नव्हतो. तिथल्या कामगारांशी माझा परिचय नव्हता. त्यांची बोली मी बोलू शकत नव्हतो. हे काम स्थानिक पत्रकाराचेच; पण ते चाकोरीबाहेर जात नव्हते. प्रेस इन्फर्मेशन रूममधून चहा घेत माहिती घेणे, मिनिस्टरांच्या डायरेक्टरांच्या प्रेसकॉन्फरन्स अटेन्ड करणं, यातच ते स्वतःच्या कामाची इतिकर्तव्यता मानतात आणि या गोष्टी मला तर वर्ज्य आहेत !

अपघाताच्या परिस्थितीला सरकार जबाबदार असेल; पण प्रत्यक्ष अपघातानंतर ज्या तातडीने आणि समंजसपणे मदत कार्य चालू झाले आहे ते खरंच प्रशंसनीय आहे. या सरकारची प्रशंसा करायची वेळ क्वचितच येते. तेव्हा आली वेळ साधलीच पाहिजे. फक्त मदतकार्याबद्दल प्रशंसाच केली पाहिजे...आणि अपघाताबाबत ? प्राप्त परिस्थितीत ' हे सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान प्रभो, तू असा निष्ठुर कसा ? याशिवाय काय लिहिणे शक्य आहे ?

चासनालाच्या पुनर्वसनात टाटा—बिर्लांचे, जैन-मुंदडा यांचे स्वार्थ आडवे येत नाहीत. तेव्हा काम झकास चालले आहे. पण एकंदर सर्वच प्रॉब्लेमचं काय ?

—त्यासाठी सत्ताधीश नव्हे; सत्ताधारीवर्ग बदलला पाहिजे. सत्ता कष्टकरीवर्गाच्या हाती आली पाहिजे.

चासनालाकडे मदतीचा ओघ वहातोय. देशातील खाणकामगारांनीच एक दिवसाच्या पगाराच्या रूपाने चाळीस लाख रुपये दिले आहेत. महाराष्ट्र वीजबोर्डाने एक लाख, पंतप्रधानांनी चार लाख, पैशाची कमी पडणार नाही. सरकारला झीज फारशी सोसावीही लागणार नाही.

कॉलनीच्या साउथ अॅव्हेन्युमध्ये मोठा शामियाना ठोकलाय. तिथे मदत वाटली जाते. धनबाद महिला समिती, बिहार प्रदेश कॉंग्रेस कमिटी, इंडियन रेड क्रॉस, बिहार ब्रँच आणि इतर अनेक संस्थांकडून शेकडो ब्लँकेटस्, धोती, साड्या, बेबीसुटस्, मिल्कटीन, बेबीफूड इत्यादींची मदत आली आहे. तीनशेपंचाहत्तर कुटुंबांना पुरून उरेल एवढी मदत येतेय.

बिहार सरकारने दहा डीसमल जमीन वाटलीय बेघर कुटुंबांना घरे बांधण्यासाठी; पण उघड्या आभाळाखाली मोकळ्या रानमाळावर आसरा कसा मिळायचा ?

□

...शामियानासमोरच्या चहाच्या दुकानात बरेच कामगार बसलेले होते. दुकानात शिरलो. चहा फुरकत कानोसा घेऊ लागलो; पण अपघातासंबंधी कुणीही बोलत नव्हते. थोडेसे विचित्र वाटले. वस्तुतः इतक्या भयंकर अपघातानंतर कामगार संतप्त होऊन सरकारवर, मॅनेजमेंटवर आग पाखडताना दिसले असते तर ते स्वाभाविक होते. प्रत्यक्ष अपघात घडला तेव्हा कामगार संतप्त होऊन कोलीयरीच्या ऑफिसवर चालून गेले होते. तेव्हा तिथले कंपनीचे अधिकारी जीव मुठीत घेऊन पळाले होते. कामगारांनी हजेरी-रजिस्टर पळवून नेले.

पृष्ठ २१ वर

# टिरपीझ् विरुद्ध बारा

● किशोर कोटणीस ●

९ सप्टेंबर १९४३ ची ती पहाट होती. नॉर्वेच्या उत्तरेला ६५० कि. मी. वर धुक्याचा पडदा बाजूला सारून ' स्पिट्स् बर्गेन ' च्या किनाऱ्याजवळ एक बलाढ्य नौका अवतरली. हीच ती जगातील सर्वात बलाढ्य युद्धनौका ' टिरपीझ.' श्र्चॉर्नहॉस्ट व दहा विनाशिकांच्या सहाय्याने तिने आपल्या पहिल्या लक्ष्याचा वेध घेतला. ' बॅरेन्ट्स् बर्ग ' येथील नॉर्वेजियन गढी, तिच्या पहिल्या धडाक्यासरशी जमीनदोस्त झाली. तेथील वायरलेसस्टेशन, सप्लायडेपो, तेलटाक्या, वेधशाळा यांचा नाश करून ती सुखरूप आपल्या तळावर परत आली.

जर्मनव्याप्त नॉर्वेमधील ' कॅफ्जोर्ड ' येथे तिचा मुक्काम होता. ही एक सुरक्षित जागा होती. येथे पोहोचण्याचा मार्ग सोरॉय आखातातून होता. या आखाताच्या प्रवेशद्वाराशी पाणसुरुंग बसवले होते. आखातातून आत गेल्यावर ' सी लॅंड ' व ' स्जेरनॉय ' ही दोन बेटे लागतात. त्यावरील तोफा सोटॉयवर रात्रंदिवस पहारा देत असत. त्याचप्रमाणे ह्या बेटांवरील डोंगरांवर विमानविरोधी तोफा बसविल्या होत्या. टेहळणी-विमानांची पथके या सामुद्रधुनीवरून सतत नजर ठेवून होती.

या दोन बेटांमागे ' अल्टा फ्जोर्ड ' नावाचे आणखी एक बेट होते आणि त्याच्याही मागे ३० कि. मी. अंतरावर कॅफ्जोर्ड होते. पाणबुड्यांपासून बचाव व्हावा म्हणून लोखंडी तारांची जाळी या कॅफ्जोर्डला बसवली होती. १,५०० टनी पाणबुडी थोपविण्याची शक्ती या जाळीत होती. या जाळीतून आत शिरल्यावर ' टिरपीझ ' भोवती टार्पेडो-विरोधी जाळी बसवण्यात आली. याशिवाय, विमानहल्ल्यापासूनही टिरपीझचे संरक्षण व्हावे ह्या हेतूने जर्मनांनी कॅफ्जोर्डला धुक्याचे पडदे उभारणारी यंत्रणा जय्यत तयारीत ठेवली होती. ' उत्तरेची एकलकोंडी राणी ' असे तिचे खलाशी तिचे वर्णन करीत. ती आता सर्वांत जवळील ब्रिटिश तळापासून १,६०० कि. मी. दूर होती; परंतु रशियाकडे जाणाऱ्या ब्रिटिश काफिल्याचा मार्ग तिच्या तळापासून फक्त ८० कि. मी. दूर होता.

टिरपीझचा तळ अभेद्य होता; परंतु तिच्या संरक्षणव्यवस्थेत जर्मनांनी अजिबात अतिशयोक्ति केली नव्हती. ह्या युद्धनौकेचा नाश करणे; कमीत कमी तिला पांगळी करणे हे ब्रिटीश नाविकदलाचे मुख्य उद्दिष्ट होते.

जानेवारी १९४२ पासून ब्रिटिशांचे तिला नष्ट करण्याचे प्रयत्न चालू होते. ती 'ट्रॉंढीम' येथे नांगरली असताना R. A. F. ने तिच्यावर ५ विमानहल्ले चढवले होते. निकाल : १४ विमाने नष्ट झाली. बोटीचे काहीही नुकसान नाही आणि आता कॅफ्जोर्डमध्ये ती विमानांच्याही पल्ल्याबाहेर होती.

आता ब्रिटिश आरमाराने एक अति धाडसी हल्ला करण्याचे ठरवले. योजना अशी होती की, काही माणसे जर्मनांच्या नकळत कॅफ्जोर्डमध्ये घुसवायची आणि बोटीच्या तळाशी बॉंब लावून बोट उद्ध्वस्त करायची; पण यासाठी काही विशिष्ट प्रकारच्या पाणबुड्यांची गरज होती. या पाणबुड्यांचा व्यास २ मी. पेक्षा जास्त असून चालणार नव्हता; परंतु त्यांच्या अंगी ९० मी. पर्यंत बुडी मारण्याची क्षमता असणे अवश्यक होते. याशिवाय पाण्याखाली सतत ३६ तास रहाण्याची कुवत असणेही आवश्यक होते.

जानेवारी १९४३ मध्ये व्हिकर्स आर्मस्ट्रॉंग या कंपनीने अशा ६ पाणबुड्या ब्रिटिश नाविकदलाच्या स्वाधीन केल्या. क्ष ५ ते क्ष १० असे त्यांचे क्रमांक होते; परंतु त्यांना " Ugly Duckling " म्हणूनच ओळखले जाई. त्या एखाद्या पाणबुडीपेक्षा पाणी तापवणाऱ्या बंबाप्रमाणे दिसत; परंतु त्यांनी तत्कालीन यांत्रिक करामतीची परिपूर्णता गाठली होती.

ह्या पाणबुड्यांमध्ये शारीरिक सुखसोयींचा संपूर्ण अभाव होता. फक्त पेरिस्कोपच्या खाली तेवढीच एखाद्या ठेंगण्या माणसाला जेमतेम उभे राहण्याएवढी जागा होती. पाणबुडीचा अंतर्भाग निरनिराळ्या यंत्रांनी भरून गेला होता. ह्या पाणबुडीमध्ये पाणतीर (Tarpedo) ठेवण्यासाठी अजिबात जागा नव्हती. त्यामुळे २ टनी बॉंबस् पाणबुडीच्या बाहेरच लटकत होते. अशी ही पिटुकली पाणबुडी सर्व तऱ्हेच्या करामती करू शकत होती.

फक्त एकच गोष्ट तिच्या मर्यादिबाहेरील होती ती म्हणजे तिचा पल्ला ! तिचा पल्ला फक्त १,९०० कि. मी. होता.

११ सप्टेंबरला ह्या सहाही पाणबुड्या आपल्या तळावरून सुटल्या. प्रत्येक बोटीचा खलाशीवर्ग फक्त चौघांचा बनलेला होता. कॅप्टन, पाणबुड्या (Divers), इंजिनियर आणि नॅव्हिगेटर. प्रत्येक पाणबुडी एका मोठ्या पाणबुडीस नायलॉनच्या दोरखंडाने जखडली होती. ही मोठी पाणबुडीच छोट्या पाणबुडीस तिच्या ईप्सित तळापर्यंत घेऊन जाणार होती.

प्रवासाचे पहिले चार दिवस काही विशेष घडल्याशिवाय पार पडले. चौथ्या दिवशी त्यांना संदेश मिळाला की, ब्रिटिश विमानदलाच्या माहितीनुसार टिरपीझ कॅफ्जोर्ड येथील आपल्या तळावर पोहोचली असून तिच्या सोबतीला श्र्चॉर्नहॉस्ट व लुटझॉव ह्या बोटीही आहेत. तेव्हा अशी योजना आखली गेली की, ' क्ष – ५ ', ' क्ष – ६ ' व ' क्ष – ७ ' यांनी टिरपीझवर हल्ला चढवावा. ' क्ष – ९ ' व ' क्ष – १० ' यांनी श्र्चॉर्नहॉस्टचा फडशा पाडावा आणि ' क्ष – ८ 'ने लुटझॉवला चीत करावे.

परंतु इथपासूनच संकटाला सुरुवात झाली. ' क्ष – ८ 'च्या यंत्रात बिघाड झाल्यामुळे तिला आपला बेत रद्द करावा लागला. दुसऱ्या दिवशी ' क्ष – ९ 'चा दोरखंड तुटून तिला जलसमाधी मिळाली. ' क्ष – १० 'ला परत फिरावे लागले. अखेर ' क्ष – ५ ' ' क्ष – ६ ' व ' क्ष – ७ ' या तीन बोटीच आपल्या भक्ष्याकडे निघाल्या.

१७ सप्टेंबर १९४३ ला ह्या तीनही पाणबुड्या सोरॉय आखाताच्या पश्चिमेकडील मुखात येऊन पोहोचल्या; परंतु ह्या दिवशी समुद्रावर वादळ झाल्यामुळे छोट्या पाणबुड्या मोठ्या पाणबुडींपासून विभक्त होऊ शकल्या नाहीत. हा कार्यक्रम दुसऱ्या दिवसावर ढकलण्यात आला.

## टिरपीझ या हिटलरच्या बलाढ्य बोटीवर केलेल्या धाडसी हल्ल्याची कहाणी

दुसऱ्या दिवशी एक घटना घडली. 'क्ष – ७ 'ला ओढून नेणारी पाणबुडी स्टबर्न हिच्या शेपटाकडील भागाजवळ एक पाणसुरुंग अचानक उपटला. सागराच्या लाटांबरोबर तो पाणबुडीजवळ येऊ लागला. तो आता पाणबुडीवर येऊन आपटणार, इतक्यात वाऱ्याने त्याची दिशा बदलली आणि फक्त काही इंचांवर मृत्यूने आपला जबडा मिटला.

परंतु तो पाणसुरुंग दोरखंडात गुंतला गेला आणि पाणबुडी 'क्ष – ७ 'कडे ओढली जाऊ लागली. सर्वजण श्वास रोधून बघू लागले. पाणबुडी 'क्ष – ७' तिथेच नष्ट होणार याबद्दल कोणालाच संदेह नव्हता; पण तिचा कप्तान 'ग्रॉडफ्रे प्लेस' मोठ्या धीराचा माणूस. लाटेसरशी खालीवर होणाऱ्या आणि डुगडुगणाऱ्या पाणबुडीच्या पाठीवर तो चढला आणि पाण्याने निसरड्या झालेल्या पृष्ठभागावरून तोल सावरीत तो तिच्या टोकापर्यंत गेला. पाणसुरुंग जवळ आल्यावर हळूच लाथेने त्याने त्याला बाजूला लोटले.

२० सप्टेंबरला सायंकाळी छोट्या पाणबुड्यांनी मोठ्या पाणबुड्यांना रामराम ठोकला आणि त्या आपल्या उद्दिष्टांकडे निघाल्या.

सबंध रात्रभर त्यांनी पृष्ठभागावर प्रवास केला. बोटीचा फक्त फूटभर भाग पाण्याबाहेर दिसत होता. मध्यरात्री आकाशात चंद्र प्रकाशू लागला. चांदण्यात हिमखंड चकाकत होते. स्जेनॉयचे तुटके कडे अधिकच भयाण दिसत होते.स्जेनॉयच्या बाजूने २४ कि. मी. लांब, १·५ कि. मी. रुंदीच्या पाण्याच्या पट्ट्यातून पाणबुडीचा प्रवास चालला होता. पहाटेच्या पहिल्या किरणांबरोबरच पाणबुड्यांनी बुड्या मारल्या आणि पाण्याखालून मार्गक्रमण चालू ठेवले.

२१ तारखेला संध्याकाळी ते 'ब्रॅथलोम' बेटाजवळ येऊन पोहोचले. तिथून 'कॅफ्जोर्ड' चा तळ फक्त ६·५ कि. मी. अंतरावर होता. ह्याच ठिकाणी हल्ल्यापूर्वीची रात्र काढण्याचा त्यांचा विचार होता. येथपर्यंत तीनही बोटी एकमेकांच्या सोबतीने आल्या होत्या; परंतु ह्यापुढचा मार्ग मात्र त्या स्वतंत्रपणेच आखणार होत्या.


दुसऱ्या दिवशी पहाटे १-४५ ला 'क्ष-६ 'ने 'कॅफ्जोर्ड 'च्या दिशेने वाटचाल सुरू केली. 'क्ष-६ 'चा कप्तान 'कॅमेरॉन 'चा बेत असा होता की, पाणबुडीविरोधी जाळीजवळ ९ मी. खोलीवर पाणबुडी उभी करायची. मग बोटीचा पाणबुड्या (Diver) बाहेर पडून जाळी कापेल. नंतर त्या भोकातून पाणबुडी पुढे जाईल; परंतु ते जाळीजवळ पोहोचल्यावर त्यांना एका बोटीच्या पंख्याचा आवाज ऐकू आला. त्यांनी पेरिस्कोपमधून पाहिले तर एक छोटी बोट जाळीच्या दिशेनेच जाताना त्यांना दिसली. याचा अर्थ एकच. जाळीचा दरवाजा उघडा होता. कॅमेरॉनने त्याच दरवाज्यातून जायचे ठरविले. पृष्ठभागावर येऊन 'क्ष-६ ', त्या बोटीमागोमाग निघाली. बोटीच्या पंख्याने निर्माण केलेल्या लाटांआड ती दडून गेली होती. म्हणून बोटीवरच्या किंवा जाळीवरच्या रक्षकांच्या दृष्टीसही न पडता तिने जाळी ओलांडली. 'क्ष-६ ' आता कॅफ्जोर्डमध्ये येऊन पोहोचली होती आणि बलाढ्य 'टिरपीझ' तिच्यापासून केवळ ६ कि. मी. अंतरावर होती.


पण तेवढ्यात एक अपघात घडला. कॅमेरॉन पेरिस्कोपमधून टिरपीझचा ठावठिकाणा पहात होता. इतक्यात पेरिस्कोपच्या मोटरला शॉर्टसर्किट होऊन आग लागली. सर्वत्र धुराचे साम्राज्य पसरले; परंतु पाणबुडीचा खलाशी वर्ग आपापल्या कामात निष्णात होता. त्यांनी आग विझवली आणि झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतला. पेरिस्कोपमध्ये बिघाड झाला होता. पाणबुडीच्या दोन्ही बाजूंना गळती लागली होती. त्यामुळे ते हवेचे बुडबुडे सोडत होते आणि पाणबुडी एका बाजूला कलंडली होती. त्यामुळे पाणबुडीला हालचाल करणे कठीण झाले होते. "अशा परिस्थितीत टिरपीझवर हल्ला चढवायचा की परत फिरायचे ?" कॅमेरॉनने आपल्या सहकाऱ्यांना हा प्रश्न विचारला.

परंतु आपल्या निशाणाच्या इतक्या जवळ आल्यावर आपल्या सर्व साहसांवर व कष्टांवर पाणी सोडून परत फिरणे त्यांना मानवेना. शिवाय आणखी एक आश्चर्यकारक घटना अशी होती की, अजूनपर्यंत तरी ते शत्रूच्या दृष्टीस पडले नव्हते. 'Let's see what she's worth skipper.' त्याला उत्तर मिळाले.

ते टिरपीझच्या आणखी जवळ गेले. त्यांना मिळालेल्या माहितीप्रमाणे टिरपीझ भोवतालची टॉर्पेडोविरोधी जाळी फक्त १५ मी. खोल होती. त्यामुळे ह्या जाळीखालून आपण सहज आतमध्ये प्रवेश मिळवू अशी कॅमेरॉनला आशा वाटत होती. १८ मी. खोलीवरून ते जाळीच्या दिशेने निघाले आणि जाळीखालून जाण्याऐवजी जाळीवर आपटले. २४ मी. खोलीवरही हाच प्रकार घडला. अखेर ते समुद्राच्या तळाला टेकले. तरी तेच ! ब्रिटिश गुप्तहेरखात्याला चुकीची बातमी मिळाली होती. ही जाळी अगदी समुद्राच्या तळापर्यंत होती.

नैराश्याने ग्रासून ते वर आले, तोच केवळ योगायोगाने त्यांना एक अगदी लहान बोट





टिरपीझच्या तळ

जाळीतून आत जाताना दिसली. जाळीचे दरवाजे उघडे होते. मागच्या अनुभवामुळे ह्याही खेपेला त्यांनी ह्या संधीचा फायदा उठवण्याचे ठरविले. त्या बोटीपाठोपाठ त्यांनीही आतमध्ये प्रवेश मिळवला.

आता सकाळचे ७–०५ झाले होते. ८ वाजण्यापूर्वी बॉंम्ब टाकून तिला टिरपीझ-पासून शक्य तितक्या दूर जायचे होते. कारण 'क्ष–५' व 'क्ष–७' ने बॉंम्ब् टाकले असल्यास ते ८ ते ९ च्या दरम्यान कधीही उडण्याचा संभव होता.

'टिरपीझ' आता फक्त २०० मी. अंतरावर होती. तिच्या मार्गात आता कसलाच अडथळा उरला नव्हता आणि तेव्हढ्यात एक दुर्घटना घडली. पाणबुडी एका दगडावर आपटली, उसळी घेऊन ती पृष्ठभागावर आली आणि परत पाण्यात अदृश्य झाली ! आतले खलाशी आश्चर्य करू लागले, ह्याही वेळी ते कसे काय शत्रूच्या दृष्टीस पडले नसतील ?

मात्र ह्या खेपेला त्यांना जहाजावरच्या 'पेटी ऑफिसर'ने पाहिले होते. 'एक लांब काळी आकृती आता तिकडे दिसली होती. ती एखादी पाणबुडी असावी.' तो ओरडला, 'तू स्वप्नात पाहिली असशील !' त्याचा मित्र उत्तरला. ' 'पाणबुडी कधी आपल्या जाळीतून आत येऊ शकेल काय ?'

पेटी ऑफिसरनेही आपला मुद्दा अधिक लांबवला नाही. कारण बोटीचा सुरक्षाअधिकारी कॅप्टन हेन्स ॲसमन याने आपल्या सैनिकांची सिद्धता तपासण्यासाठी बोटीवर इतक्या वेळा खोटे हल्ले चढवले होते की, 'कोल्हा आला रे–' ची आवृत्ती झाली होती. त्यामुळे अशा हल्ल्याची बातमी देणारा माणूस सैनिकांच्या विनोदाचा विषय बनत असे. याच भीतीने त्या पेटी ऑफिसरने ही बातमी योग्य त्या अधिकाऱ्यापर्यंत पोहोचवली नाही.

पाणबुडीतील लोक मात्र अचंबा व्यक्त करीत होते. बोटीवर कसलीच गडबड त्यांना ऐकू येत नव्हती. ७–०९ पर्यंत त्यांनी वाट पाहिली व अखेर ते पुढे निघाले. मागच्या अपघातामुळे बोटीचे होकायंत्र बिघडले होते. त्यामुळे आपण नक्की कोणत्या दिशेने चाललो आहोत याचा उलगडा कप्तानाला होत नव्हता. तरीही आपण योग्य त्या दिशेनेच चाललो आहोत असा ग्रह धरून आणखी चार मिनिटांत आपण बोटीच्या खाली पोहोचू असा विश्वास कॅमेरॉनला वाटत होता. अखेर चार मिनिटांनी तो परत पृष्ठभागावर दाखल झाला. आता टिरपीझ फक्त २४ मी. दूर होती.

टिरपीझवर आता मात्र संदेह नव्हता की पाणबुडीने तळात प्रवेश केला आहे. ही बातमी ताबडतोब कप्तानाकडे पोहोचवण्यात आली. 'कप्तान मेयेर'ने लगेच भोंगा वाजवण्याचा हुकूम दिला आणि अखेर ७–१५ ला बोटीवर भोंगा वाजला.

गोंधळात गोंधळ म्हणूनच की काय जो भोंगा वाजवला, तो चुकीचा वाजवला गेला. याचा अर्थ असा होता की पाणबंद दरवाजे ताबडतोब बंद करा. सैनिकांना काय करावे ते सुचेना. ही चूक कॅप्टन मेयेरच्या ताबडतोब लक्षात आली; पण गोंधळात भर नको म्हणून चूक दुरुस्त करण्याअगोदर थोडी वाट पहाण्याचे त्याने ठरवले.

दरम्यान 'क्ष–६'मधील लोकांच्या मनावरील ताण असह्य झाला. शत्रूकडून सरबत्ती कधी होते याचीच ते वाट पहात होते. टिरपीझचे क्षणभर दर्शन झाले होते त्यावरून कॅमेरॉनने बोटीचा मार्ग ठरवला होता. त्यामुळे पाणबुडीला जेव्हा अडथळा आला, तेव्हा कॅमेरॉनला वाटले टिरपीझवरच आपटलो आपण.

पण प्रत्यक्षात ती टिरपीझच्या दोरखंडावर आपटली होती. त्यापासून सुटका करून घेताना ती परत पृष्ठभागावर आली. त्या वेळी ती टिरपीझपासून १८ मी. दूर होती.

हे अंतर जर जास्त असते, तर बोटीवरच्या तोफांनी पाणबुडीचा विध्वंस केला असता; पण पाणबुडी इतक्या जवळ होती की ती तोफेच्या मर्यादेबाहेर होती. कारण तोफा इतक्या खालच्या दिशेने वळवणे शक्यच नव्हते. टिरपीझवरील सैनिक त्यामुळे खवळले होते व पाणबुडीवर बंदुकांचा व शिव्याशापांचा वर्षाव करीत होते. गोळ्या पाणबुडीच्या पोलादी कवचावर आपटून परत फिरल्या व 'क्ष–६'ने परत पाण्याखाली बुडी मारली.

पाणबुडी आता बरोबर टिरपीझच्या खाली आली होती. शत्रू तिला आता काहीच करू शकत नव्हता; परंतु फार काळ तिथे थांबणेही धोकादायक होते. कारण 'क्ष–५' व 'क्ष–७'च्या बॉंम्बनेच तिचा नाश घडवून आणला असता. 'त्यांनी आपल्याला पाहिले आहे.' कॅमेरॉन म्हणाला, 'जाळीचे दरवाजेही बंद आहेत. आता अधिक आशा करण्यात अर्थ नाही. आपले बॉंम्ब इथेच सोडून आपण वर जाऊ व जर्मनांच्या स्वाधीन होऊ.'

आता ७-२२ झाले होते. कॅमेरॉनने आपले दोन्ही बॉंम्ब् सोडून दिले. ते घरंगळत वर जाऊन टिरपीझच्या कण्यावर टेकले. आणखी एका तासाने त्यांचा स्फोट होणार होता.

पण कॅप्टन कॅमेरॉनला मात्र डाव्या बाजूच्या बॉंबची खात्री वाटत नव्हती. त्याची फ्यूज कदाचित ५ मिनिटांनीच उडेल अशी धास्ती त्याला वाटत होती. त्यामुळे शक्य तितक्या लवकर पळ काढण्याचा त्याचा विचार होता.

घाईघाईने त्यांनी आपल्याजवळील नकाशे, तक्ते व गुप्त कागदपत्र जाळून टाकले. त्यामुळे पाणबुडीच्या आधीच कोंदट वातावरणात धूर व उष्णता साठली होती.

'आपण आता वर जाऊ' कॅमेटॉन म्हणाला, 'आपण पाणबुडी सोडताक्षणीच ती तळाला जाईल अशी व्यवस्था करा!' त्याने आज्ञा सोडली.

याच वेळी लेफ्ट. हर्बर्ट लेन यांच्या आधिपत्याखाली जर्मन सैनिक एका मोटारलाँचमध्ये पाणबुडी वर येण्याची वाट पहात होते आणि पाणबुडी क्ष-६ एकाएकी पाण्यावर आली. दरवाजा उघडून पाणबुडीचा खलाशी-वर्ग बाहेर पडला. कॅमेटॉन याने सगळयात शेवटी पाणबुडी सोडली. त्यांना जर्मनांनी ताबडतोब गिरफ्दार केले. पाणबुडी मात्र हा हा म्हणता पाण्याखाली गेली. ह्या कैद्यांना बोटीवर उभे करण्यात आले. त्यांच्या झडतीत २ घड्याळे व बोटीचे क्रोनोमीटर सापडले. ते सर्व एकच गोष्ट दर्शवीत होते. स्फोट होण्यासाठी ४५ मिनिटे बाकी आहेत.

टिरपीझचा कप्तान मेयेर ह्याला वेळ निघून जात आहे याची जाणीव होत होती. त्याने बोट समुद्रप्रवेशासाठी सज्ज करण्याचा हुकूम दिला; परंतु ह्या गोष्टीला कित्येक तास लागले असते. त्याने पाणबुडे (Divers) पाठवून बोटीला बॉम्ब्ज् लावले आहेत का, हे पहावे, असा विचार केला. तेवढ्यात आणखी एक पाणबुडी दृष्टीस पडली. ही होती गॉडफ्रे प्लेस यांची क्ष–७. तिने आपले बॉम्ब्ज् व्यवस्थितपणे–एक बोटीच्या मध्यभागी व एक नाळेजवळ–ठेवला होता आणि आता जाळीतून बाहेर पडण्याची धडपड करीत असतानाच ती पृष्ठभागावर आली होती. ती सुद्धा टिरपीझच्या फारच जवळ असल्यामुळे तोफांच्या टप्प्याबाहेर होती. त्यामुळेच ती सुखरूप पाण्याखाली परत जाऊ शकली.

आता मात्र कॅप्टन मेयेर गोंधळात पडला. सबंध कॅफ्जोर्डमध्ये शत्रूच्या पाणबुड्या शिरल्या असण्याची शक्यता होती. त्याने भराभर हुकूम सोडले. बोटीवरील विमानाला आणखी काही पाणबुड्या असल्यास त्यांचा शोध घेण्यास पाठविले. जाळीचे दरवाजे बंद ठेवण्याची आज्ञा सोडली व बोट जाळीतच दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचा हुकूम सोडला.

आता ८ वाजले होते. कैद्यांना बोटीच्या तळाशी नेऊन त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार केला गेला.

८-१२ ला बोटीखालचे तीनशे बॉंब एकदम उडाले. त्यांनी बोटीखाली प्रचंड दाब निर्माण केला. त्यामुळे नाळेखालचा चौथा बॉंब अर्ध्या क्षणानंतर उडाला. बोटीची नाळ पाण्याबाहेर २ मीटर उंच उचलली गेली.

कॅमेटॉन, त्याचे सहकारी आणि बोटीवरील जर्मन सैनिक आपल्या जागेवरून दूर फेकले गेले. सबंध बोट कित्येक क्षण थरथरत होती. बोटीवरचे सर्व दिवे विझले. वाफेचे पाइप फुटल्यामुळे सर्वत्र वाफ पसरली. शॉर्ट सर्किट होऊन आग लागली. पडलेल्या भोकातून पाणी जोराने बोटीत शिरू लागले. तेवढ्यात क्ष–७ ही पाणबुडी परत पाण्याबाहेर आली. ती जाळीतून बाहेर पडली होती; पण तिची एवढी मोडतोड झाली होती की तिचा कप्तान गॉडफ्रे प्लेस याने ती सोडून द्यायचा निर्णय घेतला. शरणागती दर्शवीत त्याने दरवाज्यातून पाण्यात उडी घेतली; परंतु त्याचे तिघे सहकारी बाहेर पडण्यापूर्वीच बोट रसातळाला गेली. गॉडफ्रे प्लेस याला एका छोट्या जर्मन बोटीने उचलले व टीरपीझवर पोहोचते केले.

थोड्या वेळाने क्ष–७ ही पाण्याबाहेर आली. ही मात्र टिरपीझपासून ५०० मीटर दूर म्हणजे तोफांच्या टप्प्यात होती. पांच ब्रिटिश सैनिकांच्या डोळ्यांसमोर जर्मनांनी तिला जलसमाधी दिली.

तीन तासांनंतर क्ष–७ चा पाणबुड्या (Diver) 'बॉब एटकीन' हाही जर्मनांच्या हाती सापडला. ह्या सहाही कैद्यांना दुसऱ्या दिवशी जर्मनीला पाठवण्यात आले. अजूनही पाण्यावर तरंगणारी टिरपीझ बघून आपले साहस व्यर्थ गेले असेच त्यांना वाटत होते.

युद्ध संपल्यावर जेव्हा त्यांना मायदेशी आणण्यात आले, तेव्हा त्यांना आपल्या हल्ल्याची सार्थकता कळली. ह्या हल्ल्यामुळे टिरपीझची यंत्रे निकामी झाली व पुढे कित्येक महिने ती युद्धात भाग घेऊ शकली नाहीत. एप्रिल १९४४ मध्ये जेव्हा दुरुस्ती पूर्ण होऊन ती युद्धात उतरली तेव्हा युद्धाचा रंग पालटला होता. पुढे १२ नोव्हेंबर १९४४ ला R. A. F. ने केलेल्या भीषण हवाईहल्ल्यात टिरपीझचा पुरता नाश झाला.

इंग्लंडला परतल्यावर ह्या वीरांचा मोठा सन्मान झाला. बकिंगहॅम पॅलेसमध्ये राजे सहावे जॉर्ज यांच्या हस्ते त्यांना पारितोषिके मिळाली.

परंतु त्यांना धन्यता वाटावी असा प्रसंग १९४८ मध्ये घडला. नाविकदलाने खास पत्रक काढून त्यांची प्रशंसा केली. 'It is clear, that courage and enterprise of the highest order was shown by these gellant gentlemen, whose daring attack will surely go down in history as one of the most courageous act of all times "

□ □

–थॉमस गॅलॅगर याच्या
" Twelve against Tirpitz "
या कादंबरीचा संक्षिप्त अनुवाद

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
परांजपे
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये

पुस्तके

# अरण्यरुदन आणि पालखीची गाणी

अशोक प्रभाकर डांगे

मानवी मनाची अस्वस्थता कवितेच्या निर्मितीस कारण ठरते. प्रत्येक काव्यामागे ही कलात्मक अस्वस्थता नेहमीच उभी असते. ही मनाची अस्वस्थता एक तर वैयक्तिक जाणिवांची प्रतिक्रिया असते किंवा ती सामाजिक जाणिवांची प्रतिक्रियाही असू शकते. यातली सामाजिक जाणिवांची प्रतिक्रिया प्रखर शब्द शोधते, ती तीव्र उपहास उभा करते किंवा बोचऱ्या विडंबनाचा आविष्कार करते. म्हणूनच सामाजिक जाणिवांची कविता लक्षणीय परिणाम करून जाते. पाडगावकरांची अभिजात सामाजिक कविता म्हणूनच समर्थ व्यक्तिमत्त्वानं उभी रहाते. नारायण सुर्व्यांसारखे कवीसुद्धा सामाजिक जाणिवांचीच कविता लिहितात. जीवनालाच आपलं विद्यापीठ मानून, त्यांत अनुभवांचे धडे घेत जगणारा हा माणूस आपल्या वैयक्तिक दुःखांना सार्वत्रिक पातळीवर नेऊन ठेवतो, तसाच सामाजिक दुःखांची प्रतिक्रिया स्वतःमध्येही शोधू शकतो.

वैयक्तिक जाणिवा ह्या सुद्धा कवितेच्या निर्मितिस्थानी असू शकतात. ह्या वैयक्तिक भावजीवनातून उभ्या रहातात. त्या भोगलेल्या किंवा न भोगलेल्या भोगांच्या नागव्या प्रतिक्रिया असतात किंवा जाणवलेल्या निसर्गाची जाणती प्रतिबिंबं असू शकतात. वैयक्तिक भावजीवनाच्या प्रतिक्रिया सुखातून चालत येतात. दुःखातून आकार घेतात. हळुवार भावनांना बोलक करतात किंवा एकाकी मनाची विषण्णता व्यक्त करतात. ग्रेसची कविता दुःखाच्या देखण्या प्रतिमा उभ्या करताना दिसते. आपल्या वैयक्तिक दुःखाची प्रतिमा ग्रेस संध्याकाळमध्ये शोधतात, तर अनुराधा पोतदार आपल्या विषण्ण एकाकीपणाचं चित्रण 'आवर्त'मध्ये. आता केवळ निसर्गाचीच नुस्ती प्रतिबिंबं महानोरांच्या कवितेत जाणवत नाहीत तर ते निसर्गाचंही देखणं मानवीकरण सहज करून टाकतात. म्हणूनच महानोरांची कविता ही एक श्रेष्ठ निसर्गकविता असते, तशीच ती एक श्रेष्ठ भावकविताही असते, महानोरांची निसर्गप्रतिकं स्त्रीदेहाची भाववाही अभिव्यक्ती दाखविताना दिसतात.

भोग प्रत्येक मनाला अटळ असतात. या भोगांचीच वैयक्तिक प्रतिक्रिया फार मोठ्या मानवी अवस्थतेला नेहमीच कारणीभूत ठरते. कारण शरिराच्या गरजा मानवी भावनांची वरचेवर कोंडी करून सोडतात. ही अस्वस्थता भोगांच्या आवश्यक गरजेपोटी निर्माण होते किंवा भोगानंतरच्या अटळ अशा शून्यतेतूनही जन्माला येते. म्हणूनच सेक्सही काव्यनिर्मितीची फार मोठी प्रेरणा असू शकते. अनियतकालिकातून पुढं आलेली आजची कविता काहीशी याच प्रेरणांचं प्रतिनिधित्व करताना दिसते. त्याचप्रमाणे ती वैयक्तिक वैफल्यातूनही तितकीच उभी रहाते. अर्थात ह्या अभिव्यक्तीचा प्रत्येक आविष्कार हा तितकाच वेगवेगळा असू शकतो. नामदेव ढसाळांची कविता ह्या सर्वांत लक्षणीय ठरते. कारण त्यातलं भोगांचं उघडं चित्रण केवळ वैयक्तिक जाणिवांसाठीच जन्माला न येता त्याहून पलीकडच्या वास्तव जीवनाशी नातं सांगतं. तशी शरीर, वैयक्तिक वैफल्य आणि सामाजिक वैफल्याच्या आविष्करणाचा प्रयत्न थोडयाफार प्रमाणात अनियतकालिकातून पुढे आलेला प्रत्येक कवी करताना दिसतो. यात 'इंद्रियोपनिषदा'चे काळसेकर, 'गोदी' चे 'गुर्जर, 'मर्तिक'चे खोत, आमच्या कवितांचे मनोहर ओक, कल्लोळचे कल्लोळी, योगभ्रष्टचे डहाके सूर्यमुक्तचे कारेकर अशा सर्वांचेच संदर्भ आवश्यक ठरतील. तरीही शारीरिक अस्वस्थतेची बरीचशी वैयक्तिक कविता हाच ह्या साऱ्या अलीकडच्या कवितेचा स्थायीभाव म्हणावा लागेल.

आता दिलीप धोंडो कुलकर्णींच्या साऱ्या कवितेचा ह्या संदर्भातच विचार करणं आवश्यक ठरेल. 'अरण्यरुदन आणि पालखीची गाणी' हा त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह. अरण्यरुदनाचे चाळीस सर्ग तर पालखीची आणखी आठ गाणी तो संग्राहित करतो. त्यातल्या अरण्यरुदनातल्या कवितांचा विचार वेगळा करावा लागतो. कारण हे चाळीसही एकाच भावनेचे चाळीस खंड ठरतात. ही भावना फक्त उपभोगाचीच आहे. कदाचित तशी तुटक अभिव्यक्ती कवीला अभिप्रेत असेलही किंवा नसेलही. तरीही ह्या साऱ्याच कविता देखण्या शरीरप्रतिमांनी सजलेल्या दिसतात. त्यात वृत्तीचं चांदणं आहे. पिढऱ्यांचे दिवे आहेत. मिठीची मशीद आहे. तसाच केसांचा काळोख पण दिसतो. ह्या देखण्या प्रतिमांवरच ही सारी कविता उभारली जाते. या साऱ्या कविता स्त्रीच्याच शरिराला महत्त्व देतात. कधी तरी कुलकर्णी

> उद्याच्या खुण्यातून निखळलाय आज
> तुझ्यातून परतलंय माझं आकाश

असे वेधक शब्द लिहून सुद्धा जातात; पण हे सारेच सर्ग केवळ आकड्यांच्या उपस्थितीशी जोडलेले दिसतात. म्हणूनच बाराच्या बटबटीत बटव्यात किंवा तेरांच्या अशुभतेत किंवा चौदाव्या संभोगात यासारख्या आकड्यांच्या करामतीत ते गोंधळलेले दिसतात. म्हणूनच उत्कृष्ट अर्थवाही प्रतिमा उभारूनसुद्धा दिलीप धोंडो कुलकर्णींची कविता एकसंध व्यक्तिमत्त्वानं उभी राहिलेली दिसत नाही.

यात संग्राहित झालेली पालखीची आठ गाणी मात्र दर्जेदार ठरतात. शब्दांची लय ती अचूक पकडताना दिसतात. म्हणूनच

> काम चालू एकटा मी आंधळे माझे दिवे
> सोबतीला फक्त माझ्या नेत्रथेंबांचे थवे.

किंवा

> रक्त हलले फूल फुलले पालखीतुन चालले
> काजव्यांचे क्षीण वल्ही मी स्तनांवर माळले.

या दिलीप कुलकर्णींच्या ओळी अत्यंत प्रभावी ठरतात. भोगांची पालखी शब्दातून वाहून नेताना कुलकर्णींचे शब्द मोकळे होतात. अरण्यरुदनातली तुटकता संपून जाते, आशय स्पष्ट होतात आणि शब्दांनाही देखणी लय मिळते. दिलीप धोंडो कुलकर्णींच्या ह्या साऱ्याच कवितेत पालखीची गाणी उठून दिसतात. आजकालच्या इतर बऱ्याच कवितांसारखी कुलकर्णींची कविता शारीरिक अस्वस्थतेची मानसिक प्रतिक्रिया असते. तिच्यातल्या देखण्या प्रतिमांची उभारणी जितकी लक्ष्यवेधक ठरते तितकीच चारु भागवत आणि अनिल सडोलीकर यांची रेखाटनंसुद्धा आशयपूर्ण ठरतात. *

**अरण्यरुदन आणि पालखीची गाणी**
**दिलीप धोंडो कुलकर्णी**
**'लू' प्रकाशन, कोल्हापूर**
**मूल्य रुपये पाच.**

# अकरा कोटी गॅलन पाणी : पृष्ठ १५ वरून

हजेरी–रजिस्टरमध्ये खाडाखोड करण्यात येऊन मृतांचा आकडा कमी. दाखविण्यात येईल अशी भीती त्यांना होती.

नंतर पोलीस आले. प्रचंड संख्येने आले आणि तरीही त्यांनी मारझोड, दडपशाही केली नाही. पुढाऱ्यांना मध्ये घालून, जबाबदार मंडळींकडून खाडाखोड केली जाणार नाही असे आश्वासन देऊन, हजेरी–रजिस्टर परत मिळविले. दंडुके चालवण्याचीच खोड जडलेल्या पोलिसांनी काम अकलेने आणि समजसपणे साधले. परिणामी एकीकडे प्रचंड पोलिसबळाची धास्ती आणि दुसरीकडे सौजन्य आणि सहानुभूतिपूर्वक वागणूक याने कामगार संभ्रमित झाले.

दरम्यानचे काळात मातब्बर बडीबडी पुढारीमंडळी एका मागोमाग येऊन थडकू लागली. ‘कामगारांचे जीवित धोक्यात’ अशा नरो वा कुंजरो वा विधानांनी लोकांना आशेवर टांगत ठेवले गेले आणि याच काळात कोण जिवंत आहे, कोण मेले आहे हे निश्चित व्हायच्या आधीच एकजात सर्व अडकलेल्या कामगारांच्या कुटुंबांना मदत चालू केली गेली. (कारण एकही जण वाचणार नाही याची शासनाला, मॅनेजमेंटला खात्रीच होती.) आणि या साऱ्या ‘धोरणीपणाने’ कामगारांचा संताप गोठून गेला.

–आणि ‘आणिबाणीची’ धास्ती नाही म्हटली तरी होतीच.

याशिवाय कोलीयरीचे जनरल मॅनेजर भट्टाचार्यांच्या झालेल्या अवस्थेचाही कामगारांवर नाही म्हटले तरी परिणाम झालाच !

भट्टाचार्य अपघाताच्या आधी फक्त तीन मिनिटेच खाणीतून वर आले होते. ते आपल्या चेंबरमध्ये परतही गेले नव्हते तोच अपघात झाला. भट्टाचार्य धावत खाणीच्या तोंडाशी (पीटमध्ये) आले. झाला प्रकार डोळ्यांना दिसत असूनही वेड्यासारखे आत शिरायचा प्रयत्न करू लागले. ‘वेड्यासारखे’ प्रयत्न करू लागले म्हणजे खरेच त्यांच्या मनावर जबरदस्त आघात झाला होता ! बाकीच्या लोकांनी त्यांना ओढून ऑफिसमध्ये नेले; पण त्या क्षणी त्यांचा तोल गेला तो गेलाच ! त्यांना रांचीला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. आपल्या अधिकारातील खाणीतील ३७५ कामगार फट्दिशी मरतात हा काही साधासुधा आघात नव्हे......

कामगार भट्टाचार्यांविषयी बोलताना सहानुभूतिपूर्वक बोलत होते. एरवी करड्या शिस्तीच्या अधिकाऱ्याविषयी कुणी चांगले बोलत नाही.

हळूहळू बोलणे सुरू केले. वाढवत नेले. त्या घोळक्यात एक जण जरा ‘जग बघितलेला’ दिसत होता. मुंबईला काही काळ राहून आलेला होता...त्याचा सख्खा भाऊ अपघातात मेला होता !

...‘क्या करना साब; पेटके वास्ते ये किचडकी नोकरी करनी पडती है।...कोलीयरीतल्या आम्हा कामगारांचे आयुष्य अतिशय वाईट. आम्ही ना धड शहरी वातावरणात असतो ना खेड्यात असतो. मुंबईला हॉटेलमध्ये काम करायचो. रोज कुर्ल्याहून मसजिदबंदरला जावे लागायचे. प्रवास नको वाटायचा; पण आता तो बरा वाटतो. मैलमैल लांब माणूस दहा–पाच मिनिटात जातो.

‘या कोलीयरीत प्रत्येकाला काही कॉलनीत जागा नाही. दोन-दोन कोस दूरवरच्या खेड्यात रहावे लागते. रोज जाण्यायेण्यातच वेळ जातो. बसेस आहेत त्यांचा फार थोड्यांना फायदा मिळतो. पावसाळ्यात, थंडीत सायकलही नको वाटते.

‘आठ तासांची ड्युटी; पण खाणीत गेल्यावर आत कामाच्या जागी जायलाही वेळ लागतो. घाणेरड्या हवेत, काळ्या कोळशात काम केल्यावर, वर आल्यावर एंटरटेनमेंटही नाही. कामगार व्यसनी होतात. आमच्या इथे दारू पिण्याचे प्रमाण इतर कामगारांपेक्षा फार जास्तय.’

तो बरेच काही बोलत होता. सांगत होता; पण त्याचे मनाला लागले ते एकच वाक्य......

‘साब, मेरा भतीजा बांगला लढाईमें फटसे मारा गया। हमारे गावमे सभा हुई। साला बेवडा था फिर भी उसे ‘शहीद’ कहके लोगोंने मीटिंग ली। यहाँ मेरा सगा भाई मर गया, उसके नाम कौन रोनेवाला है। हमने खदानसे कोयला निकाला नहीं तो टँक बननेवाला है ? रेल चलनेवाली है ?’

मला वाटले तो आता रडेल; पण तो रडला नाही. त्याची बुबळे ओल्या कोळशासारखी अचेतन नी थंड दिसत होती.

मी आजही विचार करतोय; तुम्ही विचार करा. ‘जय जवान, जय किसान’ ही घोषणा अपुरी नाही का ? ‘जय मजदूर’ ही देखील घोषणा पाहिजे आणि नुसती घोषणा नाही तर वर्तणूक पाहिजे !

रशियात किंवा इतर समाजवादी देशात कामगाराला सन्मान आहे. आपल्या कर्तव्याला चोख जागणाऱ्या कामगारांना राष्ट्रीय पारितोषिक दिले जाते. आपल्याकडे असे दिले जाते का ? पोलिसांना पदके देतात आणि कामगारांना...?

कोळसाखाणीतील काम हे सर्वांत कष्टाचे, धोक्याचे, क्लेशाचे काम; पण अत्यावश्यक काम. हे जो पार पाडतो तो खाणकामगार आपल्या उद्योगविश्वाचा शेष आहे. ज्याच्या फण्यावर आपले उद्योगविश्व त्याला आपण काय सन्मान देतो ?

‘ब्लिट्झच्या’ करंजियांनी लिहिले आहे, ‘चासनाला दुर्घटना ही खाणदुर्घटना नाही; राष्ट्रीय आपत्ती आहे. पुढारी मेल्यावर झेंडा अर्ध्यावर उतरविणारे आपण राष्ट्रीय जीवनात मोलाची कामगिरी पार पाडणाऱ्या तीनशेपंच्याहत्तर मजुरांच्या मृत्यूनंतर झेंडा अर्ध्यावर का उतरवीत नाही ?’

चार जवान सीमेवर मेल्यावर शोकसभा भरवणारे, त्यांच्या आत्म्याला सद्गती मिळावी म्हणून सामुदायिक प्रार्थना म्हणणारे आपले राष्ट्र; तीनशेपंचाहत्तर मजुरांच्या मृत्यूविषयी राष्ट्रीय पातळीवर शोक का नाही करत ?

चार भिकेचे तुकडे टाकून आपण आपल्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. समाजवादाची ऊठबस बाता करणारी आपण मंडळी; समाजवाद आणणाऱ्या, समाजवादाचा पाया असलेल्या कामगारवर्गाला राष्ट्रीय सन्मान देणार आहोत की नाही ?

□

'चार-आठ दिवसांचं काम नाही बाबा; चार-आठ दिवसांचं काम नाही!' स्वतःशीच पुटपुटत आपलं बिऱ्हाड खांद्यावर टाकून मी चालू लागलो.

कोळसाखाणीचं आयुष्य इतकं नवखं-नवखं नी परकं होतं, की ते जाणून घ्यायला खरंच चार-आठ दिवस पुरणार नव्हते. त्यात 'अनुभूती' मिळवणे कठीण होते.

आसपासच्या एक-दोन खाणींतून मी खाली जाता येईल काय याची चौकशी केली होती; पण 'अनधिकृत' माणसाला खाणीत जायला बरीच परवानगी वगैरे घ्यावी लागते. एरवीच लाल फितीत गुरफटणे मला आवडत नाही, सहन होत नाही. त्यात चासनाला अपघातानंतर कायदेकानून अधिकच कडक झाले होते. तसा प्रयत्न केला असता तर एखाद्या कॉंट्रॅक्टरला मस्का लावून आत जाऊन येता आले असते; पण तेवढा वेळ (अगदी खरे बोलायचे म्हणजे तेवढा पैसा) जवळ नव्हता आणि म्हणूनच चासनालाला एक इच्छा अपुरी ठेवून परतीला लागलो होतो.

अपघाताची कारणे अनेक असू शकतील. जुन्या खाणीचा चुकीचा नकाशा अथवा नको तिथे सुरुंग लावणे किंवा इतरही अनेक. मायनिंग इंजिनियरांच्या म्हणण्यानुसार खाणीतील सर्व पाणी काढले जाऊन तपासणी होईपर्यंत खरे कारण कळणार नाही; पण आजवरच्या सर्वच मोठ्या अपघातांचे खापर चौकशीसमित्यांनी मॅनेजमेंटवर फोडले आहे. चासनाला-अपघाताचे खापर कोणाच्या डोक्यावर फोडणार?

—ते निसर्गाच्या डोक्यावर फोडणे म्हणजे शुद्ध आत्मवंचना ठरेल. इस्कोचा एक अधिकारी कपाळावर हात लावीत, किस्मतीवर, निसर्गावर ठपका ठेवत होता; पण हा दृष्टिकोनच चुकीचा आहे. जमीन चिरून तिच्या पोटातील संपत्ती काढायला निघालेल्या माणसानें 'निसर्गाचा कोप' म्हणणे यात अर्थ नाही. माणूस जाणीवपूर्वकच निसर्गाशी युद्ध करायला निघाला आहे आणि युद्धात शत्रू प्रबळ होता या युक्तिवादाने पराभवाचे कारण सापडत नाही. तो टळतही नाही. आपले कुठे चुकले तेच पहायला लागते.

—तर प्रश्न असा आहे की, आपले कुठे चुकले?

आता आपले कोठे चुकले हे सांगायला मी काही माईन-एक्सपर्ट नव्हे; पण माझ्या अज्ञ बुद्धीलाही जाणवल्या त्या चार गोष्टी मांडायलाच पाहिजेत. कदाचित मला जाणवले ते चूकही असेल; पण शोधाला कारणीभूतही होऊ शकेल.

अगदी पहिली गोष्ट मला जाणवली ती म्हणजे ही की, कोळसाकामगार प्रशिक्षित नाहीत. ही उणीव चासनाला-अपघाताला कारणीभूत नसेलही; पण ही उणीव आहे ही गोष्ट खरी— दुसऱ्या महायुद्धानंतर खाणी जसजशा खोल होऊ लागल्या तसतसे खाणीतील काम हे ढोरमेहनतीचे न रहाता तांत्रिक प्रशिक्षणाचे बनत गेले; पण सरकारने धोरण आखून आणि कंपन्यांनी मान्य करूनही कामगारांना चांगल्या रीतीने प्रशिक्षित करण्यात आले नाही. ज्यांना जुजबी प्रशिक्षण दिले गेले आहे त्या कामगारांची सरासरी एकंदर कामगारांच्या तीस टक्के सुद्धा नाही आणि ही खचितच चिंतेची बाब आहे.

'इंटक'च्या 'खाणमजदूर' अंकाच्या वर्षा-दोन वर्षांपूर्वीच्या फायली चाळल्या तेव्हा खाणींतील छोटे छोटे अपघात कामगारांच्या अज्ञानाने, दुर्लक्षाने कसे होतात यावरील तीन लेख वाचले. सदर लेखांतील माहिती फार तांत्रिक होती म्हणून या लेखात समाविष्ट केली नाही; पण खाणीतील छोटे अपघात बहुतांशी कामगारांना प्रशिक्षण न दिल्याने होतात. निदान चासनाला दुर्घटनेनंतर तरी वर्ष-दीडवर्षाच्या काळात सर्व कामगार प्रशिक्षित करण्याचा विडा सरकारने उचलला पाहिजे. त्याने किरकोळ अपघातांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकेल.

मोठ्या अपघातांच्या बाबत तज्ज्ञांचीच मते घेतली पाहिजेत; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे चार ते पाच लाख खाणकामगार असलेल्या आपल्या देशाला इंग्लंडचे एक्सपर्टस् बोलवावे लागतात. चासनाला खाणीचा प्लॅन ब्रिटिश एक्सपर्टचा आणि ब्रिटनमधील खाणकामगारांची संख्या जेमतेम तीन लाख. अलीकडे आपल्याकडेही मायनिंग इन्स्टिटस्टयूट निघत आहे. तिथून तरुण विद्यार्थी बाहेर पडत आहेत. त्यातील दरसाल काही तरुण हुषार विद्यार्थ्यांना परदेशी पाठवून पाच वर्षांच्या काळात चांगले मायनिंग एक्सपर्टस् आपल्या देशात निर्माण करण्याचे धोरण आपण ठेवले आहे. दोनशे अब्ज टन कोळसा असलेल्या आपल्या देशाला बाहेरचे एक्सपर्टस दीडशे वर्षांच्या खाणउद्योगानंतर बोलवायला लागावेत ही जरा लाज वाटायला लावणारी गोष्ट आहे.

चासनाला-अपघातानंतर भारत कोकिंग कोल कंपनीने (राष्ट्रीयीकृत) जुन्या खाणींच्या पहाणीची मोहीम हाती घेतली आहे. वस्तुतः ती यापूर्वीच घ्यायला पाहिजे होती. खाजगी मालकांची वृत्ती सरकारपासून काही दडून नव्हती. आता तरी वर्ष-दीड वर्षाच्या कालावधीत सर्व जुन्या खाणींची पहाणी पूर्ण व्हावी.

याआधी भरलेल्या तिन्ही सुरक्षापरिषदांच्या सूचना लक्षात घेऊन तसा कायदा पास करावा. आता खाणींना लागू असलेले सुरक्षा नियम अपुरे आहेत हे सिद्ध झाले आहे. तेव्हा पुन्हा चौथी परिषद घेण्यापेक्षा आधीच्या तिन्ही परिषदांची फलश्रुती व्हावी.

तसेच ठेकेदारांचे तात्काळ निर्मूलन व्हावे. ठेकेदारांकडे सोपविण्यात येणाऱ्या कामात गोंधळ किती होतात हे मातीमिश्रित सिमेंटच्या हाउसिंग बोर्डात रहाणाऱ्यांना पुरते ठाऊक आहे. ६९ सालीच बॅनर्जी कमिशनने ३० सप्टें. ७० च्या आत ठेकेदारी पद्धतीचे पूर्ण निर्मूलन करावें अशी सूचना केली होती. सरकारने लोकसभेत दरवेळी ठेकेदारी पद्धतीच्या विरुद्ध सरकार असल्याचे सांगितले आहे. मग राष्ट्रीयीकरणाच्या दोन-तीन वर्षांनंतरही ठेकेदारी-पद्धत कशी चालू राहिली? ठेकेदारांकडे कामगारांना कमी मजुरी, कामाची अनिश्चितता, जुलूम असतातच पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे ठेकेदार बऱ्याच प्रमाणात अपघाताच्या कारणांनाही जबाबदार असतात.

लहान लहान खाणींचे एकत्रीकरण ही तर सर्वांत महत्त्वाची बाब. सरकार सध्या त्या दृष्टीने पावले टाकत आहेच. ती अधिक जलद पडली पाहिजेत. खाणी खोल होऊ लागल्या तसा खाणउद्योग अधिकाधिक भांडवलाचा होऊ लागला. परिणामी कमी भांडवलाच्या छोट्या खाणींतून कमीत कमी वेळात जास्तीत जास्त उत्पादन आणि काटकसर असे धोरण अवलंबण्यात येऊ लागले. लहान खाणींतून अपघातांची संख्या जास्त आहे. पुन्हा लहान खाणींच्या उत्पादनावर दुष्परिणाम होतो तो निराळाच.

कोळसाखाणीतले खरे काम डीपीलरायझिंगचे. मोठ्या प्रमाणात कोळसा खांबातच अडकून पडलेला असतो. तेव्हा खाण खणत गेल्या-नंतर खणलेल्या भागात वाळू व पाणी मारून रूफला आधार देऊन डीपीलरायझेशन करण्यात येते. पाश्चात्य देशात एकाच वेळी डीपील-रायझेन आणि खाण खणत जाण्याचे तंत्र निघाले आहे. आपल्याकडे ते अजून अवलंबिले गेलेले नाही. त्याचा काही फायदा होतो का, ते बघितला पाहिजे.

आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अपघात अनेक प्रकारे होत असले तरी अपघाताचे स्वरूप काही ठराविक प्रकारचेच असते, हे लक्षात घेऊन, अपघात घडला तर सर्व प्रकारची मदत चार तासांत मिळू शकेल अशी व्यवस्था झाली पाहिजे.

चासनाला खाणीत पाणी शिरले तेव्हा आपल्याकडे मिनिटाला हजार गॅलनपेक्षा अधिक पाणी खेचणारे पंपच नव्हते. मग धावपळ करून रशियाकडून मिनिटाला पंधारा हजार गॅलन पाणी खेचणारे पंप मागवावे लागले. चासनाला–अपघात मोठा असला तरी खाणीत पाणी शिरण्याचे प्रकार आपल्याकडे यापूर्वी अनेकदा झाले आहेत. मग आपल्याकडे पंप का नाहीत ? याबाबत परावलंबी राहणे किती इष्ट आहे ?

अमेरिकेने देऊ केलेले पंप तांत्रिक कारणासाठी आपण वापरू शकलो नाही. रशियन पंपही आपल्याला १०० टक्के उपयोगी ठरले नाहीत. जर आपल्याला हवे तसे मोठे पंप आपल्याकडे असते तर पाणी आठ दिवसांत खेचता आले असते. किमान पक्षी थोडे तरी कामगार आपण वाचवू शकलो असतो. तेव्हा प्रत्येक खाणीतील रेक्यु टीमकडे सर्व साधनसामुग्री तातडीने उपलब्ध करून दिली पाहिजे. मुंबई नगर पालिकेचा कित्ता गिरवणे शहाणपणाचे नाही. आपली मुंबई–महानगरपालिका स्कायस्क्रॅप्ट बांधायला परवानगी देऊन बसते. फायरब्रिगेडकडे तेवढ्या उंच शिड्या आहेत का, ते बघत नाही. मग सोळाव्या नाही तर सतराव्या मजल्याला आग लागली की डोळे पांढरे करीत बसते.

खाणउद्योगात अपघातांचा धोका अटळ आहे हे खरे; पण त्याचे काय प्रमाण याचे काही गणित ?

इंग्लंडमध्ये दरसाल ३००० अपघात १९६० सालापर्यंत घडत होते. अशाच एका विलायती चासनालानंतर लॉर्ड रेबेन्सच्या नेतृत्वा-खाली प्रयत्नपूर्वक अपघातांचे प्रमाण खाली आणायला सुरुवात करण्यात आली. ते प्रमाण ६६ साली वार्षिक ८२ अपघातांइतके खाली आणण्यात आले. गोऱ्या साहेबाचा हा कित्ता आपण गिरवलाच पाहिजे.

खाणउद्योगाच्या राष्ट्रीयीकरणानंतर मॅनेजरियल स्टाफ पुढे बोलताना मोहन कुमारमंगलम् यांनी सांगितले होते, 'उत्पादन वाढवलेच पाहिजे; पण उत्पादनवाढीपेक्षा प्रथम अपघात कसे कमी होतील, हे पाहिले पाहिजे. कामगारांचे बळी देत आपल्याला उत्पादन वाढवायचे नाहीय !'

पण गेल्या तीन वर्षांचा ताळेबंद काय ?

—तर वाढते उत्पादन, वाढते बळी !

उत्पादनातील तूट भरून काढता येते, गेलेले जीव भरून देता येतात का ?

¤

मेनगेटपाशी ती हंबरडा फोडून रडत होती. तिचे दोन-चार सगे-सोयरे तिला समजावत होते. बिचारी खाणअपघाताचे वृत्त ऐकून आली होती. आपला नवरा त्या वेळी कामावर नसेल या आशेने !

—बिचारीची आशा फोल ठरली होती !

ओरडणाऱ्यांच्या दुःखात त्वेषाने सहभागी होणारा मी रडणा-ऱ्यांच्या दुःखातून पळपुट्यासारखा पळून जातो.

ती रडत होती...मी नजर चुकवत झपाझप चालत होतो. तिचं नाव, गाव, कथा विचारावीशी वाटली नाही. इतर तीनशेचौऱ्या-हत्तरांपेक्षा ती थोडीच वेगळी असणार होती ?

टॅक्सीत बसलो. टॅक्सी वेगाने धनबादच्या दिशेने धावू लागली. सहज म्हणून मागे वळून पाहिले आणि क्षणभर डोक्यात भूकंप झाला...काळीज दुभंगले !

मागे पडणाऱ्या त्या गावातील तीनशेपंचाहत्तर घरांना भिंती होत्या–दरवाजे होते, खिडक्या होत्या–उंबरठे होते; फक्त छपरेच तेवढी नव्हती !

ती केव्हाच बुडून गेली होती !...

अकरा कोटी गॅलन पाण्यामध्ये !

## समाप्त

**कम्युनिस्ट** : पृष्ठ ११ वरून

कारक आंदोलनाच्या व संघर्षाच्या मार्गापासून तो दूर जाण्याचा संभव असतो. दुसरा धोका म्हणजे भांडवलदारवर्ग कम्युनिस्टांना लोक-शाहीच्या मार्गाने क्रांती करू देत नाही. कम्युनिस्टांच्या हाती सत्ता जाऊ द्यावयाची नाही व गेली तरी फार काळ टिकू द्यावयाची नाही असे त्यांचे प्रयत्न असतात. अशा वेळी ते लोकशाहीचा डोलारा उधळून लावून लष्करी हुकूमशाही प्रस्थापित करतात. स्पेन व चिलीचा अनुभव याबाबतीत बोलका आहे. कम्युनिस्ट क्रांती मोडून तेथे प्रतिक्रांती घडवून आणण्यास बड्या भांडवलदारी राष्ट्रांकडून तेथील प्रतिगामी गटांना लष्करी व आर्थिक मदत मिळते. चिलीतील आयेंडे यांची कम्यु-निस्ट राजवट उलथून पाडण्यासाठी सी. आय. ए. ने काय कारवाया केल्या हे आता पुराव्या-निशी सिद्ध झालेले आहे. अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे इटलीत गेल्या वर्षी स्थानिक संस्थांच्या निवडणुकांत कम्युनिस्टांनी मिळ-विलेल्या यशानंतर तेथील कम्युनिस्टविरोधी नेत्यांना अमेरिकेच्या सी. आय. ए. ने किमान ६० लाख डॉलर मदत दिली अशी न्यूयॉर्क टाइम्सची बातमी आहे. एखाद्या कम्युनिस्ट पत्रातली ही बातमी असती तर कम्युनिस्ट प्रचार म्हणून ती बाजूला सारता आली असती. तसे न्यूयॉर्क टाइम्सच्या बातमीबद्दल म्हणता येणार नाही आणि सी. आय. ए. चा आतापर्यंतचा इतिहास पाहता यात अशक्य वाटण्यासारखे काहीच नाही. तेव्हा हे दोन धोके टळत नाहीत तोपर्यंत लोकशाही मार्गाने कम्युनिस्ट क्रांती होण्याची शक्यता नाही. □

# वीस कलमी कार्यक्रम : पृष्ठ ८ वरून

चालू असले तर उत्पादन होणेच कठीण. मालक-कामगार यांत सामंजस्य नांदावे म्हणून १९४७ सालच्या 'औद्योगिक कलह कायद्या'ने वर्क्स कमिटयांची पद्धत सुचवली. १९५८ सालापासून संयुक्त-व्यवस्थापकमंडळांची कल्पनाही उद्योगक्षेत्रात राबवली जात आहे. मध्यंतरी सरकारने काही सरकारी उद्योगांच्या व्यवस्थापक-मंडळांवर कामगारांचे प्रतिनिधी नेमले. कामगारनेत्यांना सरकारी कारखान्याचा मुख्य संचालकही करून पाहिले. उद्योगजगतात अजूनही शांतता नांदत नाही. मालक आणि मजूर दोन्हीही बाजू सामंजस्य दाखवीत नाहीत. या संदर्भात, नवी नव्हे पण राष्ट्रीय योजना म्हणून 'व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग' ही कल्पना सरकार सर्व उद्योगांत कायद्याने राबवून पाहायचा प्रयत्न करणार आहे. उत्पादन-वाढ साधावी या दृष्टीने अगदी प्रत्यक्ष उत्पादन होणाऱ्या कर्मशाळे-पासून संचालकमंडळापर्यंतच्या सर्व विभागोपभागात कामगारांचा सहभाग प्रस्थापित करण्याचा सरकारचा विचार आहे. पाचशेपेक्षा अधिक कामगारांना रोजगार पुरविणाऱ्या सर्व कारखान्यांतून, संरक्षक उपाय, सर्वसाधारण शिस्त, कामाच्या ठिकाणची परिस्थिती आणि सेवानियम, कामगारांचे आरोग्य आणि कल्याणयोजना, कार्य-क्षमतेत आणि उत्पादकतेत वाढ या सर्व बाबतींत निर्णय घेण्यात कामगारांचा सहभाग राहील. शंभराहून अधिक कामगारांना रोजगार पुरविणाऱ्या कारखान्यांतून मालक आणि कामगार यांची संयुक्त मंडळे नेमण्यात येतील. जे प्रश्न कुठल्याही खात्याच्या अगर कर्म-शाळेच्या कक्षेबाहेर असतील आणि खात्याच्या कार्यसमितीला सोडवणे शक्य नसेल असे प्रश्न या संयुक्तमंडळाकडे जातील. उदा. कामगारांची कुशलता व क्षमता वाढविणे, सर्वसाधारण व्यवस्थापन आणि धोरण, बक्षिसे देणे या गोष्टी संयुक्तमंडळे हाताळतील. उद्योगाच्या संचालकमंडळावरही कामगार असल्याकारणाने कुठल्याही धोरणविषयक निर्णयात त्यांचा विचार घेतला जाईल.

देशातील सर्व उद्योगगृहांतून कामगारांचा असा सहभाग कायद्याने निर्माण झाला तर कार्यक्षमता व उत्पादकता वाढेल अशी सरकारची धारणा आहे. इतिहासाचा दाखला तसा नाही. रॉबर्ट ओवेन यांच्या 'न्यूलॅनार्क'च्या अपयशाची आठवण इथे होणे अपरिहार्य; तरी पण तो प्रयत्न एकांडा होता. या देशातले सरकार हा प्रयत्न करणार आहे आणि कायदा म्हणून तो राबवला जाणार आहे. त्यामुळे आपण यशाच्या आशेने या प्रयत्नाकडे पाहायला हरकत नाही.

परवा गृहराज्यमंत्री ना. रघुनाथ रेड्डी यांनी उद्योगव्यवस्थापनात कामगारांचा सहभाग प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने काही सरकारी सूचनावजा आदेश जाहीर केले. त्यात आदेशाचा भाग कमी आहे—सूचनांचा भाग अधिक आहे. शिवाय व्यवस्थापनापेक्षा उत्पादन आणि कामगारकल्याण याच क्षेत्रात कामगार-सहभाग निर्माण करण्यावर या सूचनांचा जोर दिसतो. त्यामुळे देशातील उद्योगक्षेत्र—व्यवस्थापक आणि कामगारवर्ग या सूचनावजा आदेशांना कसा प्रतिसाद देतात ते पाहाणे हेच आपल्या हाती आहे !

## १८ : नवी उमेदवारीयोजना

प्रामुख्याने समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी, उद्योग-धंद्यांतून व कारखान्यांतून शिकावू उमेदवार म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी, त्यांना पुढे रोजगारी मिळावी या हेतूने ही योजना राबवली जाणार आहे. योजना नवी नाही. देशातील विविध प्रकारच्या ६१ उद्योगधंद्यांना विशिष्ट प्रमाणात प्रशिक्षणार्थी उमेद-वार विशष्ट काळापुरते घेण्याची सक्ती सरकारी आदेशानुसार यापूर्वीच करण्यात आली होती. विशेषत: सरकारी क्षेत्रातील कार-खाने ती आजपर्यंत कसोशीने पाळीत होते. उमेदवारी-कायद्यात काही सुधारणा करून आणखी ४० उद्योगधंद्यांत उमेदवारीपद्धती आणण्याचा सरकारचा विचार आहे. प्रत्येक धंद्यातील उमेदवारांची संख्या आणि प्रमाणही वाढणार आहे. अनुसूचित जन-जातींना, अल्प-संख्य जमातींना आणि अपंगांना या योजनेत काही आरक्षित जागा ठेवल्या जातील.

आज उमेदवार घेणारे कारखाने उद्योगउमेदवारीचा काल संपल्यावर उमेदवारांना त्याच कारखान्यात अगर उद्योगात रोजगार देण्याची शाश्वती देत नाहीत. वर्ष-दोन वर्षे अल्प उमेदवारी भत्त्या-वर काम करून कौशल्य अंगी बाणल्यावरही उमेदवाराला नोकरी मिळण्याची शाश्वती नसेल तर उमेदवारीपद्धतीला अर्थच उरणार नाही. सरकारने उमेदवारी-योजना लागू असणाऱ्या उद्योगांना तशी सक्ती करायला हवी. जास्तीत जास्त उद्योगांतून उमेदवारीपद्धत अंमलात आणावी.

महाराष्ट्रराज्याने चोवीसशेपेक्षा कमी उत्पन्नगटातील कुटुंबांतील व्यक्तींसाठी ८० टक्के जागा राखून ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सुशिक्षित बेकारांसाठी 'एम्प्लॉयमेंट प्रमोशन प्रोग्रॅम' हाती घेतला आहे. राज्यातील विविध घटकउद्योगांच्या साहाय्याने सुशिक्षित बेकारांना सहा महिने प्रशिक्षण देऊन स्वयंउद्योगी बनवणे हा या योजनेचा हेतू आहे. एकूण १२ हजार सुशिक्षितांना असे शिक्षण देण्याचा इष्टांक ठरवला आहे. या १२ हजारांतील २००० जागा अनुसूचित जन आणि जातींकरता राखून ठेवल्या आहेत.

केंद्र शासनानेही, सुशिक्षित बेकारांची वाढती संख्या लक्षात घेऊन आणि सुशिक्षित बेकार म्हणजे 'स्फोटक मालमसाला' असतो याची जाणीव ठेवून सुशिक्षित बेकारांसाठी २० कलमी कार्यक्रमात आणखी एक कलम वाढविणे जरूर आहे.

## १९ : वाहातुकीसाठी राष्ट्रीय परवाने

गेल्या पंचवीस वर्षांत देशातील मालवाहातुकीचे प्रमाण सारखे वाढत आहे. रेल्वेच्या जोडीने आता देशभर मोटारवाहातूकही मोठ्या-प्रमाणात आपला वाटा उचलीत आहे. १९५०–५१ साली एकूण मालवाहातुकीचा ११ टक्केच वाटा मोटार-वाहातूक उचलीत असे. आज हे प्रमाण २५ टक्क्यांएवढे वाढले आहे. रेल्वेवाहातुकीतील दिरंगाई, वाढते दर, वाहातुकीतील विलंब, चोऱ्या इत्यादी अनेक कारणांमुळे वाहातुकीचे पारडे मोटारवाहातुकीच्या बाजूला झुकलेले दिसते; पण मोटारवाहातुकीवर आज राज्याराज्यांचे निर्बंध अस-ल्याने, औपचारिक पाहाण्या—चौकशा—कर भरणे यामध्ये आंतर-राज्यीय मोटार-वाहातुकदारांचा खूपच खोळंबा होतो. प्रत्येक सीमेमर 'अवैध जकाती' भराव्या लागतात. देशातील वाहातूक सुरळीत, सुलभ व स्वस्त होण्याच्या दृष्टीने या गोष्टी थांबायला हव्यात. या गोष्टींची जाणीव ठेवून आणि मालवाहातुकीतील मोटार–वाहा-तुकीचे महत्त्व ओळखून (मोटार-मालवाहातुकीचा निर्देशांक १९५०–५१ साली १०० होता, तो ६०–६१ साली ३१६·४ झाला, ६५–६६ साली ६२०·०० झाला, ६९–७० साली ७९६·४ झाला आणि १९७३–७४ साली १५२७·३ होईल असा अंदाज होता. पुढील प्रत्यक्ष आकडे उपलब्ध झाले नाहीत.) केंद्रीय शासनाने वीस कलमी कार्य-क्रमात मोटार-वाहातुकीसाठी राष्ट्रीय परवाने देण्याचा निर्णय घेतला. तो प्रत्यक्षात आणण्यासाठी राष्ट्रपतींनी एक वटहुकूमही काढला. त्यान्वये प्रत्येक राज्यातील काही ठराविक संख्येच्या वाहनांना

' राष्ट्रीय परवाने ' या नावाचे वेगळे परवाने दिले जातील. या वाहनांना भारतात कुठेही संचार करण्याची मुभा असेल. सीमेसीमेवर खोळंबायला लागणार नाही. सुरुवातीला असे ५३ हजार परवाने द्यायचा सरकारचा विचार आहे.

या धोरणामुळे देशातील वाहातुकीची कोंडी फुटेल. औद्योगिक कच्च्या व पक्क्या मालाची सुलभ, जलद आणि स्वस्त वाहातूक होऊ लागेल. हव्या त्या भागात अन्नधान्याची त्वरित वाहातूक होऊ शकल्याने देशात मधूनमधून निर्माण होणाऱ्या टंचाई–विभागांना अल्पकाळात दिलासा देता येईल. वाहातूक मोकळी झाली की विविध वस्तूंच्या विविध भागांतील किमतीतील तफावतही खूपच कमी होईल.

पण हे सारे होण्यासाठी, देशाच्या अनेक भागांत चांगले रस्ते पोचले पाहिजेत. आहेत ते उत्तम स्थितीत राखले गेले पाहिजेत. त्यामुळे वाहातूक तर जलद होईलच; पण दुर्मिळ डिझेल–पेट्रोल यांचाही खप कमी होईल, वाहातूक स्वस्त पडेल.

सरकारला रस्तेवाहातुकीच्या करामधून ८०० कोटी रुपये उत्पन्न मिळते; पण त्यातली फक्त ३८ टक्के रक्कमच रस्तेबांधणी आणि राखणी यावर खर्च होते. रस्ते सुधारा अगर नवे काढा म्हणण्यात सरकारवर निराळा बोजा पडत नाही. गाईचेच काढा आणि गाईलाच लावा एवढेच म्हणणे. या सूत्राचे साफल्य त्यातच आहे !

## २० : गगनाला भिडू पाहाणाऱ्या किमती रोखणे

वाढती महागाई ही मरीआई जनसामान्यांना वर्षानुवर्षे सळो की पळो करीत आहे. जीवनावश्यक वस्तूंचे भाव दिवसामासांनी सारखे वाढत आहेत. त्यामुळे वाढत्या किमती ही सरकारची नेहमीची डोकेदुखी होऊन बसली आहे. जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे उत्पादक आणि व्यापारी जसे या गोष्टीला कारणीभूत आहेत तसेच, देशातील चलनसंभार सतत वाढत आहे, काळा पैसा थैमान घालीत आहे, जनता सरकारशी हवे तसे सहकार्य करीत नाही, अधिकारी सरकारी आदेशांची योग्य अंमलबजावणी करीत नाहीत अशा अनेक गोष्टीही वाढत्या किमतींना साहाय्यभूत आहेत. पंतप्रधानांच्या वीस कलमी सूत्रात किमती रोखण्याच्या उपायांचा अंतर्भाव होणे त्यामुळे अटळ होते. त्यानुसार व्यापाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती व साठा जाहीर करणारे फलक लावण्याची सक्ती करण्यात आली. भारत संरक्षण कायद्याखाली एक आदेश काढून पॅकेज्ड वस्तूंच्या विक्रेत्यांवर, पुडक्यांवर वस्तूंचे वजन आणि किमती लिहिण्याची सक्ती झाली. दुकानदारांनी आणि कारखानदारांनी जाहिराती, करमणूक, हॉटेल, प्रवास यावरील अनावश्यक खर्च कमी करून उत्पादनखर्च आणि वस्तूंच्या किमती उतरवाव्यात असे आदेश त्यांना देण्यात आले.

चलनवाढ हे भावफुगवणीचे एक प्रमुख कारण असते. त्या दृष्टीने सरकारने चलनवाढ रोखणे, अनावश्यक सरकारी डामडौली खर्चांना फाटा देणे आवश्यक आहे; पण अनेकदा या गोष्टीचा उच्चार होऊनही हे घडत नाही. केंद्रसरकारचा खर्चही घटत नाही आणि राज्यसरकारेही या गोष्टीकडे गंभीरपणे लक्ष देत नाहीत. १९७४–७५ साली केंद्रीय अर्थसंकल्पात १२६ कोटी रुपयांची तूट दाखविली होती. प्रत्यक्षात ती ६९६ कोटी रु. झाली. ही गोष्ट गैर आहे. १९७५–७६ सालच्या अंदाजपत्रकात २५८ कोटी रु. एवढी तूट दाखवली आहे. सरकारने निदान ती वाढणार नाही एवढी तरी काळजी घ्यायला हवी. राज्यसरकारांनाही तशी स्पष्ट कल्पना द्यायला हवी.

किमती उतरविणे अगर स्थिरावणे या दृष्टीने अन्नधान्य-संपादनाला वेगळे महत्त्व आहे. जनतेला सरकारने रास्त भावाने धान्य उपलब्ध करावे असे वाटते; पण ती सरकारच्या अन्नधान्य-संपादनाला सहकार्य द्यायला मात्र तयार नाही. याला कारणे अनेक. बाजारभावापेक्षा सरकारचे धान्य-संपादनमूल्य कमी असते. संपादित मालाचा काळाबाजार होतो. अशा अनेक तक्रारी जनतेत ऐकू येतात. संपादनकार्य चोख झाले तर त्या राहू नयेत. शेतकऱ्यांना लागणाऱ्या इतर वस्तूंचे भाव भडकत असता शेतकऱ्यांवर मात्र बाजारभावापेक्षा कमी दराने लेव्ही घालण्याची सक्ती करण्यात अन्याय होतो यात शंका नाही. त्यामुळे गतवर्षीचे ५ दशलक्ष टन गहू-संपादनाचे लक्ष्य सरकार गाठू शकले नाही. ३·९ दशलक्ष टनांवरच त्याला समाधान मानावे लागले. यंदा पाऊस चांगला झाला. खरीप पिके चांगली आली आहेत. अन्नधान्यनिर्मितीचा आजवरचा उच्चांकही यंदा मोडेल असे वाटते. धान्यसंपादनाबाबत व किमतीबाबत सरकारने व्यवहारी धोरण स्वीकारले तर संपादनइष्टांक हस्तगत करणे सरकारला कठीण जाऊ नये. तरीही लेव्हीपद्धतीपेक्षा, १९५९ साली अशोक मेहता-समितीने सुचविलेली, सरकारने खुल्या बाजारात अन्नधान्य खरेदी करून किमती रोखण्यासाठी ' बफर स्टॉक ' निर्माण करण्याची पद्धती अधिक उपयोगी पडेलसे वाटते. मंदीत खरेदी करून, तेजी झाली, किमती वाढू लागल्या की माल बाजारात टाकण्याच्या धोरणाने किमतीही रोखता येतील आणि नियंत्रणाचा घोळही नाहीसा होईल. सरकारने योजलेल्या उपायांना घाऊक किमतींनी थोडी साथ दिली आहे व त्या ८ टक्क्यांनी उतरल्या आहेत; पण किरकोळ किमती कमी व्हायचा रंग दिसत नाही !

## काही शंका

पंतप्रधानांचा हा वीस सूत्री कार्यक्रम केंद्र आणि राज्यशासनांना व विशेषतः सरकारी अंमलबजावणीयंत्रणेला एक मोठे आव्हानच आहे. या कार्यक्रमात अंतर्भूत असलेल्या अनेक गोष्टी अनेकदा या नाही त्या प्रकारे अंमलात आणण्याचे प्रयत्न झाले; पण त्याच त्या महसुली व्यवस्थेवर ते लादले गेल्याने अपयशी ठरले. वीस कलमी योजनेत, तिच्या अंमलबजावणीसाठी निराळी यंत्रणा उभारण्याचा विचार व्यक्त झालेला नाही.

पुष्कळशी सूत्रे ग्रामीण गरिबांचा उद्धार व्हावा हा हेतू समोर ठेवणारी कल्याणकारी सूत्रे आहेत. त्यात ' शहरी गरिबां 'चा विचार दिसत नाही.

जलसिंचनक्षेत्र ५० लक्ष हेक्टर्सनी वाढविणे, नवी औष्णिक वीज-केंद्रे उभारणे, हातमागधंद्याचा विकास करणे या गोष्टी कोटचवधी रुपये मागणाऱ्या, वेळ खाणाऱ्या, शिवाय त्या पंचवार्षिक नियोजनात अंतर्भूत होणाऱ्या. शंका अशी की, वीस कलमी कार्यक्रमात त्यांचा अंतर्भाव पंचवार्षिक योजनांतर्गत मानायचा की योजनाबाह्य ? शिवाय २० कलमी कार्यक्रमावर वेळेचे बंधन कुठे दिसत नाही. विशिष्ट कालावधीत ही सूत्रे प्रत्यक्षात उतरविली जातील असे बंधन सरकारने स्वतःवर घालून घेतले पाहिजे. दीर्घकाळ प्रत्यक्षात न उतरणाऱ्या घोषणांचे स्वरूप या वीस कलमांना नाही म्हणून ही सूचना ! □ □

क्रीडांगण

# श्री. विनू मकंड यांस–

श्री. विनू मंकड ऊर्फ
अशोक मंकडचे पपा यांस,
सप्रेम नमस्कार.

पत्र लिहिण्यास कारण की...पण कारण सांगण्याऐवजी आधी एक प्रश्नच विचारतो. 'काहो परवा भारतीय क्रिकेटसंघाने न्यूझिलंडवर जो विजय मिळविला त्याबद्दल तुम्हाला एक्झॅक्टली काय वाटतं? मला कल्पना आहे की या प्रश्नाचं उत्तर द्यायला आपल्याला जड जाणार आहे.

कारण या विजयाकडे आपण दुहेरी दृष्टिकोणातून बघितलं असणार. एक निखळ क्रिकेटपटू या नात्याने, तर दुसरं अशोक मंकडचे वडील या नात्याने! विजयामुळे झालेल्या आनंदाचं चांदणं आपल्या एका डोळ्यात अवतरलं असेल तर दुसऱ्या डोळ्यात हा विजय सुनील गावसकरच्या नेतृत्वाखाली मिळविला म्हणून विषण्णताही साकारली असेल. क्रिकेटवर आपलं मनापासून प्रेम, त्यामुळे भारतातील सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज म्हणून आपल्या नावे असलेला विक्रम प्रसन्नाने मोडल्याचे ऐकल्यावर आपले कान धन्य झाले असतीलही; पण त्याच वेळी सुनील गावसकरने नेतृत्वाची जबाबदारी उत्कृष्टपणे पेलली हे ऐकताना आपल्या कानांना मुंग्या आल्या असतील! गावसकरवर आपला एवढा राग आहे का?—असावा. निदान 'फ्री प्रेस जर्नल' मध्ये आलेल्या आपल्या मुलाखतीमध्ये तरी तो दिसला आणि म्हणूनच आपल्याला पत्र लिहायला घेतले.

त्या मुलाखतीत प्रश्नकर्त्याने अशोक मंकडला भारतीय संघात निवडले नाही याबद्दल आपलं मत काय आहे असं विचारलं. तेव्हा हात जोडून आपण म्हणालात, 'बाबारे, कृपा करून मला याबाबतीत बोलायला लावू नकोस. ते बरंही दिसणार नाही!' अर्थात या एकाच वाक्यात आपली व्यथा समर्थपणे व्यक्त झाली आहे आणि ते साहजिकच आहे. आपले समकालीन लाला अमरनाथची दोन्ही पोरं संघात असताना आपला अशोक संघाबाहेर असावा याची खंत आपल्याला वाटली तर ते विशेष चूक नाही. आम्हाला मात्र अशोक मंकड या उत्कृष्ट फलंदाजाला निवडलं नाही म्हणून वाईट वाटलं. पार्थसारथी शर्माला संघात घेऊन अशोकला बाहेर बसविणे हा अन्यायाचा कळसच म्हणायचा! तर ते असो.

मुलाखतीत नंतर तुम्हाला बेदीच्या कप्तानपदाबद्दल तुमचं मत विचारलं. तेव्हा तुम्ही झटकन बेदीची निवड अतिशय योग्य असल्याचे, बेदीत गट्स वगैरे भरपूर असल्याचे सांगितलेत. इथपर्यंतही ठीक; पण पुढे आपण अकारण एक मत व्यक्त केलेत. आपण म्हणालात, '......कप्तानाची निवड योग्यच आहे पण उपकप्तान जो निवडलाय् (म्हणजे सुनील गावसकर) ते मात्र मुळीच पटत नाही मला' आणि आपल्या या मताला पुष्टी देण्यासाठी आपण एक फालतू विधान केलेत. आपण म्हणालात, '...वेंकटराघवनला विश्वचषकस्पर्धेत भारताचा कप्तान केले होते आणि त्याला आता उपकप्तानपदसुद्धा न देणे हा त्याच्यावर अन्याय होतोय्.' मंकडसाहेब, खरं तर वेंकटला कप्तान केले तेव्हाच आपण त्याच्याविरुद्ध बोंब मारायला पाहिजे होती. कारण वेंकटची जागा संघात नक्की नाही. चारही फिरकी गोलंदाज खेळवायचे असं ठरवलं तरच त्याची निवड होऊ शकते. (आता पुढच्या सामन्यातच बघा ना, बेदी परत संघात येणार तेव्हा वेंकटलाच बाहेर बसावे लागणार आणि बेदीची निवड नक्कीच आहे. कारण तो कप्तान आहे ना! आठवतं तुम्हाला, विश्वचषकस्पर्धेच्या वेळी इंग्लंडविरुद्ध आपला पहिला सामना झाला त्या वेळी वेंकट कप्तान असल्यामुळे तो खेळला आणि (त्यामुळे) बेदीला संघाबाहेर बसावे लागले!) तेव्हा अशा रीतीने संघात ज्याची निवड वादातीतपणे होऊ शकत नाही अशा वेंकटला उपकप्तान केले नाही म्हणून आपण अश्रू ढाळत आहात. त्याच्यावर अन्याय झालाय असं म्हणताहात. विश्वचषकस्पर्धेआधी आपल्याकडे विंडीजविरुद्धची मालिका खेळली गेली. शेवटच्या सामन्यात वेंकटराघवन् बारावा खेळाडू होता. म्हणजे संघाबाहेर काढलेल्या वेंकटला लगेच विश्वचषकस्पर्धेत भारताचे कप्तानपद मिळणे हा त्याला दिला गेलेला अवास्तव मान होता असं म्हटलं तर चालेल का? आपण त्याच्यावर अन्याय झालाय् असं म्हणताहात म्हणून म्हटलं.

आणि खरं म्हणाल ना मंकडसाहेब, तर आपल्याला वेंकटचा पुळका वगैरे मनापासून नाहीच आहे. आपली खरी पोटदुखी आहे ती सुनील गावसकरला उपकप्तान केलंय ही! आणि सुनीलवर आपला राग का? कारण उघड आहे. मागील वर्षी वाडेकरनंतर मुंबई संघाचे नेतृत्व अशोकला मिळाले; (आणि हातातून एकदा निसटलेला रणजीकरंडक त्याच्या नेतृत्वाखाली मुंबईने पुन्हा हस्तगतही केला होता.) पण यंदा अशोकला नेतृत्वपदावरून काढले आणि त्याच्या जागी सुनील गावसकरची मुंबईचा कर्णधार म्हणून नेमणूक झाली.

मागील वर्षी अशोकची कर्णधार म्हणून नेमणूक झाली ती कशी झाली हे आपल्याला माहिती आहेच. अगदी अचानकपणे त्याची निवड झाली. वाडेकरने निवृत्ती जाहीर केली तेव्हा दुलीपस्पर्धेत पश्चिम विभागाचा एक सामना होता. त्यात गावसकर काही कारणाने खेळू शकणार नव्हता, तेव्हा मग अशोकची पश्चिम विभागाचा कर्णधार म्हणून नेमणूक झाली आणि पश्चिम विभागाचा कर्णधार झाल्यामुळे साहजिकच मुंबईच्या कर्णधारपदीही त्यालाच निवडले गेले. दरम्यान विंडीजविरुद्ध चालू असलेल्या सामन्यात पतौडी दुखापतीमुळे खेळणार नव्हता, म्हणून सुनील गावसकरवर भारताच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली; (अर्थात तोही ऐनवेळी जखमी झाल्यामुळे खेळला

नाही ही गोष्ट वेगळी) पण यामुळे मुंबईच्या निवडसमितीची मात्र पंचाईत झाली. मुंबईचा कर्णधार असलेल्या अशोक मंकडला भारतीय संघात स्थान मिळू शकत नाही आणि कर्णधार नसलेल्या सुनील गावसकरला मात्र भारताचे कप्तानपदही मिळू शकते ही विसंगती मुंबईच्या निवडसमितीला दूर करायलाच पाहिजे होती. तशी ती यंदा केली गेली आणि ते सुनीलच्या आणि पर्यायाने मुंबईच्याही हिताचे ठरले; पण नेमकी हीच गोष्ट सुनीलबद्दल आपल्या मनात सल निर्माण होण्यास पुरेशी ठरली.

खरं तर अशोक, राहुलवर आपण जेवढं प्रेम करता तेवढंच सुनीलवरही केलं पाहिजे. ते सोडून त्याला उपकप्तानपद मिळाले म्हणून आपण बोटे मोडता याला काय म्हणायचे ? एका महाराष्ट्रियनाने दुसऱ्या महाराष्ट्रियनाचे पाय नेहमीच ओढले पाहिजेत का ? तुमच्या दर्जाचे इतर खेळाडू बघा. प्रत्येकजण आपापल्या प्रांतातल्या खेळाडूला पुश् करण्याचा प्रयत्न करत असतो. एका श्रेष्ठ माजी खेळाडूने तर विश्वनाथला भारताचं कप्तानपद मिळावं अशी इच्छा व्यक्त केली होती. अर्थात् प्रादेशिकता विचारात घेऊन सुनीलची आपण तरफदारी करावी असं कुणीच म्हणणार नाही. त्याचं कर्तृत्वच पुरेसं बोलकं आहे !

म्हणून म्हणतो मंकडसाहेब, परवाच्या सामन्यात सुनील गावसकरच्या नेतृत्वाबद्दल आपल्याला काय म्हणावयाचे आहे ? त्याने ते चांगले केले वगैरे आपण एक वेळ म्हणणार नाही; पण त्याने ते वाईट केले, कप्तान व्हायची त्याची लायकीच नाही असं तरी म्हणणार नाही ना ? असो.

आता शेवटी एकच. मागील वर्षी दैवयोगाने अशोकला मुंबईचे नेतृत्व मिळाले. यंदाही दैवयोगाने...किंवा दुर्दैवयोगाने म्हणा हवं तर, अशोकच मुंबईचा कर्णधार म्हणून रणजी सामने खेळत आहे. तेव्हा यंदाही लागोपाठ दुसऱ्यांदा कर्णधार या नात्याने मुंबईला रणजीकरंडक मिळवून देण्याचा मान त्याला मिळो ही शुभेच्छा व्यक्त करून पत्र संपवितो.

कळावे, (सुनील गावसकरवरही) लोभ असावा ही विनंती.

आपला

मुकुंद मणूरकर

☐

स्टुडिओ चक्कर । रविकिरण साने

# झुंज

**बटबटीत, प्रचारी चित्र**

शांतारामबापूंच्या चित्राकडे प्रेक्षक आणि समीक्षक नेहमीच डोळे लावून बसलेले असतात. काही तरी नवे पाहायला मिळणार, मानवी स्वभावाचा एखादा खास पैलू नाटचमयरीतीने आपल्यापुढे येणार अशी एक अटकळ सर्वांनीच बांधलेली असते. झुंजची जाहिरातबाजी चालू होती तीही याच दृष्टिकोनातून. नव्याजुन्याची झुंज, नवे कलाकार, नवे गायक असे सर्व चित्र मोठे आशादायकपणे उभे केले जात होते; पण प्रत्यक्ष चित्राने मात्र निराशा केली. एखादा सुंदर विषय प्रचारी थाटात पुढे आला म्हणजे त्या चित्राचा सारा आत्माच नाहीसा होतो. झुंजचे असेच काही तरी झाले आहे.

झुंजची पार्श्वभूमी आहे दलितांवर होणाऱ्या अन्यायाची, अत्याचाराची. गेली अनेक वर्षं हा प्रश्न महाराष्ट्रात विशेष गाजतो आहे. दलितांवरील अतिरेकी अत्याचार आणि त्याची प्रतिक्रिया यामुळे एका ज्वलंत समस्येचे भीषण स्वरूप त्याने निर्माण केले आहे. त्यामुळेच हा प्रश्न म्हणजे एक विलक्षण आव्हान होते. दलितांच्या या प्रश्नाला अनेक सूक्ष्म पदर आहेत. ते उलगडत जाणे म्हणजे चित्राची हाताळणी हळुवार असायला हवी. आधीच भडकपणे वृत्तपत्रांनी चित्रित केलेला हा प्रश्न मानवी स्वभावाच्या पातळीवरही हाताळला जायला हवा. खरं तर शांतारामबापूच हे करू शकले असते; पण त्यांनी निवडला तो त्याचा भडक रंग, कृत्रिम नाटच. त्यामुळे ही कथा खरी दलित–अन्यायाची कथा राहात नाही. ती हिंदी स्टाइल फिल्मी कथा बनून जाते. आपला आत्मा हरवून बसते.

ही कथा घडते ती कोल्हापूरनजीक काटेगाव नावाच्या छोटयाशा खेडयात. येथले इनामदार भाऊसाहेब नांगरे ( अरविंद देशपांडे ) हे गावचे सत्ताधीश. राजकीय सत्ता, गावचे म्होरकेपण त्यांचे हाती असल्याने गावातले सर्व स्वार्थी संधिसाधू त्यांचे भवतीभोवती. जुन्या विचारांचा, धार्मिक रूढींचा त्यांचेवर जबरदस्त पगडा आहे. हरिजनांबद्दल विलक्षण अढी त्यांचे मनात आहे. 'म्हारडयांची जागा गावाच्या बाहेर हाय' असे त्याचे प्रामाणिक मत आहे आणि या मताला अनुसरून तो गावात दलितांवर अत्याचार घडवतो. विहिरीवर पाणी भरायला बंदी करतो. स्त्रियांची अब्रू लुटवतो. असा हा इनामदार सर्वार्थाने गावाचा पुढारी आहे. तमाम मराठी चित्रपटात दाखवला जाणारा पाटील आणि हा इनामदार एकच. जितका रगेल तितकाच रंगेल. धूर्त, राजकारणी अशी खलपुरुषाची सर्व लक्षणे त्याचे ठायी ठासून भरलेली आहेत. आपल्या रंगेल इष्कबाजीला नवा मार्ग मिळावा म्हणून एका तरुण मास्तरणीला हा गावातल्या शाळेत बोलावतो. तिला जागा मिळावी म्हणून सर्वांचा आवडता पण हरिजनमास्तर कांबळेला पोरांदेखत मारहाण करून राजीनामा द्यायला लावतो. अशा कुटिल इनामदाराला एकुलता एक तरुण मुलगा आहे. अर्जुन (रवींद्र महाजनी) हा अर्थातच नव्या पिढीचा प्रतिनिधी. एकदम फिल्मी हिरोला साजेसा. कोल्हापूरच्या कॉलेजात शिकलेला. तरीही कुस्तीगीर. ऑलिंपिकमध्ये पहिले बक्षीस मिळवून आलेला; पण तरीही गर्व वगैरे नसलेला. शिवाय कांबळेमास्तरांचा आवडता शिष्य. त्यांना विलक्षण मानणारा. पर्यायाने त्यांच्या जातीविषयी आस्था, प्रेम बाळगणारा.

झुंज सुरू होते ती या दोघा बापलेकांमध्ये. कांबळेमास्तरांचे उच्चाटन ही पहिली ठिणगी पडते. नवी तरुण शिक्षिका कमल (रंजना) हिचा तडफदारपणा, सौंदर्य यावर भाळून अर्जुन चक्क तिच्या प्रेमात पडतो. यांच्या प्रेमप्रकरणाने संघर्ष प्रखर होतो. बाप

अर्जुनाला निर्वाणीचा इशारा देतो; पण त्याला न जुमानता अर्जुन घर सोडून जातो आणि आसरा घेतो तो कांबळेमास्तरांकडे महारवाड्यात. हे कळताच सूड उफाळतो आणि अख्खा महारवाडा आगीच्या भक्ष्यस्थानी पडतो. चिडलेला अर्जुन पेटत्या मशाली घेऊनच घरी येतो आणि स्वतःची तिजोरी रिकामी करून सारी संपत्ती हरिजनांच्या पुनर्वसनासाठी त्यांच्या हवाली करतो. या सर्व प्रकाराला ही नवी मास्तरीण कारणीभूत आहे असे समजून इनामदार तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो; पण तिची खरी आई तिला सोडवते. अर्जुन तिच्याशी नव्या महारवाड्यात–फुलेवाडीत–लग्न लावू लागतो तोच गावात महापूर येतो. त्यात ही मास्तरीणच त्या इनामदाराला वाचवते.'

तर अशी ही एकदम हिंदी स्टाइल फिल्मी कथा. शांतारामबापूंचे वास्तवाचे भानच या कथेत सुटल्यासारखे वाटते. या संघर्षाला बापलेकांतील झगड्यामधून ते न्याय–अन्यायाच्या, माणुसकी व राक्षसीपणा अशा परंपरागत संघर्षाच्या अतिविस्तृत भडक पातळीवर आणून ठेवतात; पण मुळातच हा संघर्ष वैयक्तिक पातळीवरचा संकुचित संघर्ष नव्हे. तो जसा नवे विचार आणि जुन्या रूढी यांचा संघर्ष आहे तसाच तो दोन समाजांमधला परंपरागत संघर्षाचा भाग आहे; पण या चित्रात या दोन समाजांचे दर्शन कोठेच होत नाही. अंकुरसारख्या चित्रात कथा तशी केवळ वैयक्तिक पातळीवरची असूनही त्या संघर्षाला असणारा सामाजिक संदर्भ कायम जाणवत राहतो. प्रत्येक घटनेमागे त्याची एक अदृश्य छाया वावरताना आढळते; पण झुंजमध्ये हे घडत नाही. दलितांवरील अन्याय हा कथेचा गाभाविषय असताना तो येतो तोही वैयक्तिक संदर्भातच. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची सुप्त चीड किंवा त्याविरुद्ध झुंज घेण्याची प्रवृत्ती यांचे दर्शन हरिजनसमाजाच्या चित्रणात कोठेच आढळत नाही. नव्या विचारांच्या बीजाचे अंकुर या समाजात उगवतच नाहीत. साऱ्या गावाचे शिक्षण करणारा कांबळेमास्तर आपल्या हरिजनवाड्यावर मात्र काही संस्कार घडवताना आढळत नाही. कांबळेमास्तरांच्या राजिनाम्याची प्रतिक्रिया हरिजनवस्तीत उमटत नाही. उलट झोपड्या जाळल्या जाताच संतापाने पहिला दगड उठतो तो इनामदाराच्या घराच्या दिशेने, नव्हे तर नव्या विचारांच्या अर्जुनाच्या दिशेने त्याला पाठिंबा देणाऱ्या कांबळेमास्तरांच्या दिशेने. मुळातच हा शोषित समाज असा मेलेला मुर्दाड चित्रित केल्यामुळे त्याचा सामाजिक आशय नाहीसा होतो. हरिजनवस्तीची ही कथा तर सवर्णांचे चित्रणच फारसे घडवत नाही. इनामदारांचे घर, दिवाणजींचे घर व शाळा ही प्रमुख घटनास्थळे. या दोन-तीन ठिकाणी घोटाळणारा कॅमेरा सवर्ण-समाजाच्या वृत्ती–प्रवृत्तींचे समर्थ चित्रण करायला अपुरा पडतो. दलितांवरील अत्याचारांच्या संदर्भात दर्शन घडते ते भाऊसाहेबांच्या सूडाचे, सवर्णांच्या हरिजनांवरील अत्याचारांचे नव्हे. त्यामुळे या संघर्षाला स्वरूप राहते ते केवळ बापलेकांच्या झगड्याचे. हिंदी चित्रातल्या नायकाचा गरिबीविषयीचा कळवळा जितका खोटा असतो तितकाच या अर्जुनाचा दलितांविषयीचा कळवळा खोटा वाटतो. जमीनदारीचा प्रश्न हिंदी चित्रात गेली पंचवीस वर्षे सातत्याने येतो आहे; पण त्याचे प्रखर वास्तवाशी कोठेच नाते नसल्याने तो एक थट्टेचा विषय होतो. तसेच काहीसे दलित प्रश्नाचे झुंजमध्ये होते. वैयक्तिक संघर्षाच्या नादात सामाजिक परंपरागत संघर्षाचे प्रखर वास्तव चक्क बाजूला पडते आणि नायकनायिकेच्या कथेत हे चित्र जाऊन बसते.

या चित्राचे निमित्ताने शांतारामबापूंनी काही नवे कलाकार पडद्यावर आणले आहेत. रवींद्र महाजनीसारखा तगडा जवान ही एक नवी आशा आहे. त्याने अर्जुनाचे काम सफाईने केले आहे. त्याची भरदार शरीरयष्टी आणि बोलका चेहरा संपूर्ण चित्रावर आपला प्रभाव पाडून जातो. रंजना देशमुख ही नायिकेच्या भूमिकेत चमकणारी आणखी एक नवी कलाकार. मास्तरणीचे काम ती चांगले करते पण तिचे फॅशनेबल कपडे मात्र खटकत राहतात. ही बाई आत्ताच इतकी जाड दिसते की एक चांगली नायिका चार-दोन चित्रांनंतर आईच्या भूमिकेत तर दिसणार नाही ना ? अशी भीती वाटते. गौरी कामत ही नवी कलाकार; पण तिचा उपयोग मॉडेल गर्ले-सारखाच केलेला आहे. ती जीनत अमानसारखी दिसते म्हणून तिचे त्या अँगलमधून घेतलेले शॉटस् आणि तिला स्वीमिंगसूट वगैरे घालून द्यायला लावलेले थोडे उत्तानदर्शक शॉटस् असाच तिच्या भूमिकेचा थोडक्यात प्रकार. या चित्राचे दिग्दर्शन केले आहे किरण शांताराम यांनी; पण किरण यांचे दिग्दर्शन खास कोठे दाद मागत नाही. उलट अनेक प्रसंगांत ते थिटे पडल्याचे जाणवते.

झुंजची चित्रकथा तयार केली आहे राजकमलच्या कथाविभागाने. म्हणजे पर्यायाने शांतारामबापूंवरच त्याची संपूर्ण जबाबदारी येते. चित्रातला शेवटचा प्रसंग तर इतका कृत्रिम आहे की तो शांतारामबापूंच्या चित्रातला वाटूच नये. मुळातच महापूर येऊन जुने काटेगाव वाहून जाणे हे मेलोड्रॅमॅटिक वाटतेच; पण त्यातही राजकमलच्या सेटवर केलेले त्याचे चित्रण अगदीच खेळण्यातले वाटते.

टायटल्स आणि टायटलसाँग या दोन जमेच्या बाजू. निसर्गात हरघडी एकमेकांविरुद्ध जन्मजात शत्रू म्हणून उभे राहणाऱ्या प्राण्यांच्या प्रत्ययकारी संघर्षाचा उपयोग टायटल्ससाठी केला गेला आहे. त्यामुळे चित्र सुरुवातीलाच एकदम पकड घेते; पण ही पकड प्रत्यक्ष चित्रपटात मात्र सतत सुटत जाते. झुंजार माणसा झुंज रे या टायटलसाँगचा उपयोग चित्रपटभर सुंदर रीतीने केला आहे. बाकी काय ध्वनिसंकलन, चित्रसंकलन, रंगसंगती, कॅमेरावर्क याबद्दल खास सांगितलेच पाहिजे असे काही नाही. □

# छोटीसी बात

## बात छोटीशीच पण दिल बहलानेवाली !

तसं आपण ' रजनीगंधा ' पाहिल्यावरच बासू चटर्जींना मानलं होतं आणि म्हणूनच ' छोटीसी बातची ' वाट पहात होतो. त्यातून बी. आर. चोप्रांसारखा भावनाप्रधान ( emotional ) वगैरे पिक्चर्स काढणारा कसलेला निर्माता ' न्यू वेव्ह लेंग्थ ' पकडतोय. अर्थातच ' छोटीशी बात ' नं मनात चांगल्याच अपेक्षा निर्माण केल्या होत्या आणि बऱ्याच दिवसांनी अपेक्षा पुऱ्या करणारा

चित्रपट पहायला मिळाला. ‘ छोटीसी बात ’ ही एक हलकीफुलकी कॉमेडी आहे. कथाविषय एकदम फ्रेश आणि बासूदांनी आपल्या खुसखुशीत दिग्दर्शकाने तो मस्त फुलवलाय.

तर ही कथा घडते मुंबईत. कथेचा नायक अरुण ( अमोल पालेकर ) हा जॅक्सन तोलाराम कंपनीत सुपरवायझरपदी नोकरीला तर नायिका प्रभा ( विद्या सिन्हा ) ही एक्सप्रेस टॉवरमधल्या बँक ऑफ लॉइडमध्ये. अरुण प्रभाला प्रथम बसस्टॉपवरं पहातो. प्रभा त्याला आवडते; पण प्रभाजवळ आपलं प्रेम व्यक्त करण्याचं धैर्य त्याच्याजवळ नसतं, पण तरीही रोज प्रभा ज्या बसने जाते त्याच बसने अरुण तिच्या पाठोपाठ जातो. अर्थात त्याला स्वतःला ऑफिसला उशीर होतच असतो. त्याबद्दल बॉसकडून ‘ फायरिंग ’ वगैरे आलंच. ( इथं एक गोष्ट मात्र मजेशीर आहे की त्या ऑफिसमधे शिपायापासून ते मॅनेजरपर्यंत सगळ्यांनाच ‘ प्रेमरोगा ’ ने पछाडलेलं असतं ) परत ऑफिस सुटल्यावर अरुण प्रभाच्या पाठोपाठ तिच्या घरापर्यंत जातो; पण इतकं असूनही प्रभाशी बोलण्याचा धीरही त्याला होत नसतो आणि प्रभातिला हे सगळं कळत असतं आणि ती अरुणच्या भित्र्या स्वभावाला हसून करमणूक करून घेत असते; पण इतक्यात मधेच नागेश ( असरानी ) उपटतो. हा ‘ स्ट्रेट फॉरवर्ड ’ टाइपचा तरुण, नोकरीला प्रभाच्याच ऑफिसमध्ये असतो. इकडे अरुण रहातो बाजूला आणि नागेश रोज त्याच्या डोळ्यांदेखत प्रभाला स्कूटरवरून ‘ लिफ्ट ’ देऊ लागतो. नागेश प्रभाच्या ऑफिसमधील ‘ चेस व टेबल टेनिस ’ चॅम्पियन असतो. इकडे अरुण प्रभावर इम्प्रेशन मारण्यासाठी ‘ टेबल-टेनिस ’ खेळायला शिकू लागतो. ती गंमत मात्र पहाण्यासारखीच आहे. एवढेच नव्हे तर एक सेकंडहॅंड मोटारसायकलही विकत घेतो पण त्या सौद्यातही तो फसतो आणि प्रभा हातची जाण्याची लक्षणे दिसू लागतात. शेवटी निराश झालेला हा प्रेमवीर रस्त्यावरचे ज्योतिषी, साधू, गंडेवाले, ताईतवाले इ. च्या नादी लागून प्रभाचे प्रेम वश करू पहातो. हा चित्रपटाचा पूर्वार्ध. हा भाग उत्तरार्धापेक्षा अधिक मजेशीर व रंगतदार झाला आहे.

सर्व प्रयत्न फसल्यावर शेवटी अरुण खंडाळ्याच्या कर्नल सिंग (अशोककुमार) ह्या अजब व्यक्तीकडे प्रेमशास्त्राचे पाठ घ्यावयास जातो. कर्नलसाहेब अरुणला पोरगी पटविण्याचे पद्धतशीर शास्त्रीय ट्रेनिंग देतात. नंतर मुंबईला येऊन अरुण कर्नल सिंगच्या मदतीने आपल्या प्रेमाच्या मार्गातील नागेशचा काटा काढून टाकतो आणि प्रभाचे प्रेम मिळविण्यात यशस्वी होतो.

तर ही कथा एका मध्यमवर्गीय कारकुनाची. अगदी आपलीच वाटावी अशी. पटकथा व संवादलेखन बासूदांचेच आहे. कथा मध्यंतरापर्यंत तुफान मनोरंजन करते; पण उत्तरार्धात मात्र रेंगाळल्यासारखी वाटते; पण बासूदांना मानलं ते दिग्दर्शनाबद्दल. ‘ रजनीगंधा ’नंतर एकदम भिन्न प्रकृतीचा हा कथाविषय त्यांनी कुशलतेने हाताळला आहे. किंबहुना त्यांच्या खुसखुशीत दिग्दर्शनामुळेच चित्रपट लज्जतदार झाला आहे. चित्रपटात जरूरीपुरतं नाट्य असलं तरी तो जास्तीत जास्त वास्तवतापूर्ण होईल इकडं त्यांनी लक्ष पुरवलेलं जाणवतं. उदा. बसस्टॉपवरील तसेच बसमधील प्रसंग व ऑफिसमधील वातावरण ह्यामध्ये कृत्रिमतेचा लवलेशही जाणवत नाही. उलट ह्यातील पात्रांचा व आपला परिचय आहे असंच जाणवत राहतं.

बुळबुळीत अरुणची भूमिका वठविताना अमोल पालेकर यांनी तो मध्यमवर्गीय तरुण वाटेल याची दक्षता घेतली आहे. त्यासाठी त्यांनी काही सवयी ह्या पात्राला चिकटविल्या आहेत. उदा. नाकावरून हात फिरवणे, साहेबांशी बोलताना एक हात शर्टाच्या बटनाशी व दुसरा हात शर्टाच्या टोकाशी धरणे इ. अरुण हा एक स्वप्नील तरुण आहे. जे प्रभाशी तो प्रत्यक्षात बोलू शकत नाही ते तो मनात ठरवतो. त्यावरच खूष होतो; पण प्रत्यक्षात मात्र प्रभा समोर आल्यावर तिनं ‘ किती वाजले ’ असा प्रश्न केला तर काही तरी अकल्पित घडल्यासारखा भांबावून जातो आणि ह्या सगळ्यासाठी पालेकरांनी आपल्या कोवळ्या फ्रेश चेहऱ्याचा चांगलाच उपयोग करून घेतलाय.

विद्या सिन्हाची प्रभा अगदी वास्तव वाटते. नोकरी करणाऱ्या मुलींचा वेडसरपणा व हलका-फुलका स्वभाव ही वैशिष्टये त्यांनी व्यवस्थित उभी केली आहेत. असरांणी हा कॉमेडियन दिवसेंदिवस वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका स्वीकारून त्या यशस्वी करून आपलं वर्चस्व निर्माण करीत आहे. त्याचा थोडासा आगाऊ नागेश रसिकांची प्रशंसा मिळवून जातो; पण अशोककुमारचा कर्नल सिंग मात्र बोअर करतो. अर्थात त्याचा दोष बासूदांकडेच जास्त जातो. कारण ते कॅरॅक्टर फुलविण्यात बासूदा अयशस्वी ठरलेत. मध्यंतरापर्यंत धमाल वेगाने कोसळणाऱ्या कॉमेडीच्या धबधब्याचा वेग उत्तरार्धात कमी होतो तो त्यामुळेच. तरीसुद्धा दादामुनींनी मधेमधे आपली सदा जवान खेळकर ॲक्टिंग करून काही काही प्रसंग जिवंत केलेत. शिवाय ह्या चित्रात धर्मेंद्र, हेमामालिनी व अमिताभ ह्यांचे दर्शन आपल्याला ‘ सरप्राईझ ’ करील.

वरील सर्व प्रसंग कॅमेऱ्यात पकडताना के. के. महाजन ह्यांनी कॅमेरा ‘ स्टेडी ॲंगल ’ मध्ये ठेवलाय त्यामुळे सर्व प्रसंग आपल्यासमोरच घडत असल्यासारखे वाटतात. सलील चौधरींनी चित्रपटास साजेसं संगीत दिलंय; पण ‘ ना जाने क्यूं ’ (गायिका : लता) ह्या गाण्यातील ‘ रजनीगंधा ’ची छाप मात्र ते टाळू शकले नाहीत.

एकंदरीत काय तर हे चित्र देखनेसे ताल्लुक रखनेवालं आहे. बरेच दिवसात अशी मस्त कॉमेडी पाहावयास मिळाली नव्हती. त्यामुळे महमुदमियाँच्या रूटिन कॉमेडीला कंटाळलेल्या प्रेक्षकांना तर हे चित्र जास्तच ‘ रिफ्रेशिंग ’ वाटेल.

जाता जाता नेहमीचा शिरस्ता सोडून असलं नवं चित्र काढल्याबद्दल बी. आर. चोप्रांना धन्यवाद दिलेच पाहिजेत आणि त्याचबरोबर बासू चॅटर्जींनाही !

—शरद कामत



# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ७।२।७६ ते १३।२।७६

### राजकीय क्षेत्रात अनपेक्षित घटनांना वेग येईल

वीस कलमी कार्यक्रमाच्या त्वरित अंमलबजावणीसाठी कॉंग्रेससंघटना व मंत्रिमंडळ यात महत्त्वाचे बदल पंतप्रधानांना करावे लागतील असे गेल्याच आठवड्यात मी सूचित केले होते. त्याचे प्रत्यंतर बॅरिस्टर अब्दुल रहिमान अंतुले यांची अखिल भारतीय कॉंग्रेसच्या सरचिटणीसपदावरील नियुक्तीने आलेच आहे. त्यांची नेमणूक म्हणजे संघटनेला नवचैतन्य आणण्याचा प्रयत्नच आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात बदल करण्याचे सूतोवाच मुख्य मंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी केले आहे. त्या हालचालीला आता वेग येईल. मंत्रिमंडळात होणारा हा बदल कसा असू शकेल त्याची चाहूल या आठवड्यात लागण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र कॉंग्रेसमध्येही बदल होण्याची शक्यता असून हे दोन्ही बदल राजकीय क्षेत्रात अनपेक्षित व धक्कादायक ठरावेत अशी चिन्हे दिसू लागतील. मध्यवर्ती सरकार नोकरलोकांना काही तरी 'गोड' देईल असे वाटते.

**मेष : नव्या क्षेत्राचा शोध**

रवि एवढा फायद्याचा आहे की या आठवड्यात तुम्ही जे मनात ठरवाल त्याला उत्तम प्रतिसाद मिळणार आहे. प्रामुख्याने उद्योगधंद्यात लक्ष घाला. चालू उद्योगाच्या जोडीला एखादा नवा उद्योग सुरू करायचा असेल तर त्याला कोणतीच अडचण राहाणार नाही. खूप दिवस रेंगाळत असलेला जमिनीचा प्रश्न सुटेल. वाद असेल तर त्यात तडजोड निघेल. मन उत्साही राहील. हे करू की ते करू असे उत्साहाचे वारे संचरेल. नोकरीत महत्त्वाच्या वाटाघाटी करा. वरिष्ठांबरोबर बोलणी करायला अनुकूलता आहे. पैशाची काळजी आता दूर होईल. लॉटरीचे देखील जमून जाईल. महिलांना अनपेक्षित आनंद मिळेल. घरातील वातावरण आनंदाचे राहील. अडचणी नाहीत. विद्यार्थ्यांना पैशाची मदत मिळेल.

**वृषभ : मार्ग सापडेल**

जे दुःख मुळातच नाही ते आहे असे धरून तुम्ही उगाचच शंकाखोर बनला आहात. त्यातून या आठवड्यात तुम्ही बाहेर पडू शकाल. आर्थिक अडचणींवर मात करण्याची एखादी नवी योजना दृष्टिपथात येईल. त्यासाठी राजकारणी अगर सत्तेवरील एखादी महत्त्वाची व्यक्ती उपकारक ठरेल. सोमवार ते गुरुवार या दिवसांची नोंद घ्या. नोकरीत उद्भवलेल्या कटकटी, आता इतिहासजमा होतील. मालक अगर वरिष्ठांबरोबर संयमाची भाषा ठेवून तुम्ही बोलणी करू शकता. शक्यतो भांडणापासून अलिप्त राहा. आजूबाजूस कोण काय बोलते यावर लक्ष ठेवा. तुमच्यापैकी ज्यांना परदेश-प्रवासाचा प्रयत्न करावयाचा असेल त्यांनी या वेळी तो अवश्य करावा. ज्या तरुण-तरुणींना अभिनयाची आवड असेल, गायनाची आवड असेल त्यांनी कलाक्षेत्रांत संपर्क साधावा. त्यांची इच्छा पुरी होईल. महिलांना नोकरीत असलेला त्रास कमी होईल. अपेक्षित बदली होईल. विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रांत अनुकूलता आहे.

**मिथुन : वनवास संपेल**

गेला महिनाभर तुम्हाला रवि-मंगळ यांसारखे ग्रह फार छळत आहेत; पण त्यांची कारकीर्द आता संपुष्टात येणार आहे. आठवा रवि जरी स्थावराला काहीसा मारक ठरला तरी नवमस्थानी येणारा रवि तुमचे सारे नुकसान भरून देईल. आजार, आर्थिक टंचाई, नोकरीतील त्रास, उद्योगातील अडचणी, वरिष्ठांची गैरमर्जी हे सारे आता बदलणार आहे. ज्यांनी तुम्हाला त्रास दिला त्यांना अपराधाची खंत वाटणार आहे. पैशाची परिस्थिती सुधारायला अजून तरी काही काळ वाट पहायला हवी; पण, गरजेपुरता पैसा मिळू शकेल. बेकारांची वणवण आता संपण्याची चिन्हे दिसू लागतील. उद्योग अगर नोकरी यापैकी काही तरी त्यांच्या पदरात पडेल. सोमवार, गुरुवार महत्त्वाच्या घटना घडतील. महिलांची तब्येत सुधारेल. मन उत्साही बनेल. पैशाची काळजी दूर होईल. विद्यार्थ्यांना सतावणाऱ्या अडचणी दूर होतील.

**कर्क : धाडस नको**

शनि-रवी या ग्रहांच्या षडाष्टकयोगात हा आठवडा येत आहे. शनी जरी तुम्हाला अनुकूल असला तरी रवी प्रतिकूल आहे. त्यामुळे कोणत्याच क्षेत्रात फार मोठे धाडस करून चालणार नाही. या आठवड्यात कर्जाची उलाढाल करणाऱ्यांनी फार काळजीपूर्वक व्यवहार करावेत. दलालीचे व्यवहार फायद्याचे ठरतील याची खात्री बाळगू नका. नोकरीधंद्याची परिस्थिती वाईट नसली तरी वरिष्ठांची केव्हा वक्रदृष्टी फिरेल याची खात्री बाळगू नका. नोकरीत, कामात दक्ष राहा. बदली-बढती वगैरे काही तूर्त तरी मागण्या करू नका. शारीरिक स्थिती निरु-




त्साहाची राहील. कोणत्याच कामात रस वाटणार नाही. उद्योगात अकस्मात अडचणी निर्माण होतील. रविवार ते बुधवार चांगल्या व्यक्तीची भेट होईल. मनाला दिलासा मिळेल. महिलांना नसते उद्योग अंगाशी येतील की काय असे वाटत राहील. विद्यार्थ्यांना अभ्यास चुकवण्याची बुद्धी होईल.

**सिंह** : अनिश्चितपणा येईल

राशिस्वामी सातवा होत आहे. हा रवी तुम्हाला प्रतिकूल नाही. तरी पण गृहसंसारात काही ना काही उणीव तो निर्माण करणार आहे. घरात मुलांना थोडाफार आजार, पत्नीला आजार असे काही तरी आणू शकेल; पण तेवढ्याने हा आठवडा काही वाईट नाही. नोकरीत बऱ्याच दिवसांचे तुमचे मनोरथ पुरे होतील. पगारवाढ व इतर मागण्या मान्य होतील. बदलीची शक्यता असली तरी ती तुमच्या समजुतीने होईल. पैशाच्या देण्याघेण्याचा करार, कर्ज असे व्यवहार पुढे ढकलावेत. प्रवासात त्रास होईल; परंतु ठरलेले काम मात्र पार पडेल. शनिवार व बुधवार उत्तम आहेत. महिलांना नोकरीत हवा असलेला बदल घडू शकेल. विद्यार्थ्यांना फॅशन्सचा मोह अनावर होईल.

**कन्या** : समाधान मिळेल

या आठवड्यापासून तुमच्या घरात प्रामुख्याने आरोग्य नांदणार आहे. गेले बरेच दिवस घरात आजार, अनारोग्य यांचे थैमान चालू होते त्यामुळे तुम्ही जिकिरीस आला होता. हा आठवडा थोडाफार प्रगतीचाच आहे. नोकरीत तुमचे पूर्ण समाधान झाले नाही तरी वरिष्ठांच्या मनात तुमच्याबद्दल सहानुभूती राहील. प्रमोशनचा विचार करण्याचे आश्वासन मिळेल. चालू उद्योगातील अडचणींवर मात करण्याचे सामर्थ्य प्राप्त होईल. आर्थिक अडचणी जरी सर्वच्या सर्व दूर झाल्या नाहीत तरी त्यात उतार सुरू होईल. चार पैसे गरजा भागवतील. प्रवासाचा बेत आखू नका. कारण तो पुरा होणे शक्य नाही. लेखनसाहित्याच्या क्षेत्रात थोडेफार कार्य करू शकाल. महिलांना नोकरी हवी असेल तर ती मिळू शकेल. बेकारांना काम मिळेल. विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा प्रभाव वाढेल.

**तूळ** : धांदल-गडबड

रवी पाचवा होत आहे ही एकच घटना खरे म्हणजे तुमच्याबाबतीत महत्त्वपूर्ण ठरावी. तुम्ही राजकारणात अनेक हेतू मनात बाळगून असाल. क्षणभर तुमच्या मनाविरुद्ध घडल्यासारखे वाटेल; पण शेवटी जी घटना घडेल ती तुमच्या हिताचीच आहे याची खात्री पटेल. मानाचा योग येणार आहे. आठवडा तसा धांदल व गडबडीने भरलेला आहे. मात्र कोठेही त्रास, माघार असे घडणार नाही. सार्वजनिक कार्यांत तुमचे महत्त्व वाढणार आहे. नोकरीधंद्याची परिस्थिती गडबड–गर्दीची; पण प्रगतीची राहील. जबाबदारीची कामे अंगावर पडतील; पण तुमच्या कार्यक्षमतेची कसोटी लागून वरिष्ठांच्या मनावर त्याचा अनुकूल परिणाम होईल. रविवार ते गुरुवार महत्त्वाच्या गाठीभेटी होतील. महिलांना नोकरीत एखादे महत्त्वाचे स्थान मिळेल. विद्यार्थ्यांचा उद्योगाकडे कल राहील.

**वृश्चिक** : अडचणी उद्भवतील

वृश्चिकराशीच्या व्यक्तींच्या भवितव्याची सारी सूत्रे गुरूच्या हाती आहेत म्हणून सारे काही ठीक आहे. आठवा मंगळ, बारावा राहू-हर्शल असे चमत्कारिक ग्रहमान सध्या तुमच्या वाटयाला आले आहे; पण गुरूने तुम्हाला नैतिक सामर्थ्य दिले असल्यामुळे तुम्ही अनेक प्रकारच्या अडचणींवर मात करू शकाल. प्रामुख्याने पैशाच्या देण्या-घेण्याचा प्रश्न बराच जिकिरीचा व डोकेदुखीचा होईल. अनेक लटपटी-खटपटी करून शेवटी काही तरी तुमच्या पदरात पडेल व तुमची अब्रू बचावेल. सहकाऱ्यांबरोबर भांडणाचे प्रसंग येतील. तुम्ही जर कर्ज काढले असेल तर त्याचे तगादे लागतील. घरात व स्थावरात कटकटी उद्भवतील; पण आठवड्याच्या शेवटी यातून तुम्ही एकदाचे बाहेर पडाल. नोकरीत तुम्हाला त्रास देण्याची वरिष्ठांना लहर येईल. उगाचच ते तोंडसुख घेतील. सोमवारी डोके शांत ठेवा. महिलांना अनाठायी खर्चापायी त्रासून जाण्याची पाळी येईल. विद्यार्थ्यांना पैसे मिळण्यास अडचणी.




**धनु : कर्तबगारी दिसेल**

राशिस्वामी गुरु असून सुखस्थानी आहे. तो तुम्हाला काही हवा तेवढा उत्तम नाही. काही ना काही त्रास डोक्याला देत आहे; पण रवि मात्र या आठवड्यात तुमच्या पाठीशी उभा राहील. तुमच्या सुप्त कर्तव्य-दृष्टीला नवे क्षेत्र उपलब्ध करून देईल. वरिष्ठांना अगर मालकांना तुमचे गुण पटतील व त्यांना पश्चात्ताप करावा लागेल. नोकरीत एरवी हा आठवडा प्रगतीचाच आहे. पगार-वाढ, प्रमोशन असे काही तरी मिळू शकेल. व्यापारी लोकांना मंदीचा तडाखा जाणवणार नाही. सोने, चांदी, तांबा, पितळेचा व्यापार जास्त नफ्याचा नसला तरी मागणी बरी असेल. बेकारांना आता वणवण करावी लागणार नाही. महिलांना नोकरी हवी असेल तर ती मिळू शकेल. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल.

**मकर : तडजोड करा**

गेले काही दिवस तुम्ही फार सामर्थ्याने झळकत होता. रवि तुमच्यावर खूष होता. आता तो तसा नाही. तो तुमचे काही प्रतिकूल असे करणार नसला तरी सार्वजनिक कार्य, राजकारण, धंदा, व्यवसाय, नोकरी या सर्वच बाबतीत तडजोडीचे धोरण ठेवावे लागेल. नोकरीत तुम्ही स्वतःला खूप मोठे समजत राहिलात तरी हाताखालच्या माणसाचे ऐकून घ्यावे लागेल. त्याच्या बुद्धीचाही उपयोग करून घ्यावा लागेल. स्वतंत्र उद्योगात नवे तंत्र अवलंबून कार्यक्षेत्र विस्तारण्यासाठी मदत मिळू शकेल. तांत्रिक व आर्थिक सहाय्य मिळेल. धान्य व स्टेशनरीचा व्यापार थोडा मंदीत येईल. खते व औषधे यांचे व्यापारी चार पैसे मिळवतील. आरोग्य सुधारेल. महिलांना हा आठवडा प्रगतीचा जाईल. कामात उत्साही वातावरण राहील. विद्यार्थ्यांना पैसा मिळेल.

**कुंभ : प्रगतीची चाहूल**

बाराव्या रवीचा तीव्र विरोध आता संपला असून त्याचे तेजस्वी कर्तृत्व आता तुमच्या पाठीशी खडे उभे आहे. आता तुमच्या महत्त्वाकांक्षेला पोषक असे वातावरण तुमच्या भोवती निर्माण होणार आहे. कर्तबगारीला नवे क्षेत्र लाभणार आहे. अनेक दिवस उराशी बाळगलेली स्वप्ने साकार होण्याची चिन्हे दिसू लागणार आहेत. नोकरीत असो की धंद्यात असो, राजकारणात असो की सामाजिक कार्यात असो तुमचा मान वाढणार आहे. अधिकाराची नवी शाल तुमच्या अंगावर पडणार आहे. नोकरीत प्रमोशनवर बदली होईल. नवी महत्त्वाकांक्षी योजना तुमच्याकडे सोपवली जाईल. महिलांना या वेळी स्वतंत्र उद्योगासाठी बरीच अनुकूलता आहे. पैसा मिळू शकेल. नोकरीत देखील समाधान मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात मोठे क्रेडिट मिळेल.

**मीन : संयमाची आवश्यकता**

गुरु व शनि हे दोन ग्रह सध्या जरी तुमच्यावर खूष असले तरी मंगळ तेवढासा अनुकूल नाही. रविदेखील आता तुमच्यावर नाखूषच झाला आहे. त्यामुळे कोणतेहि कार्य करताना संयमाची आवश्यकता राहणार आहे. पत्रकार, लेखक यांनी राजकीय लिखाण करताना फार काळजी घेतली पाहिजे. व्यापारी लोकांनी हिशोबाच्या बाबतीत दक्ष रहावे, नाही तर त्यांना भलत्याच आपत्तीला तोंड द्यावे लागेल. नोकरीत स्वतःचे काम बरे, आपण बरे असे वागा. कुणाच्या गटात अगर कटात सामील होऊ नका. वरिष्ठांच्या सांगण्याला विरोध करू नका. या वेळी कुणीही नोकरीत बदल करण्याचे मनात आणू नये. राजकारणात आघाडीचे पाऊल उचलावे लागेल. महिलांनी नोकरीत चुका होऊ देऊ नयेत. सहानुभूती मिळवावी. विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी कष्ट करावे लागतील. ☐ ☐

---


**पॅपिलॉन**
**पॅपिलॉन**

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०